नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी
१९८६

फेब्रु, एप्रि, जून, ऑक्टो - 15 [illegible]

अनुक्रमणिका

युगवाणी




कै. दत्तात्रेय चिंतामण सोमण
निधन १३ डिसेंबर १९७६


विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

डिसेंबर १९७६ – जानेवारी १९७७

अनुक्रमणिका



वि. सा. संघाच्या संगीत समिती (स्वर मंडळ) तर्फे सौ. वसुंधरा कोमकली ह्यांचे बुधवार दि. २४–११–७६ ला गायन झाले. त्या प्रसंगी त्यांचा, श्री. मुकुंद कोमकली, डॉ. कुमार गंधर्व, तबलावादक श्री. वाडेगावकर आणि पेटीवादक श्री. बबन आठल्ये ह्यांचा सत्कार करण्यात आला. चित्रात सौ. वसुंधरा कोमकली, श्री. आठल्ये, श्री. मुकुंद कोमकली, संघाध्यक्ष श्री. अनिल, श्री. मधुकर गुळवणी.



बुधवार दि. ८–१२–७६ च्या सांस्कृतिक कार्यक्रमात कविवर्य राजा बढे काव्यवाचन करताना.

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

डिसेंबर १९७६ - जानेवारी १९७७

पौष - माघ शके १८९८

संपादक : मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक : वि. बा. प्रभुदेसाई

युगवाणी

मूल्य तीन रुपये

वर्ष ३२ अंक ९-१०

संपादकीय

नूतन वर्षाभिनंदन !

ता. १ जानेवारी १९७७ पासून सुरू होणारे हे नूतन वर्ष आमच्या वाचकांना, विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना आणि हितचिंतकांना सुखसमृद्धीचे जावो !

--संपादक

परमसह्यस्तु विरहः ।

१३ डिसेंबर १९७६ ला द. चिं. उपाख्य- बापूसाहेब सोमण ह्यांचे दु:खद निधन झाले. डिसेंबरच्या पहिल्याच पंधरवड्यात प्रकाशित झालेल्या युगवाणीच्या अंकात बापूसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची ओझरती ओळख आम्ही करून दिली आणि पाठोपाठच त्या ओळखीला पाठ देऊन बापूसाहेब आमच्यातून उठून गेले. हिवाळ्यात झाडाआडून येणारे तिरपे उन्ह सुखवून जाते; बापूसाहेब वाशीमसारख्या आडगावला राहून आपल्या काव्याची ऊब देत रसिकाला असेच सुखावून गेले. मुंबई, पुणे, नागपूर सारख्या पिसाट गर्दीची गावे सोडून ते दूर दूर राहिले. एका लहानशा गावात, स्वत:च्याच साठी जगत, अगदी एकटयासाठी; आणि स्वत:चसाठी लिहित. जगले अपार श्रीमंतीत पण कधी विसरले नाहीत साहित्यनिर्मिती करताना त्या लक्तरी दारिद्र्याला, मानवी कलंकाला !

बापूसाहेबांचे हृदय कवीचे होते पण बुद्धि तत्त्ववेत्याची ! भूतप्रेतपिशाच्च योनी इत्यादींचे गूढ त्यांना सदा आकृष्ट करी. ह्या संबंधी चमत्कारिक कथा बापूसाहेब भयकंपित लेखणीने रेखाबद्ध करीत आणि वाचकाच्या मनात कुरतडल्यासारखे होई. पण बापूसाहेब हे सारे लिहिलेले प्रसिद्धच करीत असे नाही. येणाऱ्याला ऐकवायचे आणि इष्ट परिणाम झाला आपल्या लेखनाचा असे वाटले की समाधानाने व्हरांड्यातल्या आरामखुर्चीत तासन् तास खुष पडायचे आणि ती तंद्री संपली की ते कागद फाडून मोकळे व्हायचे ! अजब खाक्या होता ह्या लेखकाचा ! तो केवळ " सद्य:परनिवृतये "– ह्या मम्मटोक्तिप्रमाणे अक्षरश: ' परनिर्वृति ' होताच काव्यावतार संपवून टाकी ! —

'सुषमा' नावाच्या मासिकातून त्यांनी बरेच लिखाण केले. 'अभिरुची', 'सत्यकथा', 'युगवाणी' ह्या मासिकांतूनहि त्यांचे बरेचसे काव्य रसिकांपुढे आले. 'भावना', 'शबनम', 'झिमझिम' व 'गुंजा' हे चार काव्यसंग्रह त्यांच्या मित्रांमुळेच छापून निघाले.

बापूसाहेबांनी रहस्यकथा व कादंबऱ्याहि लिहिल्या. पण प्रसिद्धीपासून ते नेहमी दूरच राहिले. वाशीम सारख्या लहानग्या गावात देखील त्यांची साहित्य संपदा फारशा गावकऱ्यांना ज्ञात नाही. ते अविवाहित होते. सदासर्वकाळ ते गुंग असत ते लिहिण्यात, वाचण्यात. त्यांनी रुबाया लिहिल्या; प्रेमगीते लिहिली; तत्त्वज्ञानात्मक काव्येहि रचिली आणि नवकाव्याचे नमुनेहि निर्मिले आणि हे सगळे अत्यंत लोभस आणि गुणोपेत! त्यामुळेच त्यांचे लिखाण जेवढे प्रकाशात आले तेवढे रसिकांनी खूप आनंदून वाचले. शेवटपर्यंत बापूसाहेब लिहीतच होते. त्यांना तीनदा हृदयविकाराचे झटके आले पण त्यांनी त्याला दाद दिली नाही. परवा मात्र ते गुपचूप नाहीसे झाले; न कळवता, हृदयालाहि आपल्या देखील! बापूंचे काय प्रिय नाही रसिक वाचकांना? त्यांचे काव्य, त्यांच्या कथा, त्यांच्या कादंबऱ्या, अगदी सगळे सगळे प्रिय आहे – पण आता त्यांचा हा चिरविरह?–हा मात्र नुसता असह्य! असह्यच!

—संपादक

अंतरंग

विशेष सूचना – विदर्भ साहित्य संघाच्या घटनेतील व मतदार सभासद यादीतील दुरुस्त्यांची माहिती कार्यवृत्ताच्या पृ. ६७–६८ वर तसेच मलपृष्ठ ३ वर पाहावी.

दुरुस्ती पृ. २९९ तळटीप १ : वाचका त्वृद्धसंज्ञकात या ऐवजी वाचकात् वृद्धसंज्ञकात् असे वाचावे.

विश्रुतचरितातील वानवास्याचा शोध

के. रा. जोशी

युगवाणीच्या जुन जुलैच्या (१९७६) अंकात 'विश्रुतचरितातील वानवास्य कोण ?' या शीर्षकाखाली म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी वानवास्याविषयी 'दशकुमारचरितातील वानवास्य' ह्या एप्रिल–मे १९७६ च्या अंकात प्रसिद्ध केलेल्या प्रस्तुत लेखकाच्या संशोधनलेखातील काही मुद्यांचा परामर्श घेतला आहे. म. म. डॉ. मिराशी यांनी वार्द्धक्याच्या स्थितीत सुद्धा सशोधनाविषयी आस्था दाखवून उक्त संशोधन-लेखातील मुद्यांची नोंद घेतली ती प्रोत्साहक व महामहोपाध्यायांच्या संशोधक या नात्याने असलेल्या लौकिकाला साजेशी आहे. प्रस्तुत विषयाचा व्यासंग केलेल्या डॉ. विन्सेंट स्मिथ, डॉ. कृष्णस्वामी आयंगार, डॉ. काशीप्रसाद जायसवाल प्रभृती अभ्यासकांच्या परंपरेत म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी जे संशोधन केले त्याचा मागोवा घेतच 'दशकुमारचरितातील वानवास्य' हा लेख लिहिण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या परिश्रमाबद्दल या विषयावर लिहिणाऱ्या सर्वच अभ्यासकांना त्यांच्याविषयी कृतज्ञता वाटणे स्वाभाविक आहे. नागपूर विद्यापीठाच्या बी. ए. प्रथम वर्षाच्या संस्कृत पाठ्यक्रमात विश्रुतचरित गेली बरीच वर्षे नेमले आहे. महाविद्यालयात ते शिकवीत असताना त्या संबंधीच्या संदर्भासाठीच्या वाचनात डॉ. मिराशींचे संशोधन–लेख वाचण्यात आले. त्या लेखातून ज्या अनुपपत्ती जाणवत असत त्या एकत्र करून 'दशकुमारचरितातील वानवास्य' हा लेख लिहिण्यात आला. डॉ. मिराशींचे स्पष्टीकरण वाचल्यावरही त्या अनुपपत्ती अद्यापि तशाच आहेत. त्या दूर व्हाव्या म्हणून हा प्रयत्न सादर करीत आहे. इतिहाससंशोधनाचे निष्कर्ष प्रमाणपरिपूत व तर्कशुद्ध असावे यासाठी केलेल्या परीक्षेला महामहोपाध्यायांचाही आशीर्वाद लाभेल अशी आशा आहे.

दंडीने लिहिलेल्या विश्रुतचरित-भागात इतिहास प्रतिबिंबित झाला हे गृहीत धरले तर विचारणीय मुद्दे दोन आहेत –

१) विदर्भावर आक्रमण करणारा वानवास्य हा डॉ. मिराशींच्या मताप्रमाणे वनवासीचा (उत्तर कानडा जिल्ह्यातील तन्नामक राजधानीचा) राजा असू शकतो काय ?

२) तो वनवासीचा राजा संभवत नसेल तर मग हा आक्रमक राजा कोण असावा ?

या दोन्ही मुद्यांसंबंधी डॉ. मिराशींचे विचार चिंतनीय आहेत.

१) वानवास्य हा उत्तर कानड्यातील वनवासीचा राजा मानला तर भौगोलिक कारणांनी ज्या अनुपपत्ती निर्माण होतात, त्यांना डॉ. मिराशींच्या प्रतिपादनात काहीही उत्तर दिसत नाही. वनवासी ही उत्तर कानडा जिल्ह्यातील; इकडे विदर्भाचे राज्य दक्षिणेस गोदावरीपर्यंत पसरलेले. याशिवाय पश्चिमेस ऋषीक (खानदेश), नैर्ऋत्येस औरंगाबादजवळच्या प्रदेशात व गोदावरीच्या दक्षिणेस अश्मक, दक्षिण महाराष्ट्रात कुंतल असे एकापेक्षा एक बलाढ्य असणारे विदर्भेशाचे सामंत राज्य करीत होते. लढाईच्या प्रसंगी ते विदर्भेशाच्या मदतीला धावून आले होते. यास्तव उत्तर कानड्यातील वनवासीचा एक सामान्य राजा एवढी सामंत राज्ये टाळून वा ओलांडून कोणासही न कळत वरदेच्या पूर्व तीराच्या बाजूने मोठे युद्ध लढू शकतो, ती कल्पना असंभाव्य कोटीतील आहे. जुन्या संस्कृत टीकाकारांना देशनामे माहीत नसल्यामुळे त्यांनी असे अनेक घोटाळे केले आहेत असा शेरा डॉ. मिराशींनी 'वनवासी वनप्रभुः' असा अर्थ देणाऱ्या प्राचीन संस्कृत टीकाकारांना बहाल केला आहे. तेव्हा बापडा साधनहीन जुना टीकाकार हा बरोबर की नुसत्या वनवासी शब्दाचे सादृश्य बघून वानवास्य म्हणजे 'वनवासी नगरीचा राजा' असा अर्थ गतानुगतिक न्यायाने मांडणारी अधिक साधन-संपन्न आधुनिक विद्वान मंडळी बरोबर ? दक्षिण भारताचा नकाशा डोळ्यापुढे ठेवल्यास या प्रश्नाचा निर्णय कोणासही करता येईल. या अनुपपत्तीचे

कोणतेही स्पष्टीकरण डॉ. मिराशींच्या उत्तरात सापडत नाही. (सध्याच्या लेखात डॉ. मिराशींनी वानवास्याने विदर्भाचा दक्षिण भाग काबीज केला होता व वानवास्य भानुवर्मन् हा कदंबकुलोत्पन्न रविवर्मन् असावा हे विचार मागे घेतले असल्याचे दिसते.)

२) वानवास्य हा शब्द वनवासीचा राजा या अर्थाने व्याकरणाच्या प्रचलित नियमांनी सिद्ध होऊ शकत नाही हा मुद्दा डॉ. मिराशींनीही मान्य केला आहे. त्यांनी देशवाचक नामापासून राजवाचक नामे करण्यासाठी वृद्धेत्कोसलाजादाञ्ञ्यङ् (४।१।१७०) हे सूत्र उल्लेखिले आहे. त्यावर स्पष्टीकरण देताना "ह्रस्व इकारान्त अवन्ति, कुन्ति या देशानामांवरून 'य' (ञ्यङ्) प्रत्यय लागून आवन्त्य, कौन्त्य अशी तद्देशीय राजवाचक रूपे होतात. तेव्हा वनवासी या देशवाचक शब्दावरून हा फक्त दीर्घ इकारान्त (ई) असला तरी हा शब्द त्या सारखाच समजावा. पाणिनीला माहीत नसलेली पाण्ड्यासारखी रूपे साधण्याकरिता कात्यायनाने आपली काही वार्तिके रचली." असे म्हटले आहे. प्रस्तुत लेखक हा तर व्याकरणशास्त्राचा विद्यार्थी आहे. पण इतर इतिहास संशोधकांमध्येही जे व्याकरणशास्त्र अभ्यासणारे असतील त्यांना डॉ. मिराशींचे स्पष्टीकरण वाचून अनेक अडचणी येतील. त्या अशा—पाणिनीने इत् - अन्त नामावरून (इदन्त) 'य' (ञ्यङ्) हा प्रत्यय सांगितला आहे. पाणिनी जेव्हा इत् असा इला त् लावून – तपरकरण वापरून निर्देश करतो तेव्हा त्याला ह्रस्व इकारच म्हणावयाचा असतो. त्यात इतरांना स्वेच्छेप्रमाणे बदलाची सोय नाही. दुसरे असे की अवन्ति, कुन्ति ही सर्व देशनामे इदन्त व पुंलिंगी आहेत. तसेच ही सर्व देशनामे देशवाचक व क्षत्रियवाचक (जनपद – क्षत्रियोभयवाचक) अशी असावी असा नियम आहे.[१] वनवासी ही राजधानी आहे. वनवासीचा प्रदेश कर्नाटक देश किंवा कदंब देश म्हणवला जात होता. तेव्हा स्त्रीलिंगी दीर्घ इकारान्त (ई) व क्षत्रियवाचक नसलेल्या केवळ नगरीवाचक वनवासी शब्दाला य प्रत्यय लावण्यासाठी अवन्ति, कुन्ति या ह्रस्व इकारान्त पुंलिंगी शब्दांच्या माळेत कसे उभे करता येणार? महाभारतातील अनेक नामांच्या व्युत्पत्ती पाणिनीय व्याकरणात असताना व 'वनवासिकाः' या नावाने वनवासीचे रहिवासी महाभारतात उल्लेखिले आहेत असे मत डॉ. मिराशी स्वतः प्रतिपादित असताना 'वानवास्य' शब्द मात्र पाणिनीला माहीत नव्हता असे विधान युक्तियुक्त वाटत नाही.

पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की कदंबांचे घराणे तत्कालीन इतर सम्राटांच्या तुलनेत एक सामान्य राजकुल. एका कदंब नृपतीने विदर्भासारख्या सुदूर प्रदेशावर प्रचंड आक्रमण करून लूट मिळवून नेली हे जर खरे असेल तर त्याचा केवढा गौरव त्या कुळाला वाटला असता. त्याचा कदंबांच्या एकाही शिलालेखात–ताम्रपत्रात उल्लेख नाही, ते स्वतःला कशातही वानवास्य म्हणत नाहीत वा त्यांना इतरही कोणी वानवास्य म्हणत नाही हे कसे? यास्तव डॉ. मिराशींच्या वानवास्यविषयक उपपत्तीची जितकी परीक्षा करावी तितकी निराशाच पदरी पडते.

उलट वानवास्य हा विदर्भाच्या पूर्व सीमेवर असणारा राजा असावा असा तर्क अधिक सयुक्तिक आहे. भौगोलिक संभाव्यता या तर्काच्या पाठीशी आहे. शेजारचे राज्य अंतःशत्रूंनी पोखरले असता सामंतांच्या फितुरीची अटकळ असलेला सामान्यही धाडशी शत्रू आक्रमण करू शकतो. सीमेवरून विदर्भाकडे डोळ्यात तेल घालून बघत असणाऱ्या वानवास्याला विदर्भेशाच्या विरुद्ध उठावणी करण्याची चिथावणी विदर्भेशाच्या एका सामंताने – अश्मक वसंतभानूने दिली होती.[२]

'नलराजांच्या ताम्रपटात त्यांचे राज्य वनप्रदेशावर होते असे कोठेही म्हटले नाही.' ह्या डॉक्टर मिराशींच्या विधानात कोणताही युक्तिवाद आढळत नाही. नलराजे हे मुख्यतः बस्तर भागावर राज्य करणारे. बस्तरभाग अजूनही निबिड अरण्यांनी वेष्टित आहे. तेथील राजांचे राज्य वनप्रदेशावर होते हे पाहण्यास ताम्रपटाची साक्ष काढण्याची गरज नाही.

२) हे वानवास्याचे आक्रमण वाकाटकांच्या नन्दिवर्धन व प्रवरपुर शाखेवर नरेंद्रसेनाच्या कारकीर्दीत झालेले नलवंशीय भवदत्ताचे आक्रमण असण्याची अधिक शक्यता आहे. या तर्काला उत्तर देताना डॉ. मिराशी लिहितात की, 'नलराजा भवदत्तवर्मा परत गेला नाही तर त्याने नंदिवर्धनजवळच्या प्रदेशावर काही काळ राज्य केले. पण विश्रुतचरितात वर्णिलेल्या आक्रमणानंतर वानवास्य राजा मात्र विदर्भात राहिला नाही. अश्मक राजाने त्याला लुटीचा काही भाग देऊन आपल्या देशाला परत जाण्याविषयी

त्याचे मन वळविले असे स्पष्ट म्हटले आहे. पुढील उतारा पाहा– (अश्मकेन्द्रः) वानवास्यं केनचिदंशेनानुगृह्य प्रत्यावृत्य सर्वमनन्तवर्मराज्यमात्मसादकरोत्। (आगाशे आवृत्ति, पृ. १३९) [१]

वरील छेदकावरून डॉ. मिराशींचा वर उल्लेखिलेल्या विश्रुत चरितातील उताऱ्याविषयी काही गैरसमज झालेला स्पष्ट दिसतो. केनचिदंशेन – लूटीचा काही भाग यात हत्ती, घोडे, सोने, चांदी वगैरे चल संपत्तीचाच भाग येतो व वरदेच्या पूर्व तीरावरील प्रदेशाचा भाग येत नाही याचे गमक काय ? वानवास्याला संतुष्ट करण्यासाठी त्याने व्यापलेला वरदेच्या पूर्वतीरावरचा भाग त्याला (वानवास्याला) वहाल केला जाणे अगदी स्वाभाविक आहे. दुसरे या वाक्यात **मन वळविण्याचा** कुठेही उल्लेख नाही. परावृत्य – ह्या पूर्वकालवाचक अव्ययाचा (परा + वृ + त्यप्) स्वतः परत फिरून असा अर्थ होतो, (दुसऱ्यास) परत वळवून असा अर्थ होत नाही. त्यासाठी परावर्त्य असे रूप ठेवावे लागले असते. तेव्हा वानवास्य व परावृत्य यांचे आपल्या मताला योग्य अर्थ काढण्यासाठी बापड्या दिवंगत दंडीच्या पदरी विनाकारण दोन चुका बांधणे योग्य होणार नाही.[3] डॉ. मिराशींच्या उत्तरातील इतर काही एक दोन किरकोळ मुद्यांसंबंधीही असेच दिसून येते. उदाहरणार्थ विश्रुत चरितातील राजनामे देशसंबद्ध आहेत, हा मुद्दा. विदर्भेशाचे सामंतराजे कोठले होते हे सुचविताना केलेल्या मुरलेश्वर, ऋषीकेश्वर, कोंकणपती अशा उल्लेखावरून सर्व राजविषयक उल्लेख असेच असावे असे समजणे अडचणीचे आहे. कारण, वनवासी हे देशनाम नव्हे. ती राजधानी आहे. याशिवाय विश्रुतचरितात प्रचण्डवर्मा, चण्डवर्मा व मित्रवर्मा या राजांचे उल्लेख देशाच्या उल्लेखाशिवाय आले आहेत, हे नमूद करण्यासारखे आहे.

वानवास्य हा शब्द वनप्रभू या अर्थाने वापरण्यासाठी दंडी वनवासी यावरून स्वार्थिक ष्यञ् कशाला करता या डॉ. मिराशींच्या शंकेचे उत्तर भाषेच्या सामान्य अवलोकनाने सहज सापडेल. सामान्यनामातून जेव्हा विशेषनामे भाषेत रूढ होतात तेव्हा असा फरक होऊ शकतो. मराठीत 'जंगली' हा शब्द अरण्यातील या अर्थाने प्रसिद्ध आहे. पण त्यापासूनच 'जंगल्या' हे नाव विशेषनाम म्हणून मराठीत रूढ झाले आहे. विदर्भाचे राज्य हे नागर व सुसंस्कृत राज्य होते. वनप्रदेशातील राजा त्या मानाने आडदांड असल्यामुळे 'वानवास्य' या नावाने संबोधिला गेला तर नवल नाही. 'अयं च वानवास्यः प्रियं मे मित्रम्।' (दश. च. पृ. २००) या अश्मकेशाच्या विधानात वानवास्य हे नाव लोकरूढ असल्याचे स्पष्ट मत आहे.

नलवंशीय राजे हे विदर्भेशाचे प्रत्यन्तनृपती होते. त्यांचे विदर्भेशाशी शत्रुत्व होते. त्यांनी वाकाटकांची नन्दिवर्धन–प्रवरपुर शाखा जिंकून तेथून स्वतःचे ताम्रपट दिले होते. एवढेच नव्हे तर वाकाटकांचा आप्त विष्णुकुंडिवंशी माधववर्मा याने छत्तीसगडाचा प्रदेश जिंकून नलवंशीय राजांचा उच्छेद केला होता. पण डॉ. मिराशींच्या मताप्रमाणे एवढा उत्पात घडवून गेलेल्या कदंबनृपतीविषयी कुठेही चकार शब्द नाही. या सर्व गोष्टी प्रस्तुत लेखकाच्या 'दशकुमारचरितानील वानवास्य' या लेखात डॉ. मिराशींनाही संमत व प्रमाणपरिपूत अशा दाखविल्या गेल्या आहेत. तेव्हा, केवळ वानवास्य ह्या शब्दात वनवासी नावाचे सादृश्य दिसते एवढ्या आधारावर उत्तर कानड्यातल्या वनवासी नृपतीपर्यंतची हनुमान उडी मारणारा तर्क हा बरोबर की भूगोल, इतिहास व संभाव्यता यांच्या कसोटयांना उतरणारा वानवास्याचा शोध विदर्भाच्या पूर्वसीमेवरील नलवंशीय राजांत करणारा तर्क हा बरोबर याचा विवेक संशोधकांना सहज करता येईल. तेव्हा वानवास्य हा विदर्भसीमेवरील वनप्रदेशाचा राजा होता व तो नलवंशीय भवदत्तवर्मा वा तद्वंशीय इतर राजा असावा हा तर्क भौगोलिक व ऐतिहासिक दोन्ही प्रमाणांना अधिक जुळणारा असल्याचे शांतपणे विचारांती कोणासही पटेल अशी आशा आहे.

---

१ जनपदक्षत्रियोभयवाचका त्वृद्धसंज्ञकात् इदन्तात् कोसलात् अजादाच्चापत्ये ञ्यङित्यर्थः। (बालमनोरमा– पृ. ७१०, चौ. सं. सीरीज् १९६१)

२ वसन्तभानुर्भानुवर्माणं नाम वानवास्यं प्रोत्साह्य व्यग्राहयत्। (दश० च० पृ. २००)

३ दंडी हा अल्पदोष सुद्धा काव्यात असू नये असे आग्रहाने सांगून गेला आहे. त्याचे काव्यादर्शातील सुप्रसिद्ध वचन असे आहे

तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्ये दुष्टं कथंचन। स्याद्वपुः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम्॥ (काव्यादर्श १–७)

नामदेवाची सहज सोपी अभंगवाणी

नलिनी तारे

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।
नामा तयाचा किंकर । त्याणे केलासे विस्तार ।

वारकरी संप्रदायाच्या प्रभावळीत जी तेजस्वी रत्ने जडवली आहेत त्यांत ज्ञानदेव "नामे पहिला" गणल्या गेले आहेत. नामदेव वास्तविक ज्ञानदेवाहून मोठे, पण ते स्वतःला ज्ञानदेवांचे किंकर समजत. यात मात्र संशय नाही की भक्तिसंप्रदायाची ध्वजा थेट पंजाबपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे थोर कार्य नामदेवांनी केले. नामदेव शिंपी पण विठ्ठलाचे आवडते भक्त. ईश्वरावर रुसणारे, प्रसंगी त्याला कठोर बोलणारे, आणि त्याच्याशी सख्य करणारे नामदेव, आणि त्यांचा हट्ट पुरविणारा विठ्ठल ही जोडी अद्वितीय आहे.

नामदेवाची अभंगगाथा प्रसिद्ध आहे. नावाप्रमाणेच नामालाच देव मानणारे ते होते. नाममहात्म्य वर्णन करीत असताना त्यांच्या वाणीला पूर येतो. नामस्मरण हेच सुखाचे सार आहे. मानसिक शांति आणि ईश्वरप्राप्ति जर कशाने होत असेल तर नामस्मरणाने. नामस्मरण करा, म्हणजे पांडुरंगाची उपासना करा असा ईश्वरप्राप्तीचा सुकर मार्ग दाखविणाऱ्यांपैकी नामदेव सर्वश्रेष्ठ आहेत.

कासवीची पिले पोपिली कृपेने। तैसा पै आत्मज्ञाने सुखी झालो। असे अनुभव प्राप्त झाल्याने शतकोटी अभंग रचण्याची त्यांची प्रतिज्ञा अकारण नव्हती असे म्हणावे लागेल. नामदेवाचे अभंग म्हणजे स्वतःविषयी जाणीवलेले दुर्गुण, नामदेवांचे अभंग म्हणजे ईश्वरदर्शनासाठी आतुरलेले मन. नामदेवाविषयी ज्ञानदेव म्हणतात,

भक्त भागवत बहुसाल ऐकिले ।
वहु होतील पुढे, होऊनी गेले ।
परि नामयाचे बोलणे, नव्हे हे कवित्व ।
हा रस अद्भूत निरुपम ।

ज्ञानियाच्या राजाचे वरील उद्गार म्हणजेच नामदेवाची सर्वश्रेष्ठता होय.

नामदेव हे तुकारामाप्रमाणेच अत्यंत आतुरभक्त. तुकारामांनी देवाच्या मीलनासाठी टाहो फोडला तर नामदेवांनी करुणामय वाणीने देवाची अर्चना केली. नामदेव हे ज्ञानदेवाप्रमाणेच आत्मज्ञानी होते. ज्ञानदेवांचा अनुभव गुरुकृपानिष्ठ तर नामदेवाचा अनुभव आत्मपरीक्षणात यशस्वी झाल्यावर आत्मनिष्ठ झाला असावा.

"मीच माझा देव। मीच माझा भक्त" असा त्यांचा आत्मानुभव होता. त्यांच्या अभंगांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल. (१) आत्मचरित्रपर (२) चरित्रपर (३) पारमार्थिक (४) तळमळ व्यक्त करणारे (५) नाममहात्म्य सांगणारे (६) भक्तिपर (७) संतस्वरूपपर (८) अनुभव प्रकटीकरण करणारे (९) आदेशवाणी.

"नामदेव हे मराठी भाषेतील आत्मचरित्रकार होत" असे डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात. आत्मचरित्रपर अभंगात त्यांच्या भक्तीला कौटुंबिक विरोध, ज्ञानदेवादिकांची भेट, आणि विसोबा खेचरापासून झालेला गुरूपदेश असे तीन प्रमुख प्रसंग आहेत. स्वतःचे आईबाप, बायको यांना त्यांच्या देवपिशामुळे किती यातना सोसाव्या लागल्या त्याचे वर्णन नामदेवांनी त्यांच्या मनस्थितीशी समरस होऊन केले आहे. कधी ते कौटुंबिक मोहात सापडले, कधी त्यांच्या मनाची कुचंबणा झाली, कधी त्यांच्या मनाने खंत बाळगली, कधी धीर धरले. या सर्व अवस्थांची भावचित्रे त्यांच्या अभंगात आहेत.

ज्ञानदेव मुक्ताई यांच्याशी भेट झाली त्यामुळे नामदेवांची आंधळी भक्ती डोळस झाली. "डोळियाचा डोळा" उघडल्यावरचा आनंद त्यांना लाभला. त्यानंतर ते विठोबा पुढे धरणे धरून बसले. देव बोलेना म्हणून देवावरच आग पाखडायला लागले. मला संसारात राहू दिलेस आणि तू मात्र स्वस्थ आहेस.

" मेरुचिया गळा बांधोनि मशक
पाहसी कौतुक अनाथ नाथा ।
नामा म्हणे देवा कळली तुझी माव (माया)
माझा मी उपाव करिन आता ।"

असा उपरोध त्यांनी व्यक्त केला. पण क्रोधातून मोह जडला आणि ते म्हणाले, " तुमचे न लगे मज काही । प्रेम असो द्या पूर्वी." ज्यावेळी त्यांना स्वतःचा भक्तितील अहंकार दिसेनासा झाला, त्यावेळी अपूर्व आनंदात ते म्हणाले,

" मजलागी देवा जासी चुकवोनि ।
आणीन धरून तुज लागी ।
दृढ भक्तिभाव प्रेमाचा हा दोरा ।
बांधीन सत्वर तुझे पायी ।"

कधी त्यांनी असहायतेचे, व्याकुळतेचे उद्गार काढले, तर कधी साधकावस्थेतील आर्तता स्पष्ट केली, आणि नाममंत्र सिद्ध झाला. नामभक्ती फळास आली. देवाने माघार घेतला आणि भक्ताचा स्वीकार केला. त्यावेळी

" सोलोनिया केळे साखरे घोळिले,
अंधारी खादले तरी गोड "

असा त्यांना अमृतानुभव झाला.

ज्ञानेश्वरादी संतांच्या समागमी नामदेव राहिले होते, त्यांना जवळून पाहिले होते. त्यामुळे ज्ञानदेवांची जीवनकथा सांगताना ते एकरूप झाले आहेत. प्रसंग, योजना आणि स्वभावरेखन हे गुण प्रामुख्याने त्यांत दिसून येतात. आदिप्रकरण, तीर्थावळी प्रकरण व समाधिप्रकरण अशी त्या चरित्राची विभागणी करता येते. समाधीचा प्रसंग तर नाट्यपूर्ण, करुण व हृदयाला पाझर फोडणारा आहे. ज्ञानदेवांचे पहिले आद्यचरित्रकार नामदेवच होत.

नामदेवांची वाणी करुण आहे, त्यात कळवळा आहे, तळमळ आहे, जिव्हाळा आहे. सुवासावर भ्रमर अगर मधावर माशी तसे माझे चित्त देवापाशी आहे. मला येथे तुजवाचून कोणी नाही. देवा, प्रपंचाचे कष्ट उपसून शिणलेला हा नामा तुझ्या दारी आला आहे, तुझ्या कृपेची सावली मिळेल तरच तो निवेल.

" अमृताहूनि गोड नाम तुझे देवा ।
मन माझे केशवा कां बा ने घे ।।"

तू नाथ मी अनाथ, तू चैतन्य मी देह, तू चंद्र मी चकोर, तू सागर मी सरिता, तू कुरंगिणी मी पाडस, असा त्यांचा ईश्वराशी संबंध आहे.

" सिणुले डोळुले पाहता वाटुली ।
अवस्था दाटली हृदयामाजी ।"

रात्रंदिवस वाट पाहणारा नामा तुला दिसत नाही काय ? माहेराची (पंढरपुरची) आठवण करून माझे डोळे रोडावले, पण पंढरीचा राणा भेटत नाही.

" पक्षिणी प्रभाति चारियासी जाये ।
पिलू वाट पाहे उपवासी ।
तैसे माझे मन करी ओ तुझी आस ।
चरण रात्रंदिन चिंतीतसे ।। "

आणि जेव्हा विठोबा भेटतात, तेव्हा नामदेवाची स्थिती अवर्णनीय असते. मन भरल्यानंतर ते निरोप घेतात.

" बहु दिवस तुमचे गावी,
आता कृपा असो द्यावी ।
आम्ही जातो आपल्या गावी,
विठोबा लोभ असो द्यावा ।
तुझे पायी माझे मन, माझे ठायी तुझा प्राण ।
लिखीत पत्र पाठवावे । स्मरण असो द्यावे ।

नामदेवांनी नामस्मरणाचा पुरस्कार केला म्हणून " नाम " हाच त्यांचा देव होय. " वात जशी दीपासंगे " एकरूप होते त्याप्रमाणे " राम " म्हणता " रामचि " व्हावे असा महिमा त्यांनी सांगितला. " नाम तेचि रूप, रूप तेचि नांव । नामा रूपाभिन्न नाही नाही ।" नामदेव हे लहानपणापासूनच ईश्वराचे भक्त. त्यांच्या विषयी डॉ. वि. पा. देशपांडे म्हणतात, " नामदेवांनी मराठी साहित्यांत प्रेममय भक्तीचा (Romantic devotion) अविष्कार केला. पंढरपूर हे तर त्यांचे स्फूर्तिस्थान, ' देव मज सांगे पंढरीस या रे । प्रेमचित्ती घ्या रे नाम माझे ।' आणि रागावयाचे असल्यास देवावर रागवावे, प्रेम करायचे असल्यास देवावर करावे, सख्य करायचे असल्यास देवाशी करावे असा ईश्वरभक्तीचा प्रकार त्यांच्या भक्तीत दिसतो. "

ज्ञानदेवाप्रमाणेच नामदेवांनी देखील साधुची लक्षणे सांगितली आहेत. संतांच्या संगतीने अधमासही कालांतराने गति मिळते. संताचे चरण देखिल्यास " कल्पकोटी पापराशी " दग्ध होतात. " साधु हे तीर्थाचे तीर्थ " होत. परिसाचेनि संगे लोह होय सुवर्ण । तैसा भेटे नारायण संतासंगे । आणि संताची भेट

होण्यास देखिल भाग्य लाभते. "संता अखंड भजावे । तेणे भेटे देव आपोआप" असे नामदेव आवर्जून सांगतात. ईश्वर सर्वानाच दिसत नसतो, उलट ईश्वर जाणण्याची कला निसर्गदत्त आहे. आणि ईश्वर मिळाला तर काय करणार ?

'घालिन लोटांगण वंदीन चरण । डोळ्याने पाहिल रूप तुझे । प्रेमे आलिंगन आनंदे पूजीन । भावे ओवाळीन आनंदे ।' मुक्याने जर गुळ खाल्ला तर त्याला त्याची गोडी कशी सांगता येणार ? तद्वतच ईश्वरानुभूति शिवाय ईश्वर कसा अनुभवता येईल ? बसून नाम घेतल्यास देव उभा राहतो, उभ्याने नाम घेतल्यास देव नाचतो असे ते म्हणतात. एवढे सांगूनही न पटल्यास

"नामयाचे प्रेम केशवचि जाणे ।
केशवासी राहणे नाम्यापाशी ।
केशव तोचि नामा । नामा तोचि केशव ।
प्रेमे भक्तिभाव मागतसे ।"

अधिकार तैसा करू उपदेश या आत्मविश्वासाने तुकारामासारखे ते बोलू शकले नाहीत, तरी कीर्तनाच्या रंगात रंगले असता ज्ञानदीप ते लावू शकले. जेथे नित्य नवी वासना वाढत आहे, क्षणाक्षणाला आयुष्य कमी होत नाही अशा संसारात आपण कोणाच्या भरवशावर निश्चीत आहे. "संसार हा दो दिसाचा पाहुणा" असून एकदा आयुष्य काळाहाती गेले की आजवर ले "पाळिले" "पोशिले" आत्मजन पाठिमोरे होतील आणि पापपुण्य ही दोन अंतीची "सांगाती होतील." "एकलेचि येणे, एकलेचि जाणे" हा येथील न्याय आहे. हे ओळखून हरिभक्तीस लागा व आत्मारामाची ओळख करून घ्या. "पोट माझी माता, पोट माझा पिता । पोट माझा बंधु, पोट माझी बहिण, पोटाने हे दैन्य मांडियले ।" असे त्यांच्या शिकवणीचे सार आहे.

अशा या अभंगात जिव्हाळा आहे, प्रेमळपणा आहे, नामदेवांचे अभंग म्हटले म्हणजे वात्सल्य आणि कारुण्य यांचा सुमेळ होय. त्यांचे अभंग म्हणजे औत्सुक्य व औदास्य यांचा सहज विलास होय. त्यात विठ्ठल प्रितीची आर्तता आहे, त्यात शुद्ध मनोवृत्तिचा अविष्कार आहे, त्यात पाखंड नाही, कडवटपणा नाही, त्यात अमृताइतका गोडवा आहे, त्यात ईश्वर व भक्त यांचा सुखसंवाद आहे, रूपक आणि दृष्टान्त यांचा मिलाफ आहे, म्हणूनच बहिणाबाई म्हणते,

"संत कृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । त्याणे केलासे विस्तार"

इथे

शिरीष गोपाळ देशपांडे

मृत्यू तसाही पाहिला
मृत्यू असाही पाहिला
पण दु:खाला अशी
लाज वाटली नव्हती
असली स्मशानयात्रा
पूर्वी पाहिली नव्हती

सतीच्या जगण्यासारखे
जीवन वाट्याला येईल,
असे वाटले नव्हते
मुक्ततेचे आपल्या
आपणच असे...
वपन केले नव्हते.

आनंदाने बेहोश होऊन
नाचणारे गुलाम नवीन!
मेंदूशिवाय कवटीच्या
माणसांचे स्मशान नवीन!

असे कसे?

स्तोत्रे फक्त
गुलामांनाच सुचतात.
मुक्तिविरोधी हात तसे
गुलामांनाच असतात!

असल्या लाचार ओंजळीत
मला फार परके वाटते.
मरण जगतानाही असे, मला
...पाऽर पोरके वाटते.

पाऱ्याच्या गोळ्या

पुष्पलता गुप्ते

विहीरीतून नुकतीच ओढून घेतलेली कळशी धवदिशी खाली पडते. एखाद्या वावरल्या पाखरानं अंग आकसून घ्यावं तशी ती केळीच्या पानाआड दडते. डोळे ताणून तो – तोच असल्याची खात्री करून घेते. आणि रानभरी झाल्या पांखरासारखी घराच्या मागल्या अंगाला भिरभिरत रहाते. चुकल्या कोकरासारखा घरातल्या पोरांच्या मागे वापुडवाणेपणानं फिरणाऱ्या नाम्याला हाकारून जवळ वोलावते. त्याच्या इच्छे-विरुद्ध त्याला हाताशी गोळा करून घरात आणते.

तिच्या चाहुलीसरशी थोरल्या वहिनी हातातलं पातेलं जमिनीवर आपटतात. अन हातवारे करत, टिपेचा सूर लावतात.

'या. गेल्या जन्मीचं देणं हौस फिटेपर्यंत फेडून घ्या. त्या सटवीचा नाच झाला. ह्यांची हौस झाली. आता तुमचा आत्मा शांत होऊ द्या. घरादाराला निर्दळा एकदा. म्हणजे तरी तुमचं समाधान होईल.'

एखाद्या वरड, कोरड्या माळरानावर पडलेले पाण्याचे थेंब वाहून जावेत, तसे वहिनींचे शब्द तिच्या मनावरून निचरून जातात. ती कोपऱ्यातल्या अंधारात अंगाचं मुटकुळं करून, गुडघे जवळ घेऊन वसते. कसाईखान्यातल्या गुरानं खाटकाच्या सुरीचा वेध घ्यावा तशी बाहेरच्या वोलण्याचा वेध घेत रहाते.

'काय, अप्पाराव, मंग किती दिस माहेरपना करनार कौतुकाच्या लेकीचा? तुमचं दिस आठवा जरा. बाईल न्हाय म्हनजे मरदाला किती कठीन? तुमीच सांगा.' उकळत्या पाण्याचा फवारा उडावा तसे फुटणारे शब्द. आणि पाठोपाठ वासनेचे फुत्कार टाकणारे काळेशार हसू. तिच्या काळजाचं पाणी, पाणी होतं. अभावितपणे तिचा हात पोराच्या केसातून फिरतो. हाताला वोटभर लांबीचा जखमेचा वण लागतो. अन् तिच्या हाताची कातडी भाजल्यागत होते. बाहेरच्या खोलीतून येणारे शब्द कान जीवाच्या करारानं टिपू लागतात.

"अहो, आम्हाला हौस का आहे तिला ठेवून घ्यायची? पण तुम्हीच विचार करा. हाडामांसाच्या माणसाला गुरासारखं वागवता तुम्ही! पोरांची, तिची काय दशा झालीय्? कुठल्या काळजानं तिला परत पाठवू तुम्हीच सांगा."

"अरे! वा! दारचं पायपुसनं म्या डोक्यावर घेतलं. साऱ्या भावकीकडून छीः थू म्हनून घेतलं. तुमच्यावर उपकारं केलं तरी मलाच हानताय राव!"

"उपकार केलेत ते फुक्कट का? पैशाची रास खणखण मोजून घेतलीत ती? अन् अजूनही लोभ जाईना तुमचा. स्वतःच्या वायकोला पैशासाठी वापरता!"

'मंग पैसं दिलंत ते मोठ्ठं केलं का? मी नड-लेला बकरा घावलो म्हून लेक पिवळी झाली. न्हाओ तर कोण काळं कुत्रं येणार व्हतं असल्या वीजावरूवर सोयरीक करायला? आनि वायको माजी. मी तिला कशीवी वापरली तरी तुमी जाव विचारनारे कोण? अन् काय मोटी कुलवंताची लेक लागून गेली हाय तर तिनं सीतासावित्रीचा नखरा करावा! च्यायला ×× वर फाटलय तरी रुवाव वगून घ्या एकेकाचे!"

वोलता, वोलता तो पच्दिशी थुंकतो. पांढऱ्या-शुभ्र चुन्यानं सारवलेल्या भिंतीवर लाल रंगाचं रोंगण चढतं. त्याच्या सासऱ्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरतं. क्षणभर म्हातारे, ओघळलेले ओठ नुसतेच थरथरत रहातात.

'हे वघा तुमच्याशी सोयरीक करण्याचा गाढव-पणा केलाय खरा. पण जरा तोंड सांभाळून वोला. कोठे वसलाहात ह्याचा विचार करा. तुमच्या महार-वाड्यातली भाषा इथे नको.'

"अरे, वारे सावकारा लईच माज आलाय कि! अरे, सुभानदादा म्हनतात मला. एका हातान कोंबडीची मान मुरगळावी तशी मानसाची मान मुरगळणारा मानुस हाय मी! आजपत्तुर कोनाचं आरेचं कारे

म्हनून घेतलं न्हाय. आणि तुझं म्हाताऱ्या खोकडाचं एक – दोन ऐकून घेईन व्हय ! '

एखादी चामडयाची वादी तडातड उडवावी तसे शब्दांचे आसूड तडतडत रहातात. घरादाराच्या चिंध्या, चिंध्या करू पहातात. कोपऱ्यातल्या अंधारात दिवाभीतासारखं तोंड लपवून बसलेल्या तिला आणखीच चोरटयासारखं होतं. अगदी आत, आत काहीतरी तडकल्यागत एक कोरडा घुसमटलेला हुंदका विचित्र आवाज करीत बाहेर फुटतो. आणि त्या लेकुरवाळया स्वयंपाकघरात आगंतुकासारखा तरंगत रहातो. त्या आवाजानं थोरल्या वहिनी संतापानं लाल होतात.

'काय ग अवदसे भरल्या घरात गळा कशाला काढतेयस ? आयशीन माझा संसार नासवला. आता लेक आलीय उरला सुरला हात फिरवायला. काय रडाय भेकायचं असेल ते बाहेर जाऊन. माझ्या भरल्या संसारात नकोत हे नतद्रष्ट चाळे.'

वर्षानुवर्ष ओठ दाबून उरातल्या उरात दडवून ठेवलेला क्षोभ, उसळी मारून बाहेर पडू पहात असतो. आयुष्यभराचं देणं फेडून घेत असल्याचं कडवट समाधान ओठावर विचूकपणे रेंगाळत असतं.

'ए, जरा सरक ग ! वरच्या फळीवरचा डबा काढायचाय मला.' जवळ आलेली वहिनींची थोरली सून तिच्यावर डाफरते. एखाद्या पावसात भिजल्या दिनवाण्या कुत्र्यान हाड म्हणताच उगीच थोड बाजूला सरकून परत तिथेच बसाव तशी ती थोडी बाजूला सरकते आणि परत तिथेच कोपऱ्यात अंगाच मुटकूळं करून बसते.

वहिनींची थोरली सून भराभरा प्रत्येक पोरापुढे लाडू, चिवडयाच्या वाटया ठेवते. आणि मग एका कळकट्ट ताटलीत अर्धा लाडू आणि घासभर चिवडा काढून तिच्या पोराच्या पुढयात सरकवते. एकवार सगळयांच्या वाटयांकडे नजर टाकून ते पोर चिमटी चिमटी लाडू पुरवून, पुरवून खाऊ लागतं.

बाहेरच्या खोलीत आगीच्या ठिणग्या उसळत रहाव्या तसे शब्दांचे स्फुल्लींग उसळत असतात. त्याची आंच तिलाच काय पण घरादारालाही जाणवायला लागते. कोल्हाटणीची पोरं, पैशाआड दडलेली पापं, इनामदाराचं रक्त असल्या शब्दांचा आणि शेलक्या शिव्यांचा एक अजगरी विळखा तिच्याभोवती करकचून कव घेतो. सारं शरीर आणि मन पिळून, पिळून निघून चिपाड व्हाव. पण एखादा जीवनकण कुठेतरी दांतात अन्नकण अडकून रहावा तसा अडकून रहावा तस तिचं मन आणि शरीर एक दुवळी उसळी घेत आणि परत निपचीत पडतं. मनात अनेक वर्ष सापासारखा फणा काढून पडलेला प्रश्न एक दुवळा डंख मारतो. पण बापाकडेही त्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं. आई तर आठवतच नव्हती. आठवत होता तो तिच्या शरीराच्या रंध्रारंध्रातून फुटणारा मादक स्त्रीगंध. तोच तेवढा लक्षात राहिला होता. आईची आठवण झाली की त्या गंधाच्या लाटा चारी बाजूंनी घोंगावत यायच्या. जीव गुदमरवून टाकायच्या. हल्ली, हल्ली त्या प्रश्नाचीही भिती वाटायला लागली होती. पोराच्या दिनवाण्या, पोरक्या डोळयात भिरभिरणारा तो प्रश्न. पोराला द्यायला तिच्याकडे तरी उत्तर कुठे होतं. खिडकीतून दिसणार जांभळीचं कीड लागलेलं झाड. त्याची प्रत्येक पुढली पिढी किडकीच निघाली होती. ही कीड तरी कधी संपणार होती ?

'आता मुकाटयानं उंबरा ओलांडा. नाही तर पायतणानं बडवीन. चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा हवी. नाही पाठवत मी तिला नांदायला. काय करायचं ते कर.' तिच्या बापाचा आवाज संतापानं, म्हातारपणानं चिरकतो. एखादा जीर्ण, जुना कपडा फाटावा तसा आवाज करीत फाटतो.

क्षणभर तिला आपला तोल जाईलसं वाटतं म्हणून ती पटकन् जवळच्या खांबाचा आधार घेते. तिच्या भारान तो जुनाट, जीर्ण खांब करकरतो. डळमळतो. त्या खांबाच्या आधारानं सावरू पहाणारं शरीर पूर्ववत भिंतीशी कलंडत.

तिच्या बापाच्या शब्दानं लोंढा फुटावा तसा तिच्या नवऱ्याचा संताप उसळतो.

'बरं, बरं बगून घेईन. तुजी अन् माजी बनली बर कारे इनामदारा ! गमज्या करतूस. घरदार खनून काडीन तुज. पैशाचा माज दावतूस तू. पण ध्येनात धर, तू काळ भुजंग डिवचलायस !'

एखादा रानहत्ती गर्जत सुटावा तसा तिचा नवरा गर्जत असतो. तोंडाला येतील त्या शिव्या तो गांवरान माणूस भसाभसा थुंकत जातो. आणि मधे,

मधे एखादं म्हातारं, वय झाल कुत्रं भुंकत रहावं तसा तिच्या बापाचा दुबळा आवाज लडबडत असतो.

आणि मधेच त्या साऱ्या कोलाहलावर थोरल्या वहिनींच्या लेकाचा पीळदार आवाज उमटून येतो.

'अरे, काय तमाशा मांडलाय तुम्ही लोकांनी ? अण्णा, तुम्हाला तरी काही लाज लज्जा ! अर्ध्या गोवऱ्या गेल्या मसणात तरी अजून अक्कल येत नाही. पोराबाळांनी भरलेल्या घरात आपण काय बोलतोय काय नाही ह्याचा तरी विचार करा. आणि अण्णा, मी तुम्हांला शेवटचं निक्षून सांगतोय. ह्या माणसाशी मला इतउप्पर कुठलाही संबंध नकोय. तुम्हाला ह्या घरात सुखानी रहायचं असेल तर, दोघांनाही आत्ताच लावून द्या. नाही तर मागनं तुम्हालाच पस्तावायची वेळ येईल, हे पक्कं ध्यानात धरा.'

धगधगत्या चुलखंडावर पाण्याचा हबका मारताच, नुसतंच धुमसतेपण मागे रहावं तशी बाहेरची खोली कोंदून येते. पाच दहा मिनट कसलातरी विचित्र ताण कोंडल्यासारखा साऱ्या घरभर लपलपत्या जिभांनी दबा धरून बसतो आणि स्वयंपाकघराच्या दाराशी खसखस ऐकू येते.

ती मान उचलते. कोरडे ठणठणीत डोळे बापाच्या शरीरावरून फिरतात. गुडघ्यात वांकलेला, थरथरत्या पायांचा बाप. त्याच्या घारट डोळ्यात कुठेतरी खोलवर दडून राहिलेली काळचाशार विचवाची निपचीत पडलेली नांगी. आणि रया गेल्या ओठातून फुटणारे शब्दांचे फुगे.

'जा पोरी जा त्याच्याबरोबर. शेवटी पोरीच्या जातीचं तेच हक्काचं घर. बाकी सारी अशीच चार दिवस टेकण्यापुरती. त्यातून देवही काही झोपला नाही. कधीतरी त्याचेही डोळे उघडतील. माझा आशीर्वाद आहे बेटा तुला. सुखाचे दिवस येतील. आणि शेवटी काय, 'अनंते ठेविले तैसेचि रहावे.' तक्रार करून काय उपयोग !'

त्या शब्दाच्या किनारीलाही न शिवता एखाद्या दगडी खांबावरून दृष्टी फिरवावी तशी ती बापाच्या अंगावरून नजर फिरवते. क्षणभर साऱ्या अंगावर दाट शेवाळ चढत असल्यागत ती शहारते. तिरस्कारानं, संतापानं तिचा जीव घुसमटून जातो. पण दुसऱ्या क्षणी थरारलेली कातडी झाडाच्या वाळल्या सालीसारखी होते. थोडा वेळ वाट बघून ती थरथरती, म्हातारी पावलं नागमोडी वळणानं बाहेर निघून जातात. त्या पावलांचा मागोवा घेणाऱ्या डोळ्यात ते नागमोडी वळण रुतून बसतं. अन् त्या वळणातूनच आयुष्याचा एक निर्णय तोंडावर कोणी पायपुसणं भिरकावून मारावा तसा भिरकावला जातो.

'आणखी दहा मिनटं देतोय मी. जास्त अंत पाहू नका.' बाहेरून वहिनींच्या लेकाचा हुकूम गलोलीतून सुटलेल्या दगडासारखा सणसणत येतो.

ती उठते. माजघरात जाऊन स्वतःची चार चिरगुटं गोळा करते. पोराचा हात धरते. आणि उंबरा ओलांडते. नवऱ्याच्या नालबंद, करकरत्या वहाणांच्या ठशांवर अनवाणी पावलं उमटवू लागते. एखादी सरळ रेषा काढावी तशी एका रेषेत जाणारी दृष्टी मागेपुढेही न वळवता ती धूळ उडवत रहाते. फक्त एकदाच हात उचलून कडोसरी चांचपते आणि पाऱ्याच्या गोळ्या जागेवर असल्याची खात्री करून घेते.

साहित्यिक, समाज आणि शासन

म. ना. लोही

जीवन हा एक अनादि–अनंत प्रवाह आहे. मानवी जीवन 'व्यक्तमध्य' असते. तरीही माणूस हाच सर्व शास्त्रांचा, तत्त्वप्रणालींचा आणि विज्ञानाचा सुद्धा केंद्रबिंदू आहे. अनादिकाळापासून आजपर्यंत जगातील प्रत्येक गोष्ट मानवाने मानवासाठी केलेली दिसते. मूलतः समाज हा मानवासाठी आहे. राज्य आणि राष्ट्र मानवासाठीच निर्माण झाले आहे. माणूस माणसाच्या उत्थानासाठी झटतो आणि तोच अधः-पतनास कारणीभूत होतो. हे असे का? हा वेगळ्या चिंतनाचा विषय आहे. तूर्त आपण विचार करणार आहोत तो सुखदुःखयुक्त मानवी जीवनाचा, द्रष्टा मानल्या जाणाऱ्या लेखकाचा समाजाशी व सरकारशी कसा संबंध असतो व तो कसा असावा, याचा. मला वाटते, आपण लेखक हा शब्द वापरण्याऐवजी साहित्यिक ही संज्ञा वापरावी. तद्वतच, साहित्यिक, समाज आणि सरकार या शब्दांच्या व्याप्तीवर चर्चा करण्याऐवजी रूढ अर्थानेच त्यांचा विचार करावा.

प्रत्येक माणसाची समाजाशी बांधिलकी असते. कारण समाजविरहित माणूस राहूच शकत नाही. साहित्यिक हासुद्धा समाजाचा एक घटक असतो. समाजाशी त्याची बांधिलकी अपरिहार्य आहे. प्रत्येकावर समाजाचे ऋण असते आणि ते आपापल्या परीने फेडण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. साहित्यिक हा इतरांपेक्षा वेगळा असतो. त्याच्या ठिकाणी प्रज्ञेच्या जोडीला प्रतिभा असते. त्याचबरोबर त्याची स्वतःची जीवनदृष्टी व प्रकृतीही असते. त्यांच्या सहाय्याने तो स्वतः जे जीवन जगतो, इतरांना जगताना बघतो, त्या अनुभूतीला प्रतिभेच्या स्पर्शाने कल्पनेच्या पातळीवर नेऊन साहित्याचे सृजन करीत असतो. वरवर पाहता हे सर्व विवेचन अगदीच प्राथमिक स्वरूपाचे वाटत असले तरी त्याचा संबंध साहित्यिकाचे इतर घटकांशी जे संबंध असतात किंवा असावेत त्याच्याशी आहे. साहित्यिक 'स्वांतसुखाय' लिहितो का? कदाचित् निर्मितीच्या काळात साहित्यसृजनाचा आनंद तो घेत असेलेही. पण साहित्यकृती जेव्हा ग्रंथरूपाने बाहेर पडते तेव्हा ती केवळ साहित्यिकाची राहात नाही. नाहीतरी साहित्यिक जे लिहितो, जे अभिव्यक्त करतो, ते समाजासाठीच असते.

साहित्य जीवनातून व जीवनासाठीच निर्माण होत असते. पण साहित्य म्हणजे केवळ जीवनाची छायाचित्र-वजा प्रतिकृती म्हणजे साहित्य नव्हे. साहित्य ही कला आहे. कला म्हटली की सौंदर्यनिर्मिती आलीच. खरा साहित्यिक उपेक्षित मानवांनाही उदात्त बनवून केवळ सुंदरच नव्हे तर अविस्मरणीय बनवू शकतो. शरच्चंद्र चटोपाध्याय, मुन्शी प्रेमचंद यांच्या कादंबऱ्या वाचताना याचा प्रत्यय येत नाही का? मराठीतही 'उपेक्षितांचे अंतरंग' आणि 'माणदेशी माणसं' लिहिणाऱ्या माटे मास्तरांनी व व्यंकटेश माडगूळकरांनी हेच कार्य केले आहे. आजचे बहुतांश लेखक मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातीलच असल्याने त्यांचे अनुभवविश्व मर्यादित असते. अलीकडे पुरोगामी म्हणवणारे काही लेखक मोठ्या हिरिरीने दीन — दरिद्री, पीडित — शोषित आणि दलित — बहिष्कृत यांच्याविषयी लिहू लागले आहेत. परंतु त्यांच्या लेखनात अतिरंजन दिसते. समाजाच्या खालच्या थरातील लोकांत दारिद्र्य, व्यसनाधीनता आणि स्वैराचार यांचा आढळ होत असला तरी त्यांच्याही जीवनात काही सद्गुणांचे अपवादाने का होईना दर्शन घडते. उलट आजचे मध्यमवर्गीय साहित्यिक या उपेक्षितांचे जीवनदर्शन घडवताना केवळ ग्राम्यता, बीभत्सपणा आणि हिंसाचार यावरच भर देतात. बागूल, खरात, अण्णाभाऊ, शेळके आदी मंडळी तळाच्या समाजजीवनाचे बव्हंशी वास्तव चित्र रंगवतात. हळूहळू बहुजनसमाजातून लेखक मंडळी पुढे येत आहेत. त्यांच्याकडून कसदार साहित्याची अपेक्षा करू या. अशा साहित्यातून वाचकांच्या सहृदयतेला आवाहन असावे, जीवनाचे वस्तुनिष्ठ दर्शन असावे (तरीही ते व्यक्तिनिष्ठ असतेच हा भाग वेगळा), प्रसंगी विद्रोह चालेल, फक्त विद्वेष नसावा,

प्रचाराचा पवित्रा नसावा. प्रचाराने साहित्याची गळचेपी होते, कला कलंकित होते. साहित्यिकांकडून समाजाची ही किमान अपेक्षा असते.

पण समाजाचीही काही जबाबदारी असते. साहित्यिक जे साहित्य निर्माण करतात ते उपकारक आहे की नाही, साहित्य म्हणवण्याच्या लायकीचे आहे की नाही, आणि तसेच दर्जेदार साहित्य वाचले जाते की नाही, वाचनाची रुची वाढते आहे की नाही ह्या गोष्टींकडे समाजनेत्यांनी जागरूकतेने पाहिले पाहिजे. समाजघटकाच्या केवळ आर्थिक वा राजकीय हक्कांसाठी जिवाचे रान करायचे पण बौद्धिक व भावनिक विकासाकडे दुर्लक्ष करायचे हे योग्य आहे का ? सध्या पूर्वीपेक्षा निदान शहरांतून वाचनाची गोडी वाढल्यासारखी दिसते. अर्थात् या वाचकांत नवशिक्षितांपेक्षा मध्यमवर्गीय पांढरपेशांचीच संख्या अधिक दिसते. शहरातील फिरत्या वाचनालयांद्वारे जे तथाकथित साहित्य घरोघर पोचवले जाते त्याला कधी बौद्धिक दर्जा असतो का ? चंद्रकांत काकोडकर, चंद्रकांत खोत, भाऊ पाध्ये किंवा बाबा कदम हे जे आजचे सामान्य वाचकांचे आवडते कादंबरीकार आहेत त्यांच्या लेखनातून ग्राम्यता, कामविकृती व पुष्कळदा अश्लीलता यांचे दर्शन होत नाही का ? यावर पुन्हा 'सेन्सार' नको अशी मागणी आहेच. सर्वच गोष्टी कायद्याने ठरवणे कितपत योग्य हा प्रश्न आहेच. पण समाजाचाही काही अधिकार असतोच. आणि समाजाचा घटक या नात्याने तो अधिकार साहित्यिकाला अमान्य करता येत नाही. पुष्कळदा सामंजस्याने समस्या सुटत नाहीत. अशा वेळी शासनाची गरज असते.

शासनाचे कार्य समाजाचे हितसंरक्षण हेच नव्हे का ? जोपर्यंत साहित्यिक सरकारच्या राष्ट्रहिताच्या कल्पनेला व धोरणाला सुरुंग लावीत नाही तोपर्यंत साहित्यिक व शासन यांचे संबंध जिव्हाळ्याचे असतील. लेखक कर्तव्यपराङमुख होतो तेव्हाच शासनाला त्याच्यावर नियंत्रण घालणे भाग पडते. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. शिवाय वैचारिक लेखन आणि ललित लेखन यांच्या कक्षाच वेगळ्या असल्याने क्वचित् वैचारिक लेखनावर नियंत्रण असले तरी ललित लेखनावर नसते याचा अर्थ असाही नव्हे की, ललित लेखनाच्या नावाखाली हीन प्रवृत्तीचा व अनीतीचा पुरस्कार होऊ लागला तरीही त्यावर नियंत्रण आणले जाऊ नये. सामान्यत: साहित्यिक निरंकुश असावा, स्वतंत्र असावा. पण शेवटी स्वातंत्र्यालाही किमान सामाजिक मर्यादा असतात. साहित्यिकाने आपली प्रज्ञा, प्रतिभा, माणुसकी आणि अस्मिता यांच्याशी इमान राखलेच पाहिजे. लेखकाची अनुभूती अस्सल असेल, हेतू निर्मळ असेल आणि दृष्टी सहृदयतेची असेल तर त्याच्या कार्यात दखल देण्याची कोणी हिंमत करणार नाही. म्हणजेच लेखक स्वयंशासित व स्वयंनियंत्रित असेल तर शासनाला त्याच्या वाटेला जाण्याचे प्रयोजनच काय ? मात्र समाजातील अपरिपक्व मनाच्या घटकांच्या अभिरुचीला अयोग्य वळण लावण्याचे 'पाप' जर कुण्या साहित्यिकाकडून घडत असेल तरीही समाजाने व पर्यायाने सरकारने गप्प बसावे का ?

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार वाढला. शतकानुशतके शिक्षणाची संधी नाकारल्या गेलेल्या वर्गातून ताज्या दमाचे, नव्या सामाजिक जाणिवा असलेले शिक्षित तरुण आता साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण करू लागले आहेत. त्यांच्या मनातील प्रक्षोभ साहित्याच्या रूपात उफाळून येऊ लागला आहे. परंपरेचा विध्वंस करावयास हा तरुणवर्ग पुढे सरसावत आहे. पण त्यांच्या माध्यमातून त्यांना ते उमजते कां ? यासाठी काय करता येण्यासारखे आहे ? 'नवसाहित्य' चांगले की वाईट हे काळ ठरवीलच. तथापि, नवसाहित्याच्या नावाखाली आज जे आत्मकेंद्री, दुर्बोध आणि परपुष्ट वाङमय निर्माण होत आहे त्याची 'अहोरूपं अहोध्वनी' अशी प्रशस्ती केली जात असली तरी ते समाजाला कितपत रुचते व समजते हा प्रश्नच आहे. हे वाङमय समाजाला धीर देण्याऐवजी; मार्गदर्शन करण्याऐवजी निराश व उदास बनवण्याचे कार्य करते. वास्तविक आजच्या लेखकाने अंतर्मुखतेबरोबर लोकाभिमुख बनण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. तरच लेखनाच्या माध्यमातून लोकशाही जीवनपद्धती, समता व बंधुता यांचा पुरस्कार यावर भर देऊन सामान्य माणसाला लोकशाही जीवनपद्धतीला पात्र बनविणे शक्य होईल. साहित्याने जीवननिष्ठा निर्माण केली पाहिजे. तिच्यातून सामाजिकता आणि राष्ट्रीयता निर्माण होईल.

साहित्यिक आणि पत्रकार हे दोघेही लेखन करीत असले तरी त्यांचे माध्यम भिन्न असते. तसे दोघेही विचारवंत असतात. पण पत्रकार विचाराद्वारे

वाचकांच्या भावनेला व बुद्धीला आव्हान देतो. उलट साहित्यिक भावनेच्या उद्दीपनातून वाचकांना विचार-प्रवृत्त करीत असतो. साहित्य अंतर्मुख बनवते तर वृत्तपत्रीय वाङ्मय बहिर्मुख बनवते. साहित्याद्वारे सामान्य व्यक्ती जीवनाला सामोरे जाण्याचे धैर्य व सामर्थ्य प्राप्त करीत असते. समाजाचा जीवनप्रवाह गढूळला असेल, किनारा सोडून मुक्तपणे भरकटत असेल तर व्यक्ती आणि शासन यांचे संरक्षण साहित्यिकच करू शकतात. पण समाजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव देऊन राजकीय वा आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्यही साहित्यात असते. अर्थात् प्रत्यक्षात असे घडल्याची उदाहरणे अपवादभूत असून एकूण तो प्रश्नच विवाद्य आहे.

साहित्यिक, समाज आणि शासन यांचे संबंध हे असे असतात, असावे अशी अपेक्षा असते. हा एक दृष्टिकोन आहे. या विषयाचे वेगळे पैलूही असू शकतील.

एक कविता

श्रीपाद भालचंद्र जोशी

"असे लपेटून घ्यावे बिनधोक किनारे
जसे डोंगरमाथ्यावर पेटून येतात, बिनधास,
पाखरांचे अकिंचन वारे
आणि हातात हात घालून चालावे एकमेकांच्या
म्हणजे कसे मिळवता येतात येथे दुरवरचेहि तारे"
--असे काहीसे खरडून तो कागदांपासून दूर गेला
मात्र शब्दगोंधळाचे अचूक निदान करणाऱ्या
तर्कशास्त्राच्या नेत्यांच्या जमातीचा संभवस्थ जन्मोदय
जोपासणाऱ्यांचे वर्तमान पुढारी
कसे पहाता पहाता स्वप्नपथकांचे मार्ग उलगडीत गेले
अन् तमाम स्वप्नांच्या कवायतीचे मैदानहि त्यांनी तयार केले,
आम जनतेच्या कल्याणासाठी
आता रस्तोरस्ती मोफत प्रयोगहि दाखविल्या जाण्याची
शक्यताहि नाकारता येत नाही,
अरे, या प्रदेशात स्वप्नांवर करहि आकारता येत नाही
समुद्र पोहून पक्षी कसे आरपार जातात
या पुढे त्यांना वाहतुक परवाने देण्यात येणार नाहीत
असे वक्तव्य अधिकृत गोटातून करण्यात आले आहे
असे म्हणतात.

क वि ता

कॉम्प्युटर

श्यामकांत कुळकर्णी

हनुमंताच्या उड्डाणाची गति
मोजण्याची तुझी ताकद !

पुष्पक विमानापेक्षा
जास्त प्रदेश पादाक्रांत
करण्याची तुझी झेप !

मोजलेल्या क्षणी
योजलेल्या संकेतस्थळी
चंद्राच्या पाठीवर
तू मानवाला, अलगद
पाऊल ठेवायला शिकवलंस !

मंगळावरील खडकातील पाण्याची
तिथल्या जीवसृष्टीची, संकृतीची
जाण तू करून देत आहेस !

चंद्र-मंगळच काय
साऱ्या नवग्रहांनाच
आपल्या तळहातावर
एका रांगेत बसवण्याची तुझी ईर्षा !

सहस्र वसुंधरांच्या
सहस्र शशांकांच्या अन्
सहस्र भास्करांच्या
सीमित क्षितीजांना
भेदून जाणारी तुझी नजर !

तुझी भूक मोठी आहे
ती शमवायला
तुला हव्यात, क्षणोक्षणी
कूटप्रश्नांच्या राशीच्या राशी !

बुद्धिमंतांमध्ये वरिष्ठ, कॉंप्युटेश्वरा !
'तल्लख मेंदूंमध्ये कॉंप्युटर मी आहे'
असं तुझं विभूतिमत्त्व आता
भगवंतांना सांगावं लागणार आहे !

पण.........
पण तुला कधीतरी
आमच्या नाडीच्या
आमच्या हृदयातल्या स्पंदनांचे
ललत जोगियांचे
स्वर ऐकू येणार आहेत का ?

आता तर
हव्या त्या देशातील
नियोजित शहरातील
विवक्षित स्थळी
स्वयंचलित प्रलयंकर
आण्विक क्षेपणास्त्र
पोहचण्याचं गणितही
तू मांडून ठेवलं आहेस !

केवळ
केवळ मानवी भावी हिताचंच
गणित मांडण्यापासून
कटाक्षानं अलिप्त – उदासीन
राहणाऱ्या कॉंप्युटेश्वरा !

तुझी ही विलक्षण अलिप्तता
निष्काम कर्मयोग्याची
अलिप्तता मात्र खचित नाही
....खचितच नाही !!

अनुक्रमणिका

कशाला ?

प्रमिला भिरुड

तू कशाला तुझ्या
कवितांची वही
मला देतोस ?

अरे मीच जर तुझी
कविता झाले आहे !

तर कशाला तू मला
तुझ्या कविता दाखवितोस ?

तुझ्या कवितातील भावभावना
मीच नव्हते का झाले ?

त्यातील प्रक्षुब्ध भावनांनी
अनेकदा भाजून निघाले !

शीतल चांदण्याच्या—
अमृत वर्षावात
न्हाऊन निघाले !

तुझ्या कवितांतील शब्दाशब्दांत
उमटलाय माझ्या
अंतःकरणाचा ठसा

नाजुक नि मुलायम
रंगांनी रंगलेलं
माझं तन नि मन
त्यातील शब्दागणिक
उमटलेलं असतांना

तुझ्या नि माझ्या
प्रीतीच्या बागेत
उमललेलं ते फूल
तू मला कशाला
कौतुकाने दाखवितोस ?

चक्र

उज्ज्वला पिंपळखरे

पहाटे पाचाला धोबीघाटावरचा कोंबडा आरवला की शिवामाळी नुक्ताच दापोलीहून मुंबईला आपल्याकडे रहायला आलेल्या आपल्या पुतण्याला उठवायचा प्रयत्न करी. "अरे काश्या उठ की! दूधाची लाईन लागलीय बघ. काय दांडगी झोप." काशीरामाला तो उठवित असतांना त्याची बायको शेवंता आणि मुलगा बारक्या रोजच्या सवयीमुळें चटकन उठत; आदलें रात्रीं निजण्यापूर्वी उशागतीला ठेवलेल्या दुधाच्या बाटल्या, रुमालांत बांधलेले पैसे दूधाची पत्र्याची कार्डे बांधलेलें छोटे क्रेट घेऊन तीं दोघं चालत दूधाच्या केंद्राकडे जायची. काशीराम त्यांच्या पाठोपाठ जाऊन दूधाच्या लाईनीजवळच फूटपाथवर बसून रहायचा. एकदा दोनदा तो पण दूधाच्या लाईनीत उभा राहिला होता; चार बाटल्याचें असे दोन क्रेट त्याच्याजवळ होते. खिशांत दूधासाठी जमा झालेले रुपये पण होते. लाईनीबरोबर तोहि पुढे सरकत होता. केंद्रातल्या खुर्चीत वसणाऱ्या बुढ्या चाचानं काशीरामचा नवखेपणा हेरला. "ए छोकरा पागल है क्या? कैसा काम करता है?"

काशीरामवर तो खेकसला पण काशीरामाला हिंदी बोलता येत नव्हतं की काही समजत नव्हतं! भोवतालचे चार पोरेगडी "क्या हुवा? क्या हुवा?" विचारू लागली. जरा गोंधळ माजला आहे असं पाहून बुढ्या चाचानं काऊंटरवरच्या खिडकीवर काशीरामने दिलेल्या रुपयांच्या नोटेतली एक नोट अगदीं हातचलाखीनें आपल्या खिशांत टाकली. तोच उलट आरडाओरडा करू लागला, "ये नया छोकरा आया है, उसको हिंदी बोली आती नही, काम भी मालूम नही. पाच होल मिल्क का छ रुपया पचास पैसा देना चाहिए? एक रुपया कम दिया है! जाव एक रुपया ले आव." .त्याचा चुलत भाऊ — बारक्या खूपच मागे होता. तोपण काशीरामजवळ आला. एक रुपया त्यानं घरून आणल्यावर सारं नीट निस्तरलं! मागली माणसं पुढे जाऊन दूधाच्या बाटल्या घेऊ लागली. ...आणखी एकदा कोणी तरी त्याच्या जवळची रिकामी बाटली पहाता पहाता चोरली...तेव्हापासून शेवंता आणि बारक्या पैसे व दूधाच्या भरलेल्या बाटल्यांचे काम स्वत: करू लागली. बारक्या व शेवंता लाईनीत उभे रहात. वीस बाटल्या त्यांच्या ताब्यात आल्यावर काशीराम आणि ती दोघं मिळून ते क्रेट आपल्या घरीं आणीत; मग ते बाटल्यांचें वाटप करीत. पार्क क्लबचा माळी म्हणून क्लबच्या आवारात एका कोपऱ्यात शिवाला छोटंसं कौलारू झोपडीवजा घर रहायला मिळालं होतं. शिवा माळी दापोलीचा रहाणारा; दापोलीत त्याच्या थोरल्या दादाची व त्याची वडीलोपार्जित अशी थोडीशी शेतीवाडी होती. दादाचं नुक्तंच पत्रं आलं होतं, "अवंदा हतं शेतीचं पीक रुपयाला दोन आनं बी न्हाई. तरी पन तुमी योक काम केल्यास आमचेवर लई उपकार व्हतील. माज्या काशीरामाला आपल्या सावंत संग तुमच्यापाशीं धाडत हाय. त्याला तुमच्या वळखीनं नोकरीत चिकटवून द्यावा." .त्याप्रमाणें महिन्यापूर्वी काशीराम शिवाच्या घरीं आल्यावर त्यानं काशीरामाला पार्क क्लबांत 'बॉय'च्या नोकरीत चिकटवून दिलं होतं. मुंबईत काशीरामाचा हा पहिलाच मुक्काम होता. इथं सकाळ पासनं सारं निराळंच जीवन सुरू व्हायचं!

दूधाच्या सीलबंद बाटल्या गिऱ्हाईकांच्या घरीं पोचविण्यापूर्वी शेवंता हलक्या हातानं बाटल्यांची झाकणं काढून त्यातनं दोन दोन डावभर दूध काढल्यावर बाटलीत जरा पाणी मिसळून हलक्या हातानं बाटल्यांची झाकणे अगदी बेमालूम बसवून देई. ती आणि बारक्या वाटप करायला जात, त्यावेळी तोंड धुतल्यावर काशीराम क्लबाच्या आवारातलं नळाचं पाणी बादलीनं भरून आणून घरातली पाण्याची साठी भरण्याचं काम करी.

शिवा स्टो पेटवून त्यावर चहाचं आधण ठेवी .नंतर त्यांतच दूध ओतून आधणाला उतरवून ठेवी. . .अच्छेर दूधाचं पातेलं तापत ठेवी. कधीं कधीं काशीरामला चहाचं काम करावं लागे. 'जनता स्टो'च्या बारा वातींची त्याला फार मजा वाटे. त्याकडे पहात असताना त्याला दापोलीमधल्या आपल्या घरची चूल, चुलीतला लालसर ज्वाळ आठवायचा. . . या आठवणींत रमल्यामुळें त्याच्या हातानं एक दोन वेळा पातेलीतलं दूध उतास गेल्यावर शिवानं काशीरामच्या पाठीत रट्टा हाणला होता. तेव्हापासनं तो स्टोचं काम सावध चित्तानं करू लागला. चहा झाल्यावर नळाखालीं गार पाण्यानं स्नान करायची त्याची जुनी सवय होती. त्यानंतर चावी घेऊन तो क्लबचं कुलूप उघडून दारंखिडक्या उघडून ठेवी. क्लबची झाडलोट करी.

पार्क क्लब तसा छोटासाच होता. गावाबाहेरच्या टोकाला नारळीच्या बनात तो असल्यामुळे दुरून तर तो लपल्यासारखाच वाटे. क्लबच्या लगतच समुद्र-किनारा होता. त्यामुळे क्लबात समुद्राचा वारा खेळता असायचा. काशीराम इथं फुल टाईम बॉय म्हणून लागला होता. शिवाय संध्याकाळीं चार ते आठ वाजेपर्यंत बारक्या, राजा, गंप्या ही पार्ट-टाईम बॉईज होती. या सर्वात काशीरामला 'काम' बरंच होतं ! सकाळीं सहाच्या सुमाराला त्याला क्लबाच्या कामाला जुंपावं लागे.

क्लबात आदले रात्रीच्या खुर्च्या-टेबलें वेडचा वाकडचा पद्धतीनं ठेवलेल्या असायच्या; त्याला ते सारं नीट जुळवून ठेवावं लागे. सिगरेटची थोटकं, कोपऱ्यात पडून राहिलेली कपबशी, फुटलेल्या ग्लासचे तुकडे त्याला गोळा करावे लागत. रात्रीं क्लबात अगदी उशीरापर्यंत बसणारे मेंबर म्हणजे म्हातारा जिमी दारूवाला आणि बायको सोडून गेल्यामुळें विचित्र वागणारा प्रो. गिडवानी. दोघेहि तिथं बुद्धिबळ खेळायचे; दोघंहि पार्क-वे हॉटेलमधून आपल्या रात्रीच्या जेवणाचें टिफीन बॉक्स पार्क क्लबात माग-वायचे. रात्रीं १०॥ ला जेवण झाल्यावर जरा गप्पा-गोष्टी झाल्या कीं गिडवानी आणि दारुवाला उठायचे. दारुवाल्याच्या मोटारीतून गिडवानी जायचा.

सकाळीं क्लबात आल्याबरोबर काशीराम आदले रात्रीचें ते खरकटयात पडलेले टिफीन बॉक्स घासून पुसून कोरडे करून ठेवायचा. पार्क-वे हॉटेलचा नोकर डिमेलो सकाळी आठाला येऊन ते दोन टिफीन बॉक्स न्यायचा आणि रात्रीं ते भरून नवाच्या सुमाराला आणून द्यायचा; सकाळीं घासून पुसून कोरडे केले तरी त्या "अलुमिनियम"च्या पुडांना मसाल्याचा सुंदर वास यायचा. तो वास हुंगल्यानंतरच काशीराम ते डिमेलोच्या ताब्यांत आणून देई. एकदा मात्र तो हा वास हुंगत असताना क्लबमध्ये चहापाणी, भजी बनवून देणारा यंकण्णा तिथं यायला नेमकी गाठ पडली. यंकण्णानं काशीरामला डोक्यावर टप्पू दिला होता.

आजहि आत्ता झाडलोट करताना हातातलें काम बाजूला सारून काशीराम फेमीना, फिल्मफेअर मधल्या बायांची चित्रं पहात उभा राहिला. यंकण्णा त्याच्यावर लगेच ओरडला. "काशीराम चित्रं काय बघत बसलास ? आत्ता मॉर्निंग वॉक नंतर आपले काहीं मेंबर लोक आत्ता इथं येऊन बसतील ना. लौकर झाडू मार, आटप लौकर. तो पेन्शनर कुलकर्णी मोठा खवीस आहे. आपल्या जाधव सेक्रेटरीला सरळ रिपोर्ट करील की सकाळी इथं सिगरेटची थोटकं, बिअरच्या रिकाम्या बाटल्या कोणी वेळेवर उचलत नाय." यंकण्णा काशीरामला दम देत म्हणाला.

"यंकण्णा, ती बीर म्हंजे काय असतं रे? त्यो गोरा, धारा सायब हाय ना, त्यो हतं आला की सारा येळ पियाचा गिलास सोडत नाय. कुनी त्येन्ला गायला सांगतं, मग लई सुंदर गात ऱ्हातो."

"अरे पुरे रे ! ते बघ, आपल्या पहिल्या बारीचें मेंबर आत शिरले ना ! बघतोस काय, आटप !"

जवळपास रहाणाऱ्या पाचसहा पेन्शनरांचें टोळके सकाळचें फिरणें संपवून क्लबात येतात.

"अप्पासाहेब, आमचा प्रकाश सिडनेला असतो. आम्ही त्याच्याकडे नुक्तंच जाऊन आलो. अहो सिडने म्हणजे नंदनवन. लोकं सुद्धा बोलायला किती चांगली. मदतीला तत्पर. आपल्याकडे तर काय उर्मटपणा हा राष्ट्रीय गुण ठरला आहे." निमकर मनापासून सांगत होते.

"अहो पण तिकडली महागाई पण तशीच आहे माझा पुतण्या लिहितो ना आमच्याकडे कांदे-बटाटे १० रु. किलो भावानं विकलें जातात" .जोशी !

" डोंट वरी – आपल्याकडे पण तीच महागाई होणार आहे! लागणारा भाजीपाला फळं नारळ एक्सपोर्ट करायचें आणि देशातलें लोक उपाशी ठेवायचें. रोजच्या लागणाऱ्या वस्तू काळचा भावानं विकायच्या! बसवर नुस्त्या घोषणा. शिस्तीमुळें राष्ट्र मोठे बनते."

सारीजण हसतात. त्यांच्यातले अप्पासाहेब काळे उदार! " ए छोकरा सहा कप चहा आण. झटकन आण." ..चहा पिताना परत मघासारख्या गप्पा रंगतात. टाकळकर आपल्या चिकणी सुपारीची खांडे सर्वांना देतात. नरवणे सुपारी खात नाहीत. त्यांना सिगारेट हवी असते, पण त्यांच्या ज़वळच्या सिगरेटी संपलेल्या असतात. "अरे ए, जरा इकडे ये." ते काशीरामला बोलावतात. काशीराम त्यांच्या पलिकडच्या खुर्चीच्या पाठीला हात टेकवून उभा रहातो. चौदा पंधरा वय।च्या काशीरामाला पाहून त्यांना त्यांचा सर्वात धाकटा भाऊ आठवतो...बबन घरातनं पळून गेला तेव्हा तो या पोऱ्याइतकाच वयानं होता. किती वर्षं उलटून गेलीत! आता बबन कुठें असेल? काय करीत असेल? पण मनातले विचार पार घालवून टाकण्यासाठीं नरवणे मान हलवितात. " तुझं नाव काय रे?" ते त्याला विचारतात.

" काशीराम जगन्नाथ नाईक "

" कोपऱ्यावरच्या इराण्याकडनं मला एक चार मिनार पाकीट आणून दे रे. हे घे पैसे!" ते त्याच्याजवळ पाच रुपयांची नोट देतात.

काशीराम पाच मिनिटांत परत आल्यावर त्यानं चार मिनार सिगरेट पाकीट आणि उरलेली चिल्लर नरवणेंना दिली. नरवणे त्याला आठ आणे हातावर ठेऊ लागल्यावर 'हे घे तुला बक्षिस' म्हणाले.

" साहेब, मला कशापायीं बक्षिस? मी तर काय पन काम क्येलं नाय" काशीराम मागे हात घेत म्हणाला.

नरवणे कौतुकानं हसतात. " मुंबईत अजून नवखा आहेस हं तूं! कुठल्या रे गावचा?"

" मी दापोलीचा! हतं कामाला लागून मला म्हईना व्हईल."

" काशीराम, जरा इकडे ये" कुणीतरी त्याला मागल्या व्हरांड्यात हाक मारली म्हणून तो तिकडे गेला.

चहापानानंतर ही पेन्शनर मंडळी उठतात, गप्पा मारीत बाहेर पडतात. ब्रेडवाला मोठ्या आकाराचे ब्रेड देऊन जातो. पोस्टमन पत्रं दिल्यावर यंकण्णाशीं गप्पा करून जातो. थोडा वेळ क्लबांत आहोटीच्या वेळची शांतता असते. काशीराम खुर्च्या परत जुळवून ठेवतो. दहाच्या सुमाराला येणारे बोरकरकाका, एक डोळा लिमये, जर्मन जोशी (क्लबात सारीजणं त्यांना जर्मन जोशी म्हणतात.) ही मंडळी येतात. या साऱ्यांना वर्तमानपत्रं, मासिकं वाचायला हवीं असतात. त्यातल्या जाहिरातींचं वाचन हे मुख्य! वधू पाहिजे, विकणें आहे येथपासून ते नोकऱ्या, हरविलें आहे, गृह्यसंस्कार येथपर्यंत साऱ्या जाहिराती वाचून त्यांच्यावर चर्चा.

यांच्या पाठोपाठच मेंबरांची दुसरी एक लाट क्लबांत येते. पण हें फारसें न बोलणारे, पैशानीं चांगल्या स्थितीतलें सेवानिवृत्त उच्च वर्गातलें असतात. ते ब्रिज खेळायला लगेच सुरवात करतात. त्यांच्या वागण्यात – ब्रिज खेळण्यांतहि जरा शिष्टपणा दिसून येतो.

रमी मात्र बरीचजणं खेळतात. या रमी खेळणाऱ्यांचेंहि दोन चार गट होते. मिसेस चोकसी, रतन मुनशी, म्हात्रे, डॉ. सालगावकर ही मंडळी सकाळ संध्याकाळ रमी खेळायची. शिदुकाला पेंडसे, राजे, बोरगांवकर, गानू, वाटवे ही मंडळी फक्त संध्याकाळी रमी खेळावयाची. वाटवे उत्तम खेळणारा. बाकीचें त्याला म्हणायचे, " वाटवे, तुझ्याजवळ गुप्त ब्लेड आहे. तूं आमचें सर्वांचें खिसे खेळताना कातरतोस हं." मिसेस चोकसी सत्तरीची होती पण सोळा वर्षाच्या मुलीला शोभणाऱ्या उत्साहानं रमी खेळायला यायची ...सर्वांशीं मिश्किल विनोदानं बोलून साऱ्यांची करमणुक करायची.

रमी टेबलापाशी उभं राहून त्या सर्वांचं पते पिसणे, गप्पा, पानं टाकणं हे पहाता यावं यासाठीं काशीरामची धडपड असे. संध्याकाळचा खेळ पहात रहाणं त्याला जमत नसे. पण सकाळीं १०॥, ११ ला ही रमी पार्टी खेळायला बसली कीं काशीराम त्यांच्या हुकमाची वाट पहायचा. " साहेब, पाणी? 'साहेब चहाची ऑर्डर!" ...मिसेस चोकसी, मुनशी, म्हात्रे वगैरे मंडळींना साडे अकराला चहा हवा असे. बोरगावकरांना बिनसाखरेची कॉफी हवी असे.

पण आपल्या गटातलें दुसरे कोणी कॉफी देतात कां हे पाहून मग ते कॉफीची ऑर्डर करीत... "छोकरा पाच कप कॉफी लाव." पण ते सुद्धा क्वचित ! "ताल्या आज लई मोट्टा माणस झालास रे तू ! समद्यांना कॉफी ? औज सूं छे ?" मिसेस चोकसी त्याला म्हणायची.

मग कांहींतरी निमित्त बोरगावकर सांगायचे "आजची कॉफी ना ? माझ्या मुलीला मुलगा झालाय त्यासाठीं आहे. मुलगी आणि जावई कॅनडात असतात. तिकडेच मुलीची डिलीव्हरी झाली. आज तोंड गोड करावं म्हणून कॉफी ! पण छोकरा, मला बिनसाखरेची कॉफी आण ! तूं पण कॉफी पी.".

"गॉड ब्लेस हर अॅन्ड हर चाईल्ड !" असें म्हणत मिसेस चोकसीनं समोर आलेली कॉफी घेतली. आपल्या पर्समधनं एक गोळी काढून तिनं गटकन् गिळली. त्यावर कॉपी पिऊन संपवली . रिकामे कपबशा गोळा करून काशीरामने किचनमध्यें नेल्या.

"काशीराम मघाचें धुतलेले कप या इथं ठेवायची जागा आहे ? तो बघ तुझ्या हातानं कपाचा कान तुटला ना ? आता जाधव सेक्रेटरी माझ्या नावानं खडे फोडील. एका कपाला दोन रुपये पडतात." यंकण्णानं काशीरामचा कान पिरगळला.

"काय ह्यो कपाला दोन रुपये ! व व व." धरलेला आपला कान सोडवित काशीराम म्हणाला. "इतकं किंमती कप कशापायी वापरावं !" त्याच्या मनात आलं पण तो हे बोलला नाहीं.

"काशीराम कहाँ है ! बरफ कौन लेगा !" भुशानं माखलेलें बर्फाचें मोठाले चौकोनी खडे घरपोच करणारी बैलगाडी रस्त्यावर उभी होती. गाडीवानानें तरटात गुंडाळून एक मोठा चौकोनी तुकडा क्लबच्या किचन शेजारच्या व्हरांड्यांत धप्पकन ठेवला.

त्याचें जरासे तुकडे करून काशीरामानें आईस-बॉक्स खोलून त्यांत तें भरलें. बर्फाचा एकादा लहान तुकडा तोंडात टाकायची त्याला नेहेमी इच्छा व्हायची. पण त्यानं कधी तसं तोंडात टाकलं नाहीं..खरं म्हणजे त्याला या वेळेला भाकरी आणि कालवणाची कडकडीत भूक लागलेली असायची. पण इथं भाकरी थोडाच मिळणार ! किचनच्या जाळीच्या कपाटांत आदले दिवशींचा उरलेला पाव व भजी असायची. यंकण्णा स्वत: हेंच खायचा आणि काशीरामला पण हेच पोटभर जेवण ! सकाळचा उरलेला चहाचा एक गरम कप पण यावरोबर त्याला मिळे. पावाचें कोरडे तुकडे खातांना काशीरामची भूकहि नाहींशी व्हायची. कसेंतरी चार घास गिळून तो चहाचे कप पिऊन टाकी. क्लबाच्या बाहेरच्या मुख्ये फाटकाशीं एव्हांना ३,४ मंडळींच्या मोटारी येऊन थांबायच्या, त्यातून झकपक कपडे केलेली मंडळी उतरून क्लबमध्ये यायची. ही सारी १॥,२ वाजेपासून साडेपाचपर्यंत क्लबात बसायची. त्याच्या-तल्या एका गोऱ्या, पांढऱ्याफक्क केसाच्या माणसाच्या हातात जाडजूड इकनॉमिक टाईम्सचा अंक असायचा. ही मंडळी बसल्यावरोबर त्यांना तहान लागलेली असायचीच.

"अे छोकरा, जरा ठंडा पानी लाव."

"जरा पंखा फास्ट चलाव."

"आजे तो गरमी वधारे लागे !"

असं थोडसं संभाषण झाल्यावर त्यांच्या आकडे-मोडी चालू होत. "किशोरभाई, टाटा केमिकल्सनु भाव वधीगयु छे ! कई बोनस शेअर मळसे एवी न्युज छे."

"अहमदावाद इलेक्ट्रीकनुं भाव तो एकदम डाऊन छे !" दुसरा डोळे मिटत म्हणाला, "नवल नथी मारो ब्लड प्रेशर वधीगयुं."

बाकीचे हसतात.

"गुजरात फर्टीलायझरनुं expansion थवानुं छे के नथी ? चिमणभाई कहेता हता --"

काशीरामाला त्यांचं बोलणं कोड्याप्रमाणें वाटत होतं. एकदा त्याला वाटलं, यंकण्णालाच विचारावं, "कायरे ही सारी मानसं कसली आकडेमोड करत्यात ? चोर तर नाय ?" पण तो हें विचारायला धजवत नाहीं...चार दिवसापूर्वीची गोष्ट, संध्या-काळचें सात, साडेसात वाजलें असावें. मेंबरानी क्लब अगदीं भरला होता. सगळीकडे गर्दी. .बार भरून गेलेला...बिलीयर्ड रूममध्यें डॉ माने आणि शिरोड-कर बिलीयर्डस् खेळत होते. दर टर्नला डॉ. माने २००, ३०० पाईंटस् मिळवायचें...त्यांचा सफाईदार खेळ पाहून काशीराम मागल्या व्हरांड्यात कशासाठी तरी आला असताना एक झगेवाली मोलकरीण त्याला पाहून विचारू लागली, "डॉ. मानेसाहब कहाँ है ? उनको जरा बता देना है" .काशीरामानें गंप्याला

बोलावून आणले. त्या झगेवाल्या आयानं गंप्याला सांगितलं "रशीदा मेमसावनं डॉ. मानेसाव को जल्दी बुलाया है! इतना कहने से उनको पता लग जायेगा."

गंप्यानं डॉ. माने यांना हा निरोप सांगितल्या-बरोबर डॉ. मानेनीं हातातली स्टिक ठेऊन दिली आणि ते जलदीनें क्लबातनं बाहेर पडले. क्लब–सेक्रेटरी जाधव पाठमोऱ्या, दूर गेलेल्या डॉ. मानेकडे पाहून डोळे मिचकावून हसला. त्याने कोपऱ्यावरच्या घराकडे वाकवाकून पाहिलं आणि मुद्दाम गुणगुणल्यासारखं केलं "...बरखारानी, जरा झुमकर बरसो."

काशीरामला हे सारं फारच नवलपूर्ण वाटलं! तो किचनमधले चहाचे कप बाहेर नेत असताना जरा थांबून यंकण्णाला विचारू लागला, "यंकण्णा, रशीदा कौन हाय रें?" यंकण्णा कांदे चिरीत होता. त्यानं हसून उत्तर दिलं, "रशीदा ना? अस्मानचा तारा आहे, गुलाबाचं सुंदर फूल आहे."

"कुंठल्या बागेतलं रे? मला दाखवशील?" काशीराम

"तुला रशीदा पहायचीय होय? थांब तुझ्या काकालाच सांगतो"...त्याचं हे बोलणं वारक्याच्या कानावर गेलं! वारक्या पण हसायला लागला. तरी काशीरामाला कळेना की गुलाबाचं फूल पहायचंय म्हटल्यावर इतकं काय झालं?

या प्रसंगा नंतर त्याच्या शिवानंच त्याला दम दिला. "काश्या, दादानं तुला हतं पाठवलंय ते चार पैसे कमवायला! आपुन आपलं सम्हालून न्हायचं. वारक्यानं मला संमदं सांगितलय. तूं सांजचा समुंदरावर जाऊन बसतोस. तेपन माज्या कानावर आलंय्. अरे, समुंद्रावर जोडपी बसतात. आपुन तकडं बसूपन नये."

काशीरामनं खालच्या मानेनं हे सर्व ऐकलं म्हणूनच त्यानं यंकण्णाला शेअर्सच्या गप्पा करणाऱ्या मेंबरबद्दल कांहींच विचारलं नाहीं.

संध्याकाळ होऊ लागली अन् मेंबर लोकांची गर्दी वाढू लागली. वारक्या, राजा, गंप्या ही शाळा संपल्यावर इथं पार्ट टाईम कामाला संध्याकाळी यायची. क्लबात काम करून ती तरबेज झालीं होती. कपवशा धुवायचं काम कसं टाळायचं, रानडे साहेब, मूर्ति साहेब, राजे डॉक्टर वगैरे मंडळींची कोणती कामं केली कीं टिप् मिळते, टॅक्सी आणून दिली, सिगरेट पाकीट विकत आणून दिलं कीं बक्षिस मिळवायसाठीं कसं रेंगाळायचं हे सारं त्यांना माहित! म्हणूनच ते काशीरामला आपल्या जवळ फिरकू देत नसत. त्यामुळें काशीरामला संध्याकाळपासून रात्रीपर्यंत कपबश्या विसळत उभे रहावं लागे. पलीकडेच यंकण्णा एका स्टोवर चहाचं आधण उकळत ठेवी; दुसऱ्या स्टोवर भज्यांचा घाणा चालू असे. 'स्टो'च्या आवा-जानं आणि भज्यांच्या तेलकट वासानं त्याचं डोकं दुखायला लागे.

मघाशी कुणीतरी त्याला सांगितलं होतं, "अरे काशीराम बाहेर सोनवणे बसलेत, त्यांना पानपट्टी हवीय आहे."

किचनमधून हात पुसून काशीराम सोनवण्यांच्या खुर्चीपाशी गेला. त्यानं आदबीनं विचारलं, "काय आणू साहेब?"

"बरं झालं कोणी तरी आहे जागेवर! अरे, समुद्रावर दिलखुश पान मिळतं. पानवाल्याला स्पेशल पट्टी म्हणायचं म्हणजे तो देतो. हे घे आठ आणे."

आठ आणे घेऊन काशीराम समुद्रावर गेला. चार पाच मिनिटांनीं त्याला दिलखुश पानवाला दिसला. हा त्याच्याजवळ गेल्यावर त्यानं त्याला सांगितलं, "स्पेशल पट्टी दे! एकच हवीय. किती पडतात? आठ आणे ना?"

पानवाला जरा रंगेल माणूस होता! त्यानं स्पेशल पट्टी कागदात गुंडाळून काशीरामला विचारलं. "यार, तुमको स्पेशल पट्टी खिलाऊँ? जरा मौजमजा करनी है?"

काशीरामनं मान हलवून नाहीं सांगितलं!

"अरे दोस्त, शरमाते क्यों? मैं खिलाऊँ? मेरेसे लो–" काशीरामनं आठ आणे त्याच्यासमोर ठेऊन कागदाची ती घडी उचलली आणि मुकाट्यानं तो तिथून निघाला.

थोडया अंतरावर गेल्यावर, त्याला समुद्राकडे पहात जरा बसायची इच्छा झाल्यामुळे तो वाळूवर बसला. घरची फारच आठवण झाली कीं पुष्कळदा संध्याकाळीं वेळात वेळ काढून तो समुद्रावर येऊन पाच दहा मिनिटं बसायचा, भोवताली मुलं खेळत असायची; तरुण जोडपी एकमेकांत मशगुल झालेली असायची. त्यात बसलेला असूनहि काशीराम समुद्राकडे

पहात बसायचा...आजहि तो वाळूवर एकटाच बसला होता. 'आई, ही शहरातली नोकरी नुको. गावी मी उपाशी न्हाऊन काम करीन पन हतं न्हायला नुको'..या विचारानं तो उदास मनानं तिथं बसलेला असताना 'चंपी' 'चंपी' करीत एकजण त्याच्या-समोर आला. त्या इसमाच्या हातात तेलाची बाटली होती.

"दोस्त चंपी करून देऊ ?" त्यानं काशीरामच्या खांद्यावर हातं ठेवून विचारलं. पण काशीरामनं मान फिरवली. आपल्या कानातला अत्तराचा फाया काढून त्या इसमानं काशीरामाच्या हाताला थोडं अत्तर लावलं.. "माझ्या खोलीवर चल ना, चल. चंपी करून देतो. जरा बघ. मग असं रडकं तोंड करणार नाहीस."

काशीराम मात्र तिथून उठला. आता इथं फार वेळ बसलो तर आणखी कोणी आपला पाठलाग मात्र करतील या विचारानं तो चालू लागला. त्याला इतकं उदास वाटत होतं की क्लबच्या आत जायची इच्छाच वाटत नव्हती.

इतक्यात एक विदेशी तरुण जोडपं त्याच्या मागनं येऊन जरा पुढे गेलं. या दोघांचेहि भगवे कपडे, गळयात रुद्राक्षाच्या माळा, पायात लाकडी खडावा यामुळें ते जोडपं गमतीदार वाटत होतं. क्लबाच्या मागल्या बाजूच्या विकेट गेटनं ती दोघं आत शिरली.

काशीरामला नवल वाटलं. आपल्या घराकडे यांचं काय काम ? त्याला कळेना. मग कळलं...ती दोघं तिथल्या आंब्याच्या झाडाखालीं छोटया लाकडी देव्हाऱ्याकडे वळली...शेवंताला समुद्रावर एकदा गणपतीची दगडी मूर्ति सापडली होती ती तिनं आंब्याखाली एका लाकडी देव्हाऱ्यांत ठेवली होती. जवळ रहाणाऱ्या कमाताई, मणीबेन, काशीवाई या गणपतीच्या दर्शनाला येत तसेच हे विदेशी जोडपं पण आलं होतं.

गणपतीसमोर हात जोडून ती दोघं जरा वेळ उभी राहिल्यानंतर विकेट गेटनं बाहेर पडली. का कोण जाणे, काशीरामहि अंब्याच्या झाडाखालीं गेला. हात जोडून तो मनात म्हणाला. "मोरया, यंदा तरी गावीं चांगला पाऊस पडू दे; पीकपाणी चांगलं येऊ दे रे बाप्पा." ..त्याचा घसा दाटून आला. हातातल्या स्पेशल पट्टीची त्याला आठवण झाली, आणि तो तिथनं क्लबाकडे वळला.

हरवलेले बालपण

प्रतिभा नारायण

समोरच्या डोंगराच्या गर्द झाडीत,
हरवले केव्हाच माझे बालपण
आज इतकी वर्षे झाली तरी,
शोधावसे वाटते परोपरी
मध्येच घालते वाटते साद,
'मी कु ऽ ठे' म्हणून घुमतोय नाद.
धावत जाऊन पाहता पाहता;
विरत चालली आयुष्यगाथा,
ते माझे बालपण, मऊ सायीसारखे
उडून गेले कापसासारखे;
आता भरते मनाला कापरे;
या शोधाशोधीत होईल शरीर म्हातारे.
अन् मग कुठल्याशा अनामिक नादाआडून;
येईल त्याची साद;
'मी आऽलोय तुझे बालपण
घे ना उचलून कवेत मला.'
त्याला पकडता पकडता पुनः
होईल ते परके.
अंधुकले डोळे, बधिरले कान ओळखतील;
अरे, ही तर मृत्यूची तान!

....एक काळ ऐसा होता!

श्री. ना. बनहट्टी

('युगवाणी' दिवाळी अंकावरून पुढे चालू)

गुजरातेतील गमती

बी. ए. झाल्यानंतर नानांनी काही महिने मुंबईस एका हायस्कुलात शिक्षकाची नोकरी केली आणि नंतर अमदावादेस गुजरात कॉलेजात वर्ड-स्वर्थच्या पुरस्काराने ते दक्षिणा फेलो म्हणून गेले. पुढे १८८८ च्या मार्चमध्ये फेलोशिप संपल्यामुळे ते मुंबईस परत आले असे वृत्तांतात लिहिले आहे. फेलो-शिप तीन वर्षे होती, असेही ते लिहितात. पण १८८४ च्या जुलैपासून १८८८ च्या मार्चपर्यंत पावणे चार वर्षे होतात. इथे वर्षांच्या हिशेबात काही घोटाळा असावा. अमदावादेस ते तीन वर्षे राहिले हे खरे. जुलै १८८४ मध्ये गेले आणि जुलै १८८७ मध्ये तेथून परतले. असे म्हणण्याला आधार त्यांच्या कागदांमध्ये एक भाडेपट्टा सापडला त्याचा आहे. हा दि. '१६ माहे अपरेल सन १८८५ रोजी' नारायण दासो बनहट्टी यांनी शा. छोटालाल अमरतलाल याला खाडिया मधील जेठाभाईच्या पोल मधील जागेबद्दल चार आण्यांच्या स्टांपावर लिहून दिला आहे. त्याच्यावर कृष्णाजी जयराम देवभक्त यांची साक्ष आहे. त्याच्या मागच्या बाजूस भाडे पोचल्याच्या पावत्या असून त्यातली शेवटची पावती १३ जुलैपर्यंतचे भाडे पोच-ल्याची दि. १६ जुलै १८८७, ची आहे. भाडेपट्टयात जागेचे तपशीलवार वर्णन असून भाडे वर्षाचे ४५ रुपये असल्याचे नमूद आहे. १५ एप्रिल १८८७ पर्यंत सर्व जागा बनहट्टींकडे होती, त्यानंतर १३ जुलैपर्यंत एकच खोली होती. यावरून फेलोशिप आता संपुष्टात आली हे लक्षात घेऊन नानांनी आपल्या मंडळींना अगोदर पुढे पाठवून दिले आणि १३ जुलैपर्यंत ते एकटे एका खोलीत राहिले असावे असे दिसते. फेलोशिप संपल्या-नंतर कदाचित काही काळ हायस्कुलामध्ये वगैरे त्यांनी नोकरी केली असेल हेही शक्य आहे.

मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरांमध्ये १८८५ व १८८६ ही दोनच वर्षे त्यांचा गुजरात कॉलेजचे दक्षिणा फेलो म्हणून उल्लेख आहे, तेही साहजिक आहे. कारण १८८४ व ८७ यात अर्धा अर्धा भागच ते फेलो होते. त्यामुळे त्यांचे नाव न लागता दुसऱ्याचे नाव लागले असावे.

अमदावादेस नाना मुंबईच्या लोकांच्या ओळखीने प्रथम जांभेकरांकडे गेले. हे फौजदार म्हणून प्रसिद्ध होते. सत्तावनच्या बंडाच्या वेळी गुजरातेत जो काही उठाव झाला होता तो मोडून काढण्याकरिता इंग्रज सरकारने जांभेकरांना महाराष्ट्रातून गुजरातेत पाठविले होते. ते त्या वेळी पोलिस खात्यात फौजदार होते. गुजरातेतील बंडाळी मोडून काढण्यात यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावल्यावरून यांना सरकारने चांगली नेमणूक करून दिली आणि एक तरवार बक्षीस दिली. ते अमदावादेस स्थाईक झाले आणि त्यांनी आपल्या-बरोबर कित्येक कऱ्हाडे ज्ञातीची कुटुंबे तिकडे नेली. सप्रे, मावळणकर, देवभक्त इत्यादि. पूर्वी पेशव्यांचा आणि गायकवाडांचा अंमल गुजरातेत होता त्यावेळी अमदाबादेस जाऊन स्थाईक झालेली काही मराठी मंडळी असतीलच. पण त्यांच्याशी नानांचा संबंध फारसा आला असावा असे दिसत नाही.

जाताना वडिलांनी सावधगिरीची सूचना दिली कऱ्हाडयांकडे जातो आहेस, संभाळ! त्यांच्या संबंधाने जी एक दुष्ट समजूत आहे तिचा प्रभाव पूर्वी फार होता. असल्या खोडसाळ समजुतींनी जातीजातीत अगोदरच असलेला दुजाभाव वाढविण्यास चांगली मदत केली होती. त्यांचे उच्चाटन करणे हा जाती-जातीची मिळणी घडवून आणण्याच्या कार्यक्रमातील एक भाग म्हणून आपण अट्टाहासाने अमलात आणला पाहिजे. असो नाना पहिल्या वर्षी काही दिवस जांभे-

करांकडे आणि नंतर कॉलेजात खोली घेऊन राहिले असावे. पुढच्या वर्षी, म्हणजे १८८५ साली कुटुंबाला नेऊन त्यांनी बिऱ्हाड केले. खाडियामध्ये जेठाभाई पोलमध्ये त्यांनी बिऱ्हाड केले हे आपण पाहिले आहे. १८८७-८८ साली त्यांच्यावर कौटुंबिक आपत्ति आल्या. अगोदरच्या साली त्यांची कन्या आणि नंतरच्या साली त्यांची पत्नी यांचा मृत्यु झाला. अमदावाद जुलै १८८७ मध्ये सोडून ते मिरजेस गेले व तेथे कन्येचे व पत्नीचे आजारीपण होऊन त्यांचे मृत्यु झाले असावे. हे प्रकरण संपवून चरित्रात लिहिल्याप्रमाणे मार्च १८८८ मध्ये ते मुंबईस आले.

अमदाबादेस राहात असताना अनुभवलेल्या पुष्कळ गमतीच्या गोष्टी नानांच्या सांगण्यात येत असत. गुजराती लोकांची व्यापारी वृत्ति प्रसिद्धच आहे. धनसंचय करावा तर त्यांनीच. अर्थात राहणीत काटकसर केल्याशिवाय हे कसे जमणार? एका शिक्षकाची गोष्ट ते सांगत. चार छोटाशा पुऱ्या आणि एक लहान बटाटा एवढे त्याचे दुपारचे जेवण असे. एवढ्यात तुझे कसे भागते, असे त्याला विचारले तर "तुम्ही तरी इतके खाऊन काय मोठचा लढाया मारता आहात? जास्त खाऊन धान्याचा नास मात्र करता." असा तो प्रतिटोला देत असे. त्याने एकदा दुकानातून आटा विकत आणला, त्यात एक झुरळ होते. कणीक भिजवताना ते उडू लागले, तेव्हा तो म्हणाला, 'छां कर, के छूं कर, वनियाके तोल में आया है, तुझे नहीं छोडूंगा.' (उडण्यासाठी कितीही छां छूं केलेस तरी वाण्याच्या तराजूत वजन होऊन तू आला आहेस, तुला सोडणार नाही). ही अर्थात अतिशयोक्ति असेल, गंमत म्हणूनच तिचा स्वीकार करायचा. मराठी माणूस एकंदरीने वायफळ गप्पा मारणारा, फटकळ, वेळ व्यर्थ घालविणारा. गुजराती माणूस सामोपचारी, सततोद्योगी आणि आतिथ्यशील असे नानांच्या सांगण्यात नेहमी येत असे. उद्योगीपणा आणि धनसंचय यासंबंधीची स्वतःच्या माहितीची एका बाईची गोष्ट नाना सांगत असत. ते राहात असत त्याच्या पलीकडे एक बाई म्हातारपणामुळे वारली. ती दोरखंडे वळण्याचे काम करीत असे. तिला नात्याचे वगैरे कुणी नव्हते. मेल्यानंतर तिचे सामान तपासले, तो तिच्या अंथरुणाखाली तेरा हजार रुपये मिळाले! गुजरातेत नारळाची झाडे नाहीत. कोकणातून कच्चा काथ्या व्यापाऱ्यांकरवी आणायचा, तो कुटून त्याच्या दोऱ्या वळून त्या व्यापाऱ्यांना द्यायच्या. त्यात त्या बाईने मरेपर्यंत १३००० रु. शिल्लक टाकले! केवढा उद्योग आणि धनसंचय!

गुजराती मंडळींच्या काही चाली आपणाला चमत्कारिक वाटणाऱ्या असत. या त्याकाळच्या, म्हणजे ८५ वर्षांपूर्वीच्या गोष्टी. आता त्या नष्टप्राय झाल्या असतील किंवा त्यात खूप बदल झालेला असेल.

'मोले घातले रडाया। नाही आसू नाही माया ।।'

ही तुकोबांनी वर्णिलेली परिस्थिति त्याकाळी तिकडे सररास अनुभवाला येत असे. कुटुंबातले माणूस मेले म्हणजे छाती पिटून शोक करण्याकरिता बायका बोलावीत. त्यांना त्याकरिता मजुरी द्यावी लागे. म्हणजे तो त्यांचा धंदा असे. कांग्रेसला १९२१ साली गेलो असता अमदावादेच्या बोळातून हिंडताना सात आठ बायका फेर धरून मेलेल्या माणसाच्या नावाने आक्रोश करीत छाती पिटीत असलेल्या पाहिल्याचे मला स्वतःला आठवते. दुसरी चाल न्यात भोजनाची. घरातले कुणी मोठे माणूस मेले की त्याच्या तेराव्याला सबंध जातीला (अर्थात त्या गावापुरत्या) जेवण द्यावे लागे. ही जेवणे पोळीत व्हावयाची. पोळ म्हणजे बोळ. दोन्ही बाजूंनी मोठमोठे उंच वाडे. मधल्या अरुंद बोळात उंची रेशमी पितांबर नेसून मोठमोठे शेटजी येऊन जराशी जागा साफ करून तिथे बसायचे. जेवायला मुख्य पक्वान्न म्हणजे चुरम्याचे लाडू. बाकी पूर्वीच्या काळी आपल्याकडे सुद्धा गावजेवण, किंवा मोठमोठचा जेवणावळी रस्त्यावर होत असत. मी स्वतः पंढरपुरास आजोळी रस्त्यावर जेवायला बसल्याचे मला स्मरते.

अशा त्यावेळच्या गुजरातेतल्या गमती जमती. गुजरातची जमीन सुपीक, लोक कष्टाळू, पीक उमाप यावयाचे. इंग्रज राज्यकर्ते गुजरातेला garden of India (हिंदुस्थानचा बगीचा) म्हणत असत. उत्तम तांदूळ तिकडे पिकायचा. पंखाळी कमोद म्हणून उत्कृष्ट जातीचा सुवासिक तांदूळ, त्याचा भात खाल्ल्यावर हात धुतला तरी पुष्कळ वेळ हाताचा वास जायचा नाही. नाना राहात असत त्या भागामध्ये मराठी लोकांची काही वस्ती होती. अनेक पिढ्या तेथे राहिलेले. त्यांची मराठी भाषा म्हणजे गुजरातीमय बनलेली.' माझं लुगडं

कुठे आहे ?' घरच्या पुरुषाने बायकोला विचारायचे. गुजरातीत लुगडे म्हणजे धोतर. शेळ्यामेंढ्या पाळणाऱ्यांच्या तोंडचे गुजरातीमय मराठी कसे त्यांच्या लक्षात राहिले कोण जाणे, पण हे वाक्य ते नेहमी सांगत असत : 'खेतामध्ये एकसे वीस घेटे रवारीबरोबर मोकलले होते तेंच्यामधले वीस घेटे खुटले, त्यांना पूरे पाडण्याला पगीला धाडले पण पूरे पडले नाही.' (गुराख्याबरोबर शेतात एकशेवीस मेंढ्या पाठवल्या होत्या, पण परत येताना वीस कमी आल्या. त्यांचा तपास लावण्याकरिता राखणदार पाठविला पण तपास लागला नाही !)

पुनः एल्फिन्स्टन कॉलेज

अमदाबादेची फेलोशिप संपल्यावर नाना तेथून परत आले ते रिकामे राहिले नाहीत. उन्हाळ्याची सुटी संपल्यानंतर एलफिन्स्टन कॉलेजात सुपरिंटेंडेंट आणि लायब्ररियन या जागेवर त्यांची नियुक्ति झाली. डॉ. पीटर्सन यांच्या मध्यस्थीने ही जागा त्यांना मिळाली. डॉ. पीटर पीटर्सन यांचा व नानांचा परिचय पूर्वीपासूनचा होता. हे एलफिन्स्टन कॉलेजात सन १८७३ साली Professor of Oriental Languages (प्राच्य भाषांचे प्राध्यापक) म्हणून आले ते १८९९ साली हिंदुस्थानातच त्यांचा मृत्यु झाला तेथपर्यंत त्या जागेवर होते. अर्थात विद्यार्थिदशेपासून नानांचा व त्यांचा संबंध होता. गोरा माणूस कॉलेजात नेमणूक होऊन आला की तो प्राध्यापक (प्रोफेसर) म्हणून यायचा हे ठरलेले. पीटर्सन साहेब आले तेव्हा वर्गातल्या विद्यार्थ्यांना Don't you read Panchatantra here? (इथे तुम्ही पंचतंत्र वाचीत नाही काय?) म्हणून विचारीत. मुले त्यांना उत्तर देत 'पंचतंत्र आम्ही शाळेत चौथ्या पाचव्या यत्तेत वाचतो.' यांच्या संस्कृत ज्ञानाचा आरंभीचा प्रकार असा असे. पण हे व्यासंगी व सुस्वभावी होते. 'मुंबई संस्कृत पुस्तकमालिके' (Bombay Sanskrit Series) मध्ये यांनी वाणभट्टाची कादंबरी आणि इतर काही ग्रंथ संपादून प्रसिद्ध केले. नानांची योग्यता अर्थातच यांना माहीत होती. म्हणून 'अधीक्षक आणि ग्रंथपाला'ची जागा त्यांनी नानांना दिली. नाना या जागेवर जून १८८८ ते जून १८९५ पर्यंत होते. या काळातल्या ज्या गोष्टी ते सांगत असत त्यांवरून हा काळ फार समाधानाचा व आनंदाचा गेला असे दिसते. १८८८ ते ९२ ते कॉलेजाच्या रेसिडेन्सीत म्हणजे वसतिगृहात राहात असत.

जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे

नानांचे पहिले लग्न इ. स. १८७६ साली झाले. आमची पहिली आई कानडी मुलखातली होती. 'कानडीने केला मराठी भ्रतार' असा प्रकार केव्हा केव्हा सुखावह होत नाही. या संबंधात काहीसा तसाच अनुभव आला असे नाना जे क्वचित त्रोटक उल्लेख करीत त्यांवरून वाटते. मुलीला एकदा माहेरी नेले म्हणजे लवकर सासरी पाठवायचे नाही; मूळ आलेल्या माणसाला तसेच परत लावून द्यायचे; सासरच्या विषयी तिच्या समोर काहीतरी वेडेवाकडे बोलायचे, असले प्रकार चालत असत. नानांनी अमदावादेला बिऱ्हाड केले तेव्हा या तिकडे गेल्या होत्या. पण या बाई फारशा जगल्या नाहीत. एक मुलगी होऊन ती मुलगी आणि त्या १८८८ साली वारल्या. नानांचा दुसरा विवाह १८९० साली झाला. हा त्यांना सर्वतोपरी सुखावह झाला. ही आमची सख्खी आई. हिच्याशी नानांचा २८ वर्षे संसार झाला. याच काळात त्यांचे कर्तृत्व भरास आले; गृहस्थधर्म आणि सार्वजनिक कार्य दोन्ही त्यांच्या हातून उत्कृष्ट पार पडली.

आमच्या आईचे माहेर पंढरपुरास होते. तेथून तिला आणण्यास काका गेले होते ते तिला घेऊन १७-२-१८९२ रोजी मिरजेस आले. नाना कॉलेजला उन्हाळ्याची सुटी झाल्यानंतर १८-४-९२ ला आले; त्यानंतर सुटी संपल्यानंतर जून मध्ये तिला घेऊन मुंबईला गेले आणि तिथे त्यांनी बिऱ्हाड केले. भवभूतीच्या रामचंद्राने म्हटल्याप्रमाणे

जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे ।
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः ।।

अशी त्यांची वृत्ति या काळातल्या आठवणी सांगताना होत असे. श्रद्धास्पद पित्याचे छत्र विद्यमान होते, सुशील प्रेमळ पत्नीचा लाभ नकताच झाला होता आणि जन्मदात्री आई नसली तरी आईप्रमाणे चिंता वाहणारी आत्या होती. मुंबईला जेव्हा त्यांनी बिऱ्हाड केले तेव्हा या आत्या त्यांचा संसार लावून देण्याकरिता म्हणून काही दिवसांकरिता गेल्या होत्या. वडिलांना देखील मुंबई पाहण्याकरिता म्हणून त्यांनी बिऱ्हाड केल्यानंतर बोलाविले होते. ८ आगस्ट १८९२ ला ते

मिरजेहून गेले आणि २१ आगस्टला परत आले असे जमाखर्चावरून दिसते. मुंबईची खर्चीक राहणी त्यांना मनातून पसंत पडली नाही. नानांचा आग्रह बाजूस सारून ते लवकर परतले.

एलफिन्स्टन कॉलेजमध्ये रुजू झाल्यानंतर पहिली चार वर्षे नाना कॉलेजच्या रेसिडेन्सीत राहत असत. कॉलेज तेव्हा स्थानांतराच्या आणि रूपांतराच्या अवस्थेत होते. कॉलेजची पहिली इमारत १८७४ साली बांधली ती भायखळा स्टेशनच्या समोर होती. इथे कॉलेज १८८७ पर्यंत होते. इ. स. १८८५ साली लॉर्ड रे मुंबई इलाख्याचा गव्हर्नर म्हणून आला. हा उदार आणि स्वतंत्र विचारांचा माणूस होता. साहित्यात्मक व तात्विक (liberal) शिक्षणाबरोबरच हिंदुस्थानातील जनतेस तांत्रिक शिक्षण दिले पाहिजे या मताचा त्याने पुरस्कार चालविला. त्याच्या प्रेरणेने मुंबईस १८८७ साली तांत्रिक शिक्षणाचे विद्यालय सुरू करण्यात आले. ते साल राणीच्या राज्यारोहणाच्या सुवर्णोत्सवाचे असल्यामुळे या संस्थेला व्हिक्टोरिया जुबिली टेक्निकल इन्स्टिटयूट असे नाव देण्यात आले; आणि तिला दुसरीकडे तयार इमारत नसल्यामुळे एलफिन्स्टन कॉलेजची इमारत देऊन त्या कॉलेजासाठी एस्प्लनेडमध्ये नवी इमारत बांधण्याचे ठरले. इमारत तयार होऊन कॉलेज तिथे एप्रिल १८८८ मध्ये गेले. पण त्यात रेसिडेन्सीची सोय नव्हती, म्हणून रेसिडेन्सीची इमारत रस्त्याच्या पलीकडे दक्षिणेस बांधायचे ठरले.

ही इमारत बांधून होईपर्यंत विद्यार्थ्यांना राहण्याकरिता निरनिराळे बंगले घेण्यात आले त्यांचे वर्णन नानांनी लिहिलेल्या वृत्तांतात आले आहे. त्यांना बगीच्याचा नाद फार. नवीन विद्यार्थि वसतिगृहाच्या आवारात थोडयाशा जागेत त्यांनी 'धाकटीशी टुमदार बाग उठवून दिली होती' तिचे वर्णन त्यांनी स्वलिखित जीवनचरित्रात केले आहे. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी मनाला उल्लासविणाऱ्या या छंदाचे कोड पुरवून घेतले. मिरजेच्या आमच्या घरापुढच्या टीचभर जागेत त्यांनी कोणची झाडे लावली होती व त्याची जोपासना ते कशी करीत याचे वर्णन मला पुढे करायाचे आहे.

भास्करराव जाधवांची आठवण

नाना सुपरिटेंडेंट असताना रेसिडेन्सीमध्ये विद्यार्थी या नात्याने कोण कोण मंडळी होती हे त्यांनी आपल्या वृत्तांतात सांगितले आहे. पण बोलण्यात आणखी काही जणांची नावे येत असत. भास्करराव जाधव आणि केशव लक्ष्मण देशपांडे यांची नावे विशेषेकरून उल्लेखिण्याजोगी आहेत. भास्करराव शंकरशेट स्कॉलर आणि उत्तम संस्कृतज्ञ असल्यामुळे त्यांची व नानांची विशेष मैत्री होती. विद्याभ्यास पूर्ण करून ते कोल्हापूर दरबारच्या नोकरीत गेल्यानंतर त्यांना एकदा पुण्यास काही कामाकरिता यावे लागले तेव्हा त्यांनी नानांना लिहिले की पुण्यास माझ्या ओळखीचे तुमच्याशिवाय कोणी नाही, तेव्हा मी तुमच्याकडे उतरण्यास येऊ इच्छितो. नानांनी उत्तर दिले की, तुम्ही या. आल्याने आनंदच होईल. कॉलेजातली वागण्याची, जेवण्याखाण्याची गोष्ट निराळी होती. आता मी संसारी माणूस म्हणून राहतो आहे. तेव्हा सामाजिक रूढीप्रमाणे जेवणाखाणाची व्यवस्था ठेवणे भाग पडेल. भास्कररावांचे उत्तर आले की ठीक आहे; माझी त्याला हरकत नाही. भास्करराव आले. जेवताना त्यांचा पाट आडवा मांडीत असत आणि त्यांचे उष्टे मोलकरीण काढीत असे. याप्रमाणे सर्व नीट पार पडले. नानांच्या बोलण्यात आली तशी ही हकीकत इथे निवेदन केली आहे. पुढे भास्करराव ब्राह्मणेतर वादात पडले व ब्राह्मणी मतांना झोंबणारी भाषणे त्यांनी केली; मला स्वतःला त्यांच्या मतांमध्ये काही गैर आहे असे कधी वाटले नाही. १९२६ च्या सुमारास मुंबई इलाख्याचे शिक्षणमंत्री असताना नाना त्यांना एकवार भेटले होते, तेव्हा त्यांनी त्यांचे मोठे प्रेमाने स्वागत केले. मला स्वतःला ते एकदोनदा प्रवासात भेटले होते. त्यांची रामायण वगैरे संबंधाची मते पटण्याजोगी नसली तरी ते समंजस व उमद्या स्वभावाचे गृहस्थ होते यात शंका नाही. माझ्या मुलाच्या मुंजीची निमंत्रणपत्रिका (अर्थात नानांच्या सहीची) त्यांना गेली, तेव्हा त्यांनी नानांना जुन्या मैत्रीची आठवण करून देणारे भावपूर्ण पत्र लिहिले होते.

दुसरे गृहस्थ केशव लक्ष्मण देशपांडे. हेही पहिल्या वर्गाचे विद्यार्थी. हे बी. ए. झाल्यावर विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन आले आणि बडोद्यास वकिलीकरिता गेले. तेथे अरविंद घोषांच्या संपर्कात आले; तेव्हा वकिली बाजूला राहून क्रांतिकारक चळवळीत पडले. खटला होऊन शिक्षा झाली. गांधीजींची असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हा हे त्यात पडले

आणि अंधेरी येथे सत्याग्रहाश्रम काढण्यात आला त्याचे हे संचालक झाले. हा आश्रम पाहायला मी गेलो होतो तेव्हा नानांचा संबंध सांगताच त्यांच्या संबंधाने अगत्याने बोलले. उत्तर आयुष्यात नानांना भेटायला एकदा मिरजेस आमच्या घरी ते आले होते असे स्मरते.

एलफिन्स्टन कॉलेजच्या वसतिगृहाचा नानांचा अनुभव दीर्घ काळाचा होता. विद्यार्थी असताना पहिली तीन वर्षे आणि १८८८ पासून सुपरिटेंडेंट व लायब्रेरियन झाल्यावर चार वर्षे. तेव्हा या रेसिडेन्सीमधल्या कित्येक गमती ते सांगत. ते ज्या क्लबमध्ये जेवायला जात, तिथे सखाराम नावाचा स्वयंपाकी असे. सामान्यत: आचारी कसे असतात हे कोणालाही सांगावयास नको. पण सखाराम अगदी शुचिर्भूत. आणि त्याचा स्वयंपाक उत्तम चविष्ट. तो कढी अप्रतिम बनवीत असे. ज्या दिवशी कढी केली असेल त्या दिवशी प्रत्येकाच्या पानात तो नेहमीपेक्षा जास्त भात लोटीत जात असे. कोणी विचारले, तर 'आज कढी आहे, म्हणून भात जरा जास्त वाढला आहे' हे त्याचे स्पष्टीकरण सर्वांना पटत असे. पुढे वऱ्हाडचे पुढारी झालेले मोरोपंत जोशी एलफिन्स्टनचे विद्यार्थी, नानांच्या दोन वर्षे पुढे होते. ते कांग्रेसच्या शिष्टमंडळातून विलायतेला गेले होते; परत आल्यावर म्हणाले की सखाराम आचारी जर आमच्या बरोबर असता तर विलायतेत आम्ही दोन महिने आणखी राहिलो असतो. धर्माच्या कारणास्तव सखारामने या मंडळींच्या बरोबर विलायतेला जाण्याचे नाकारले होते.

त्या वेळी कॉलेजे दोनच. मुंबईचे एल्फिन्स्टन आणि पुण्याचे डेक्कन. मुंबई अधिक सोयीची, केंद्रस्थानी असल्यामुळे सगळीकडून आलेले विद्यार्थी तिथे असायचे, तेव्हा गप्पा मारताना एकेकाच्या प्रांतिक भाषेतील लकबांची चेष्टा व्हायची व त्यावरून हशा पिकायचा. रत्नागिरीकडच्या अस्सल कोंकणी बोलीचा नमुना म्हणजे, 'हें नकों मस, तूंस हवें तर घेऊन जा परतें' असले खच्चून अनुनासिक उच्चारांनी भरलेले वाक्य बाहेर पडायचे. दक्षिण महाराष्ट्रातील देशस्थी बोली म्हणजे 'मी अंघोळ केलो, तू केलास काय?' असली रूपे आणि अनुनासिक उच्चारांचा पूर्ण अभाव. खानदेशी बोली म्हणजे 'तियाच्या तेयाचा बोया कायाला दिया'. (तिळाच्या तेलाचा बोळा काळचाला दिला.) वऱ्हाडातल्या बोलीचा प्रकार, 'तुले मले, काढून, जाऊन राहिला आहे,' इत्यादि. निरनिराळ्या प्रादेशिक बोलींची अशी वर्मे काढून सर्वांची चेष्टा चालायची.

नानांची अनासक्ती

...पण या वऱ्याच पुढच्या गोष्टी झाल्या. नाना मुंबईस असताना सर्व मंडळी नव्या उत्साहाच्या आनंदात होती. काकांचे लग्न दि. १५ मे १८९२ रोजी झाले होते. मुलगी पंढरपूरचे आराध्ये यांची होती. या सर्व मिरजेस होणाऱ्या सांसारिक घटनांना पैसे नानांकडून पाठविले जात होते. एलफिन्स्टन कॉलेजात सुपरिटेंडंट झाल्यापासून म्हणजे १८८८ पासून ते सररास मिरजेस पैसे पाठवू लागले. त्याच्या पूर्वीही जसे उरतील तसे पाठवीत असतील. वास्तविक त्यांनी आपले शिक्षण शिष्यवृत्त्या व बक्षिसे मिळवून केले होते. घरची काहीही मदत नव्हती. अडचणीच्या वेळी वडिलांनी उसने घेऊन काही पैसे पाठविले असल्यास ते यांनाच फेडावे लागले असणार. अशा रीतीने सर्वस्वी स्वत:च्या पायावर उभे राहून सगळे शिक्षण केले असता पैसे मिळायला लागल्याबरोबर स्वत: काटकसरीने राहून उरलेले पैसे ते वडिलांकडे पाठवू लागले, यात त्यांचा जो अलौकिक स्वभावधर्म प्रकट होतो त्याला इतरत्र तोड आढळणे कठीण पडेल. टिळक गांधी यांच्या सारख्या महापुरुषांची गोष्ट सोडा. पण संसारी माणसांमध्ये त्यांच्यासारखा पैशाविषयी अनासक्त माणूस दुसरा कोणीही मी पाहिला नाही. आपणाला जे मिळते ते आपल्या सर्व कुटुम्बीयांकरिता आहे (निवळ बायको व मुले यांच्याकरिता नव्हे) ही त्यांची भावना आणि त्याप्रमाणे कृति आयुष्याच्या अखेरपर्यंत सदोदित होती. हिमटेपणाने नव्हे, पण स्वत:च्या प्रतिष्ठेला विशोभित दिसणार नाही इतक्या काटकसरीने राहून पैसे शिल्लक टाकून ते घरी पाठवीत असत. हे माझे, ते तुझे, असा भेदभाव त्यांनी कधी मनात आणला नाही. आपणाला जे मिळते ते परमेश्वराची कृपा आणि वडिलांची पुण्याई याचे फळ होय, अशी त्यांची दृढ श्रद्धा. त्यामुळे पैसा आला आणि गेला तरी फारशी क्षिति त्यांनी कधी बाळगिली नाही.

मिरजेचा प्रपंच

वडिलांचा (दासोपंतांचा) प्रपंच मोठा होता. तीन मोठी मुले, प्रत्येकाच्या बायका, तीन लग्न झालेल्या मुली, नातवंडे, एक शाळेत जाणारा मुलगा,

स्वतःच्या दोन तीन बहिणी इतका मोठा परिवार; त्याचे गाडे चालवायचे म्हणजे चांगलाच खंबीर व शांत स्वभावाचा मनुष्य पाहिजे. त्यातून त्या गाड्याचे एक चाक मोडून पडलेले. स्वतःची पत्नी वारल्यापासून ते संसारात असून नसल्यासारखे, अलिप्त व निरिच्छ असत. घरची गरिबी शब्दांनी वर्णन करिता येणार नाही इतक्या परीची. घराणे गृहस्थांचे, कुलशीलवान आणि धर्मनिष्ठ. सर्वात जुनी जमाखर्चाची वही मला सापडली ती १८९१–९२ सालची आहे. त्या साली दासोपंत दादांचा पगार द. म. १२ रु. होता आणि अण्णांचा १० रु. होता. स्वस्ताई कमालीची होती तरी घरखर्च द. म. सरासरी ४०/४५ रु. होता. शिवाय लग्न, मुंज, उत्तरक्रिया ही जादा खर्चाची कलमे मधून मधून असतच. अशा स्थितीत नाना जर चांगल्या प्रकारे मिळवते झाले नसते तर प्रपंचाचा गाडा मोडून पडला असता. वनहट्टी घराण्याची मंडळी तुकडे मोडीत कसा तरी जीव कंठीत कुठे तरी निर्माल्यवत् पडून राहिली असती.

नाना सांगत असत की त्यांच्या लहानपणी घरचे जेवण म्हणजे कण्या आणि भाकरी. केव्हा तरी सणासुदीला घरात भात शिजायचा. अशातही दादांनी मानाने संसार केला, पण तो पोटाला किती असह्य चिमटा घेऊन केला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. १८८० सालापासून अण्णांचा १० रु. पगार घरात येऊ लागला. तेव्हा किंचित हायसे वाटू लागले असेल. पण मुलांची लग्ने होऊन तिकडे प्रपंचही वाढू लागला, तेव्हा गोळावेरीज सारखीच. खरा दिलासा १८८६–८७ सालापासून नाना पैसे पाठवू लागले तेव्हापासून मिळू लागला. घरात भात होऊ लागला. धोतरे, धडोती साधीच, पण गृहस्थी पेशास साजेशी येऊ लागली. १८९१–९२ सालचे जमाखर्च माझ्या समोर आहेत त्यांवरून असे दिसते की १८९१ च्या जुलई पासून १८९२ जून अखेर नानांनी एकंदर ११४२ रु. मिरजेस पाठविले. हे सर्व प्रपंचात खर्च झाले अशातला भाग नाही. यांपैकी बरेचसे पोस्टाच्या सेव्हिंग बँकेत ठेवण्यात आले. काही सोने चांदी खरेदी करण्याकडे लागले. एकंदरीने राहणीचा दर्जा त्यावेळी बऱ्यापैकी वाढला होता. पैसे थोडे साठू लागले तेव्हा मिरजेला थोडाबहुत व्याजबट्टा सुरू झाला. पोस्टाच्या बँकेत व्याज अगदी अल्प. तेव्हा अधिक व्याजाच्या इच्छेने पैसे कर्जाऊ देण्यात येऊ लागले. तो व्यवहार मुख्यत्वे करून दादा पाहत असत. पैशाच्या व्ययाचे दुसरे द्वार म्हणजे घर बांधणी. मिरजेचे पूर्वीचे घर जुनाट पद्धतीचे होते. मातीच्या भिंती, अगदी स्वस्त लाकडाचे खांब आणि वरती मातीचे माळवद. नव्या घराचा आकार चौसोपी धरण्यात आला. दक्षिणोत्तर सात खणी जाप्ता. बारीक टाकीच्या दगडाचे जोते आणि खांब तुळया कडीपाट सगळे सागवानी. १८९५ साली बांधायला सुरुवात झाली, पण लगेच पुढील वर्षापासून दुष्काळ आणि प्लेग यांचा अनर्थ सुरू झाल्यामुळे बांधणाऱ्या कामकऱ्यांची आणि बांधविणाऱ्या वनहट्टी मंडळींची वाताहत झाली; त्यामुळे काम जे बंद पडले ते पुन्हा सुरू करण्याचा योग आलाच नाही. पश्चिमेच्या बाजूचा सात खणी सोपा, त्याला लागून दक्षिण व उत्तर बाजूचा एकेक खण, या सर्वांवर माडी आणि त्यावर अर्धे छप्पर व अर्धी गच्ची, याप्रमाणे इमला तयार होऊन बांधकाम थांबले. आजतागायत ती इमारत तशीच आहे.

दादा आणि अण्णा यांचा पगार कितीसा होता हे आता सांगितलेच आहे. नानांचा पगार फेलो असताना रु. १०० आणि सुपरिटेंडंट असताना रु. १२० होता. हा म्हणजे काही मोठासा नव्हे. एवढ्या पगारात स्वतःचा खर्च भागवून मिरजेच्या प्रपंचखर्चात उणे पडेल ते भागवून घर बांधायला काढण्याइतकी शिल्लक ही मंडळी कशी टाकू शकली, याचे आपणाला कोडे पडेल. याचे मुख्य उत्तर एका गोष्टीत आहे. ही मंडळी निर्व्यसनी होती. स्वतः दादा सदाचरणाचा आदर्श होते. घरात स्वतःची बायको असूनही बाहेर उकिरडे फुंकीत हिंडणारे त्या काळात कमी नव्हते. पण ते ४७ व्या वर्षी विधुर झाले आणि प्रकृतीने धडधाकट होते, तरी त्यानंतरच्या २६ वर्षांत कोणाही स्त्रीकडे लवमात्र गैरनजरेने त्यांनी पाहिले नाही. विशुद्ध एकपत्नीव्रताचा उदात्त आदर्श त्यांनी प्रत्यक्षात उतरवून दाखविला. जेवल्यानंतर पान खात, तरी साधी तंबाखूचीही सवय त्यांना नव्हती. मित्र मंडळीत बसले असता आग्रहास्तव क्वचित तंबाखूची चिमूट तोंडात सोडीत. पण सवय नाही. त्यांची मुले कर्ती झाली, तरी या बाबतीत तशीच. तारुण्यात बायका गेल्या, तेव्हा त्यांनी दुसरी तिसरी लग्ने केली, पण बाहेरचा ख्याल कदापि केला नाही. आणि इतरही कोणती व्यसने केली नाहीत.

त्या वेळची अद्‌भुत स्वस्ताई !

दुसरी गोष्ट म्हणजे स्वस्ताई. इ. स. १८९१-९२ साली मिरजेचा घरखर्च द. म. ४० रुपयांत भागत असे हे मागे सांगितले आहे; त्या वेळी घरात खाणारी माणसे सरासरी १० असत असे धरले तर माणशी खर्च दरमहा ४ रु. येत असे, असे प्रमाण निघते. यात जेवण-खर्चाबरोबर वस्त्रप्रावरणही आले. तरी ही राहणी हिमटेपणाची नव्हे. बनहट्टी मंडळी पूर्वीपासून हाताची सढळ, कोकणस्थी वारकावा त्यांच्यात नव्हता व नाही. १८९१-९२ सालच्या जमाखर्चात विड्याची पाने तर आहेतच, पण वेलदोडे लवंगा यांच्या करिताही अनेक वार पैसे खर्च पडले आहेत. रोज भाजी आहे पण त्याच्या करिता पाव किंवा अर्धा आणा यापेक्षा जास्त खर्च पडलेला नाही. दूध तेव्हा रुपयास १३ शेर होते. जळाऊ लाकडे वीस मणांच्या खंडीस ५ रु. पडत. आणि तेवढी फोडण्यास फोडणावळ तेरा आणे द्यावी लागत असे. तांदूळ रुपयास ८॥ मापटी, गव्हाचा भाव तेवढाच. जोंधळे १६ ते २० मापटी असत. मिरजेचे मापटे मोठे, एक शेराचे असे. हे लक्षात घेतले म्हणजे या दरभावांची योग्य कल्पना येईल. जोंधळे आणि तांदूळ वर्षाचे घेतले, ते अनुक्रमे २१ आणि ११ रुपयांचे अशी जमाखर्चात नोंद आहे. गूळ अडीच आणे पक्का शेर. खारीक तीन आणे, बदाम पावणे सहा आणे आणि बेदाणा सहा आणे शेर. हे जिन्नस बहुधा बाळं-तिणी करिता आणले असावेत. आमचे घराणे वैष्णवांचे असल्यामुळे मुंज झालेल्या मुलांपासून सर्वांना एका-दशीचा उपास असायचा. त्याकरिता दर एकादशीला फराळाच्या सामानाकरिता सरासरी तीन आणे खर्ची पडले आहेत. हजामत एका पैशात होत असे, ती देखील घरी येऊन केलेली, शेंडीचे वर्तुळ सोडून बाकी सर्व डोके वस्तऱ्याने साफ करावयाचे अशी. नानांच्या कप-ड्यांची शिलाई म्हणून नारायण हरि शिंपी यास १ रुपया दिला आहे. त्यात कमीत कमी दोन अंगरखे, कळीचे व पेलेदार, आणि दोन सदरे किंवा बंड्या, एवढे तरी असेलच. पोस्टाच्या कार्डाला एक पैसा आणि पाकिटाला दोन पैसे.

वर जे दरभाव प्रत्यक्ष जमाखर्चाच्या वहीवरून उतरले आहेत त्यावरून सध्याच्या मानाने त्या काळात सुमारे पंधरा वीसपट स्वस्ताई होती असे स्थूलमानाने म्हणण्यास हरकत नाही. सोन्याचा दर काही कुठे आढ-ळला नाही; पण चांदीचा भाव रुपया भार होता असे वरीचशी चांदी खरेदी झाली आहे त्यावरून दिसते. स्वस्ताई इतक्या परीची होती म्हणूनच निर्व्यसनी घर-खर्च चांगल्या रीतीने भागवून, नानांच्या पैशातून लोकांना पैसे कर्जाऊ देऊन, पोष्टाच्या बँकेमध्ये शिलक टाकून ही मंडळी १८९५ साली घर बांधावयास काढ-ण्याचा हिय्या करू शकली.

मिरजेचा अभिमान !

वास्तविक नाना पुण्यास किंवा मुंबईसही घर बांधू शकले असते. सुमारे ८० वर्षांपूर्वीचा तो काळ. त्यांचा दृष्टिकोन लक्षात घेता पुण्यास ब्राह्मणी पेठांमध्ये त्यांना माफक दरात जागा मिळाली नसती असे नाही. मुंबईला देखील त्या काळात जागा पुष्कळ मोकळी होती. पण नानांना मिरजेचा अभिमान मोठा. मिरज त्यांचे जन्मस्थान, खेळगड्यांसमवेत लहानपणची पंधरा सोळा वर्षे त्यांनी तिथे काढलेली. वडिलार्जित भूमि आणि वास्तु तिथे होती. ती त्यांच्या पूज्य पितृ-चरणांच्या वास्तव्याने पुनीत झालेली होती. सरकारी नोकरी पतकरली खरी, पण तीतून निवृत्त झाल्यानंतर उरलेले आयुष्य शांतपणाने आपल्या जन्मग्रामी विद्यानंदात घालवावे हे त्यांनी उराशी बाळगलेले स्वप्न होते. जुने घर अर्थात जुन्या पद्धतीचे होते; त्याच्या समोर मोकळी जागा मुबलक होती. घर-बांधणीचा जिकिरीचा उद्योग चालविण्यास योग्य असा त्यांचा प्रकृतिधर्म नव्हता. पण तो चालविण्यास मिरजेला वडील आणि बंधु होते. मिरज गावही त्या काळात भरभराटीच्या अवस्थेत होता. चारी दिशांकडून येणाऱ्या मालाची उतारपेठ तेथे होती. जमीन सुपीक, उत्कृष्ट व्यापार आणि शेती करणाऱ्या लिंगायत वाणी जातीची मोठी वस्ती; अशा प्रकारचे हे मध्यम प्रतीचे शहर त्या काळात उत्कर्षावस्थेत होते. ब्राह्मण वर्गही सुप्रतिष्ठित होता. वेदाध्ययन आणि संस्कृत शास्त्र-व्युत्पत्ति यांना पडता काळ आलेला नव्हता. देवधर शास्त्री म्हणून त्या काळात एक विद्वान गृहस्थ असत, त्यांना आधुनिक दृष्टि होती. दर पंधरवाड्यास ते काही तरी उपयुक्त विषयावर व्याख्याने किंवा चर्चा घडवून आणीत. नानांचा त्यांनी यासंबंधात एकदोनदा उपयोग करून घेतला होता. मिरजेचे हवापाणी उत्तम. हवा कोरडी व निरोगी. पाणी ओढ्यात विहिरी खणून आणलेले असल्यामुळे पाचक व उद्दीपक. डॉ. वानलेस

अमेरिकेतून मिशन घेऊन इकडे आला, आणि महाराष्ट्रभर हिंडून त्याने तपासणी केली, तेव्हा मिरजेत जखम जितक्या लवकर बरी होते तितक्या लवकर दुसरीकडे कोठेही होत नाही असा त्याला अनुभव आल्यावरून त्याने मिरजेस आपले मिशन इस्पितळ काढण्याचे ठरविले असे नाना सांगत असत. असा हा मिरज गाव तेथील रहिवाशाने सर्वस्वी ज्याचा अभिमान बाळगावा असाच होता.

आणि आपल्या गावाचा आपण अभिमान धरला तर त्यात बिघडले काय? आपल्या गावाचा ज्याला अभिमान वाटत नाही तो आपल्या देशाचा काय अभिमान धरणार? ज्याला कशाचाच अभिमान बाळगता येत नाही त्याने विश्वबंधुत्वाच्या गोष्टी कराव्यात हे ठीकच आहे! अशा रीतीने पातळ झालेल्या देशप्रेमाला आपल्या देशाचे तुकडे झाले तरी त्यात खंत वाटत नाही. आपल्या गावाचा प्रखर अभिमान बाळगणारे नाना तितकेच गाढ देशभक्त होते. त्यांचे देशप्रेम आजन्म अप्रकट राहिले असेल. पण ते वाचिवीर देशभक्तांपेक्षा अधिक सच्चे व गाढ होते. याला साक्ष मी स्वतः आहे.

महाराष्ट्रातील प्लेग!

घराचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. कारण इ. स. १८९६ सालापासून दुष्काळ आणि प्लेग यांनी सर्वांप्रमाणे बनहट्टी मंडळींची पाठ पुरविली. या दिवसांत जी वाताहत आणि जो अनर्थ झाला त्याचा सूचक उल्लेख नानांनी आपल्या जीवनचरित्रात केला आहे. गप्पा गोष्टींमध्ये ते तपशीलवार हकीकती सांगत असत. मुंबईला प्लेग झाला की तेथील मंडळींनी पुण्याला यायचे; पुण्याला सुरवात झाली की मिरजेला जायचे; मिरजेला उंदीर पडू लागले की परत पुण्याला यायचे. अशी धावपळ आणि यातायात चालत असे. प्लेगोबाची स्वारी बहुतकरून हिवाळ्यात येत असे. मार्गशीर्ष वद्यात सुरवात होऊन पौषात भर असायचा, माघात उतार लागायचा, फाल्गुनात गाशा गुंडाळून चैत्राच्या आरंभी स्वारी पसार व्हायची. १८९६–९७ च्या हिवाळ्यातला पुण्याचा पहिलाच प्लेग; तेव्हा साथ जबर होती आणि सरकारने रोग लवकर निपटून काढण्याच्या हेतूने जुलूमही फार केला. कारण साथ सुरू झाल्याचे कळल्याबरोबर विलायत सरकारच्या तारावर तारा चालू झाल्या की जालीम उपाय योजून रोगाचा त्वरित नायनाट करा. त्यांना भीति अशी होती की हा राक्षस हिंदुस्थानातून निघून विलायतच्या भूमीवर पाय ठेवतो की काय? हिंदुस्थानाचे शोषण करून सुखसमृद्धीची आयात करण्यात आनंद होता, पण तेथून रोगाची आयात व्हायला लागली तर ते कसे परवडेल? म्हणून घरोघरीचे रोगी हुडकून काढून त्यांना इस्पितळात पोचविणे, रोग्याची वस्त्रप्रावरणे जाळून टाकणे, संबंधी लोकांचे सामानसुमान जंतुरहित करणे वगैरे प्रक्रिया चालू झाल्या व त्या शिस्तीने झटपट पार पाडण्याकरिता सोजरांची पलटण शहरावर सोडण्यात आली. रँड नावाच्या कल्पनाशून्य आणि उद्दाम नोकरशहाकडे या व्यवस्थेचे आधिपत्य देण्यात आले. रँडचा पुढे चाफेकरांनी खून केला. हा सर्व सार्वजनिक इतिहास प्रसिद्ध आहे. तो मी इथे सांगत बसत नाही. लहानपणी आईने आणि नंतर नानांनी या हकीकती सांगितल्या त्यावेळी त्या रोमांचकारी वाटत असत. रँडचा खून झाल्याबरोबर विलायत सरकारने तारा केल्या की प्लेगसाठी योजिलेले जालीम इलाज बंद करा. उपाय दोन सेग्रिगेशन (विलग्नीकरण) आणि डिसइन्फेक्शन (संक्रमणशून्यत्व); पैकी डिसइन्फेक्शनचे सक्तीचे उपाय ताबडतोब बंद केले. पहिला उपाय पुढे एक दोन वर्षे चालू ठेवला होता. त्याकरिता पुण्यात क्वारंटीन (संसर्गरोधशाला) स्थापिले होते. रोगमुक्ततेचे डॉक्टरचे सर्टिफिकेट नसलेला मनुष्य बाहेरून (आगगाडीने किंवा पाय रस्त्याने) आला की त्याला या 'कोरांटी'त तीन दिवस राहून औषध घ्यावे लागे. बाहेरून येणारी माणसे एकमेकांना विचारीत, 'तू कोरांटीत जाऊन आलास काय?' या उपायाचाही फार्स होऊ लागला. दुसऱ्याच्या बदली पैसे घेऊन क्वॉरंटीनमध्ये बसणारी माणसे निघाली. डॉक्टरची सर्टिफिकिटे विकत मिळू लागली. नाना तऱ्हा.

प्लेगरूपी सर्वभक्षक व्याघ्राने आमच्या घरालाही बळी घेतल्याखेरीज सोडले नाही. आमच्या थोरल्या आत्यांचा मुलगा बाराचौदा वर्षांचा, अण्णांचा मुलगा तीन चार वर्षांचा आणि बहिणाआत्या इतकी माणसे त्या काळात प्लेगोबाने ओढून नेली असे नाना सांगत असत.

बगीच्याचा छंद

घर बांधले तशी घराच्या समोरच्या छोटयाशा अंगणात नानांनी सुंदर बाग केली. तिच्यासाठी मुंबई-

तील आपल्या निवासस्थानाचा त्यांनी उपयोग करून घेतला. त्यांचे निवासस्थान म्हणजे मंडलिकांचा बंगला पेडर रोडवर खुल्या वातावरणात श्रीमंती वस्तीत होता. बंगल्याभोवती मोठे आवार होते, त्यात सुंदर बाग होती व एका बाजूला चाळ होती. तिथे बुद्धिमान प्रेमळ व दक्ष पत्नीच्या सहवासात त्यांचा काळ फार आनंदात गेला. तिथे त्यांनी तारा आत्यांना व आपल्या वहिणींना आणून त्यांचे कौतुक केले. विश्वनाथ नारायण मंडलिक इतर बाबतीत मोठे होतेच; शिवाय सौंदर्याचे भोक्ते, रसिक होते. ते संगीतप्रेमी, तसेच उद्यानप्रेमी होते. नानांना संगीताचे विशेष आकर्षण तिथे राहायला गेल्यापासून निर्माण झाले असावे असे मानण्यास आधार आहे. बगीच्याचा नाद पूर्वीपासून होताच, तो तिथे गेल्यानंतर वाढला. मंडलिकांनी आपल्या आवारात नाना प्रकारची झाडे झुडपे आणि लता वेली लांबलांबच्या ठिकाणांहून आणून लावल्या होत्या. मिरजेच्या नवीन बांधायला काढलेल्या घरासमोरच्या अंगणात निरनिराळी रोपे व कलमे त्यांनी मंडलिकांच्या बागेतून नेऊन लावली. लिंबू आणि ईडलिंबू, उत्तम बटमोगरा, सुवासिक पारिजात आणि खूप फुलणारी तगर आणि निरनिराळ्या रंगांची कोरांटी. नवरात्रात आणि उन्हाळ्याच्या सुटीत आम्ही बहुधा मिरजेला असायचे; त्या ऋतूत फुलणारी फुले हारे भरभरून आम्ही वेचली आहेत. तुळशी अर्थात होत्याच. घरचे लिंबू रसाळ व स्वादिष्ट होते. एखाद्या दिवशी पानात लिंबू नसले तर कोणाला तरी पाठवून लिंबू तोडून आणवून, त्याची फोड पानात घेतल्याशिवाय त्यांच्या जेवणाला सुरवात व्हायची नाही. आणखी एक फार गुणकारी वल्ली आमच्या दारापाशी होती. ती म्हणजे गुळवेल. ही एक अत्युत्तम औषधि आहे. सगळ्या मिरज गावात आमच्याकडून गुळवेल मागून नेत असत. साधारण टीचभर कांडे प्रत्येकाला कापून द्यायचे.

नव्याने बांधलेल्या सोप्याच्या खालून पन्हळ नेऊन घरातले सांडपाणी अंगणातल्या या झाडांना लावले जात असे. त्यातून प्राणिज खत मिळून झाडे टवटवीत राहत आणि भरपूर फळे फुले देत असत. टीचभर जागेतली ही करामत खरोखरी अद्भुत होती.

माझ्यापुढे असलेल्या वह्यांमध्ये १८९९ ते १९०१ पर्यंतच्या मिरजेच्या जमाखर्चाच्या वह्या आहेत. त्या दादांच्या हातच्या आहेत. त्या काळात १८९१-९२ पेक्षा दरभाव वाढलेले होते तरी घरखर्च सरासरीने द. म. ४० रु. पर्यंतच आहे. याचे कारण असे की घरातली माणसे पूर्वीपेक्षा कमी झाली होती. विष्णुपंत सहकुटुंब मुंबईनिवासी झाले होते. मुली (नानांच्या वहिणी) सगळ्या आपआपल्या सासरी होत्या. तेव्हा घरात अण्णा, अण्णांचे कुटुंब, वहिणा आत्या, तारा आत्या व त्यांचे पति कृष्णाचार्य आणि खुद्द दादांच्या मातुःश्री रखमाबाई इतकीच साधारणपणे मंडळी होती. या काळात व्याजबट्टयाचा व्यापार मात्र पुष्कळ वाढलेला दिसतो. जमाखर्चातील बहुसंख्य नोंदी कुळांना रकमा देणे व त्यांच्याकडून घेणे, व्याज घेणे, गहाण ठेवून घेतलेल्या रकमांचे फाळे भरणे, असल्या विषयांच्या आहेत. हा सर्व व्यवहार दादांच्या हस्ते चाललेला दिसतो.

या तीन वर्षांत नानांनी मिरजेस १३७८ रु. पाठविले आहेत आणि विष्णुपंतांनी २५७ पाठविले आहेत. दादांचा पगार पूर्वी इतकाच म्हणजे द. म. १२ रु. व अण्णांचा रु. १० होता. नाना–काकांकडून आलेल्या पैशांतून घरखर्चाला लागतील तितके घेऊन बाकीचे व्याजी लाविले जात. रकमा नेणारी सुमारे १०–१२ कुळे होती. बहुतेक सर्वांची शेते गहाण लागलेली असावयाची. कर्ज बुडले की शेत सावकाराच्या मालकीचे व्हायचे. हा जो व्याजबट्टयाचा व्यवहार नानांच्या पैशाने मिरजेस आरंभिला होता त्यातच अखेरीस नाना स्वतः दोन्ही अर्थांनी बुडाले. तो दुःखद इतिहास मला पुढे सांगावा लागणार आहे.

दादांच्या मातुःश्री रखमाबाई उर्फ अव्वा डिसेंबर १९०१ मध्ये ९३ वर्षांच्या होऊन वारल्या. या मोठ्या कर्तबगार, चतुर आणि विनोदी होत्या. त्यांच्या पुष्कळ गोष्टी नाना सांगत. शेवटची दोन तीन वर्षे खेरीज करून प्रकृति अगदी खणखणीत. .घरातील सर्व मंडळी त्यांना फार मानीत. दादा तर त्यांच्या अर्ध्या वचनात असत. मातुःश्री गेल्यानंतर ते फार दिवस जगले नाहीत. १९०३ सालच्या प्लेगात त्यांना गावाबाहेर राहावयास जावे लागले; तेथे लांबून पाणी आणण्याचे वगैरे फार कष्ट करावे लागले. त्यात डोळयात खडा गेल्याचे निमित्त होऊन असह्य ठणका लागला. कष्टांनी व वेदनांनी जर्जर होऊन त्यांचा काल झाला. मूळचे सात्त्विक आणि धर्मशील प्रकृतीचे अखेरी अखेरीला स्थितप्रज्ञ अवस्थेला पोचले होते. त्यांनी लिहिलेल्या

जमाखर्चापैकी वाचलेल्या काही वह्या माझ्यासमोर आहेत. त्यांनी लिहिलेल्या आरत्या, वेंकटेशविजया-सारखी पौराणिक आख्याने आणि कायद्याची काही पुस्तके अद्यापि विद्यमान आहेत. हे सर्व त्यांनी स्वहस्ते मोडीमध्ये देशी दौलताबाजी कागदावर लिहिले आहे. गोल वळणदार सुंदर अक्षरामध्ये लिहिलेले हे सर्व साहित्य पाहून मन प्रसन्न होते. ते केवळ संसारी होते; त्यांच्या जीवनाला लौकिक किंवा सार्वजनिक अंग नव्हते. पण संसारी माणूस जितका धीरोदात्त असणे शक्य आहे तितके ते होते. नानांना त्यांच्या विषयी परम आदर होता. आणि त्यांना आपल्या या कुल-दीपक पुत्राविषयी किती धन्यता वाटत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. नानांकडून पैसे यायला लागल्यानंतर मिरजेच्या घरात राहणीचे मान वाढले, तेव्हा ते म्हणत, 'जो मी पूर्वी आठ दहा रुपयात संसार करीत होतो, तोच मी आता आपल्या हाताने दरमहा पन्नास साठ रुपये खर्च करतो, तरी ते पुरे पडत नाहीत! केवढी परमेश्वराची कृपा!' त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळत असत. अण्णांनाही आपल्या पाठच्या भावाचे फार कौतुक होते. सुवासिक अंबे-मोहोर तांदळाचा भात, उत्तम तुरीच्या डाळीचे वरण आणि त्यावर साजूक तूप, असे रोजचे जेवण होऊ लागले, तेव्हा तृप्त होऊन ते म्हणायचे, 'ऐसा दाता होणे नाही!' ते स्वभावाने घाडशी होते. वडील गेले त्याच्या पुढच्याच वर्षी १९०४ मध्ये पुन्हा प्लेग आला, तेव्हा घरात पडलेले उंदीर यांनी हातांनी उचलून बाहेर टाकले. अर्थात् त्यांना प्लेगने गाठले आणि तडकाफडकी त्यांचा अंत झाला. यांची तीन लग्ने झाली. तिसऱ्या लग्नापासून दोन अपत्ये झाली—रामचंद्र आणि काशी. रामचंद्र विशेष शिकला नाही आणि पुढे फार दुर्वृत्त निघाला. अण्णांच्या मृत्यूबरोबर आमच्या घराण्याचे मिरज पर्व काही काळापुरते संपले असे म्हणण्यास हरकत नाही.

× × ×

गृहव्यवस्था

आमचे घर म्हणजे अविभक्त कुटुंब. त्यात मुख्य गृहिणीचा मान आईकडे होता, आणि तो तिने त्या मानाला पूर्णपणे उचित अशा स्वभावगुणांनी मोठ्या तोलाने सांभाळला होता. नाना नोकरीवर होते तोपर्यंत पुष्कळ वर्षे आम्ही इन मीन तीन माणसे – नाना, आई आणि मी. ते सरकारी नोकरीत असल्या वेळेच्या आठवणी म्हणजे तीन ठिकाणच्या. त्यात दीर्घकाळ वास्तव्याचे ठिकाण म्हणजे पुणे, मध्यंतरी अल्पकाळ धुळे आणि नाशिक आणि त्यानंतर अधिक दीर्घकाळ मुंबई आणि जळगाव. मुंबईस काकांचे कुटुंब आणि आमचे, अशी दोन कुटुंबे पेंडश्यांच्या चाळीमध्ये तीन खोल्यांच्या गाळ्यामध्ये राहात होतो. त्या वेळी ही चाळ मोठी प्रशस्त गणली जात असे. त्यानंतर तीन खोल्यांच्या चाळी बांधण्यास, मधल्या खोलीत हवा खेळत नाही या कारणास्तव म्युनिसिपालटीने बंदी केली होती. आमचा गाळा कडेचा असल्यामुळे समोरचा प्रशस्त व्हरांडा आम्हांला खोलीप्रमाणे वापरता येत असे. आणि बाजूच्या खिडक्यांमुळे हवा खेळण्याचा प्रश्न सुटला होता. त्या वेळच्या काही गोष्टी आठवल्या म्हणजे आज अंगावर काटा उभा राहातो. सबंध मजल्यावर नऊ दहा बिऱ्हाडांना एक नळ आणि त्याला दिवसातून केव्हा तरी एक दोन तास पाणी यायचे. तेव्हा तिथे केवढा कलकलाट आणि खडखडाट होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. आणि प्रातर्विधीची सोय म्हणण्यापेक्षा भयानक गैरसोय! दिवसातून काही काळ तो नरकवास आम्ही सहन करीत होतो, यावर आता माझा स्वतःचा विश्वास बसत नाही. मुंबईत अद्यापी असा भयानक गलिच्छपणा आणि नरकवास असेल काय? ज्या वर्गामध्ये आणि सांपत्तिक स्थिती-मध्ये माझे जीवन गेले आणि जात आहे त्याचा तरी अशा नरकवासाशी आता संबंध राहिला नाही, ही ईश्वरी कृपा असे मी मानतो. झोपडपट्टी वगैरेंची वर्णने वर्तमानपत्रातून येतात आणि त्यांचे ओझरते दृश्य कित्येक वेळा दृष्टीसमोरून जाते. तेव्हा हा नरकवास तिथे अवतरला असेल अशी कल्पना होते. क्षणभर मन कळवळते, चिडून उठते, पण पुन्हा आपल्या स्वीकृत उद्योगामध्ये गुंतून जाते...

नाना १८९५ च्या आगस्टात मुंबईहून पुण्यास गेले. त्यांचा २१ आगस्टपर्यंतचा मुंबईचा पगार ८२ रु. साडे चौदा आणे कॉलेजातून काढल्याची जमाखर्चात नोंद आहे. तेव्हा २१ तारखेपर्यंत काम करून २८ रोजी नाना पुण्यास रुजू झाले असावे. काकांना तोपर्यंत मुंबईला व्यापारी कंपनीत काही प्राप्ति होऊ लागली होती. जून ते डिसें. १८९५ या महिन्यांच्या प्राप्तीची सरासरी काढली तर ती द. म. ४० रु. पर्यंत भरते.

त्यांना निश्चित पगार नव्हता; गरजेप्रमाणे कंपनीतून उचल आणि थोडेसे कमिशन असे प्राप्तीचे स्वरूप होते. याखेरीज नाना पुण्याहून काही मदत पाठवीत असत. नानांनी पुण्यास येऊन भटांच्या वाड्यात बिऱ्हाडासाठी जागा पाहिली. तेथे स्थिरस्थावर होतात तोच प्लेगने पाठपुरावा केला. प्लेगच्या धामधुमीचे वर्णन मागे केलेच आहे. सन १९०० व १९०१ या दोन्ही वर्षी नोवेंबर डिसेंबर मध्ये नाना मिरजेस होते. १९०१ च्या जानेवारी २ ला, नाताळ संपल्याबरोबर, ते पुण्यास आले. जानेवारीचे त्यांच्या हातचे जमाखर्च उपलब्ध आहेत त्यात रोज गाडीभाड्याचा उल्लेख आहे त्यावरून या महिन्यात ते गावाबाहेर बंगला घेऊन राहिले होते असे दिसते. घरची आण ने व इतर कामे यांकरिता गावात जावे लागायचेच. नंतर गावात भटांच्या वाड्यात राहावयास आले व तेथे माझा जन्म झाला. प्लेगाची धामधूम, कुटुंबाची व्यवस्था आणि कॉलेजचे काम चालू होते तरी त्यात देखील नानांचे विद्याध्ययनाचे अवधान सुटले नव्हते. 'वेदशास्त्रसंपन्न नारायणशास्त्री गोडबोले यांना व्याकरणशास्त्र शिकविण्याबद्दल संभावना रु. १०' असा जमाखर्चात १६ जानेवारी या दिवसाचा उल्लेख आहे. १९०१ च्या नोवेंबर डिसेंबरमध्ये नाना पुन्हा सहकुटुंब मिरजेस होते. 'चि. सौ. लक्ष्मी मुलास घेऊन कागवाडास देवीस गेलेबद्दल खर्च पावणे अकरा आणे' आणि 'पिंपळपानाबद्दल खर्च १९ रु.' असे या महिन्याच्या आजोबांच्या हातच्या जमाखर्चात उल्लेख आहेत. चि. सौ. लक्ष्मी म्हणजे माझी आई व मुलगा म्हणजे मी. कागवाड मिरजेच्या दक्षिणेस सुमारे ८ मैलांवर सटवाईचे स्थान आहे. मुलगा झाला की सटवाईच्या पायावर घालण्याकरिता तिथे जायचे ही आमच्या घरातली एक पद्धत. जावळाची वेणी घालून त्यात पिंपळपान अडकवलेले मला अद्याप स्मरते.

अण्वांचा मृत्यु २० डिसेंबर १९०१ च्या सुमारास झाला. नाना २३ डिसेंबरला पुण्यास येऊन २८ डिसेंबरला 'भांबुरड्याजवळचा दादाभाई बुटी यांचा बंगला' प्लेगच्या निमित्ताने भाड्याने घेतला होता तेथे राहावयास गेले. बंगल्याचे भाडे द. म. १० रु. होते. तिथे गेल्यावर प्लेगने काही मृत्यु झाले असावे. या सालचा प्लेग बराच काळ, म्हणजे मार्चच्या प्रारंभापर्यंत टिकला होता, असे दिसते. बंगल्यावरून सामान घरी आणल्याची गाडीभाड्याची नोंद ६ मार्च १९०२ ची आहे.

यानंतर प्लेगच्या जंजाळातून काहीशी सुटका होऊन थोडे स्थिरस्थावर झाले आणि नानांचे कर्तृत्व उमलू लागल.

वेदशास्त्रोत्तेजक सभेतील कार्य

...प्लेग आणि दुष्काळ यांचा कहर शमल्यानंतर नानांच्या कर्तृत्वाला बहर येऊ लागला. समाज जीवनाच्या दोन क्षेत्रांमध्ये चिरस्मरणीय कार्य त्यांच्या हातून घडले. ती दोन क्षेत्रे संस्कृत विद्या आणि संगीतशास्त्र ही होत. संस्कृत विद्या म्हणजे संस्कृत भाषेत साठविले सर्व ज्ञान: वेदवेदांगे, षट्शास्त्रे, काव्यव्युत्पत्ति, साहित्यशास्त्र, आणि जोतिष, वैद्यक इत्यादि जीवनोपयोगी विद्या. संगीतशास्त्राबरोबर गायन वादन या कला, स्वरशास्त्र आणि गायनोपयोगी वाद्यांचे ज्ञान याही गोष्टी आल्या. संस्कृत विद्येच्या जोपासनेचे कार्य त्यांनी 'वेदशास्त्रोत्तेजक सभे'च्या द्वारे केले आणि संगीतशास्त्राच्या जोपासनेचे त्यांचे कार्य बरेचसे 'पुणे गायन समाज' या संस्थेच्या द्वारे आणि काही इतर मार्गांनी झाले. पुण्यास असताना अशा रीतीने त्यांच्या कर्तृत्वाला फुलोरा येत होता. बदली झाली नसती तर ते अधिक जोमाने बहरले असते.

विचारसरणीचे जुने आणि नवे असे जर दोन ढोबळ विभाग केले तर नाना ठामपणाने पहिल्या विभागात पडणारे होते. वेदांपासून चालत आलेली आपली प्राचीन संस्कृति आणि विशाल संस्कृत विद्या यांच्या विषयी त्यांना निस्सीम आदर होता. श्रुतिस्मृतिपुराणोक्त हिंदु धर्मावर त्यांची गाढ निष्ठा होती. वैदिक संस्कृति, संस्कृतविद्या आणि हिंदुधर्म या त्रयींच्या रक्षणासाठी अवतरलेल्या 'वेदशास्त्रोत्तेजक सभे'कडे त्यांचे मन ओढले गेले आणि ते तिच्या कार्यात उत्साहाने भाग घेऊ लागले, ही लोहपरिस न्यायाने सहज क्रमाने घडून आलेली गोष्ट होती.

वेदशास्त्रोत्तेजक सभा शके १७९७ साली तिच्या नावानुसार वेदशास्त्रांना उत्तेजन देण्याच्या उद्देशाने स्थापन झाली. संस्थापकांमध्ये पुण्यातली त्या वेळची प्रसिद्ध वैदिक आणि शास्त्री मंडळी, तसेच वैदिक धर्माभिमानी प्रसिद्ध सद्गृहस्थ व सार्वजनिक कार्यकर्ते यांची नावे आढळतात. सभेचे उद्दिष्ट 'वेदशास्त्रादिकांमध्ये

परिश्रम करणाऱ्या विद्वानांची व विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांस, द्रव्यरूपानें पारितोषिकें व संमतिपत्रें देऊन या रीतीनें वेदशास्त्रादिकांच्या अध्ययनाचा व ज्ञानाचा उत्कर्ष करावा व धर्माचरणास उत्तेजन द्यावें ', याप्रमाणे होते. आणि त्याला अनुसरून सभेचे कार्य अव्याहत चालू होते. शके १७९७ ते १८१७ या एकवीस वर्षात एकूण २१८ उमेदवार सभेच्या निरनिराळ्या परीक्षा उत्तीर्ण होऊन गेले होते. महाराष्ट्र व कर्नाटक यातून निरनिराळ्या ठिकाणांहून मोठमोठे शास्त्री पंडित आपापल्या हातखंडा शास्त्राची परीक्षा घेण्यासाठी परीक्षक म्हणून येत असत. सभेचे चिटणीस बळवंत रामचंद्र सहस्त्रबुद्धे हे होते. हे स्वधर्माचे आणि संस्कृत विद्येचे अभिमानी, दक्षिण भागाचे शिक्षण निरीक्षक म्हणजे एज्युकेशल इन्स्पेक्टर होते. ते सभेच्या परीक्षांच्या करिता मुद्दाम पुण्यास येत असत. परीक्षा झाल्यावरोबर लगेच मोठा थाटाचा बक्षीस समारंभ फडतरे यांच्या वाडचात प्रशस्त सभागृहामध्ये होत असे. गावातली प्रतिष्ठित मंडळी मोठ्या संख्येने या समारंभास जमत असत. सुप्रसिद्ध समाजमान्य विद्वानाची अध्यक्षस्थानी योजना करण्यात येत असे. पारितोषिके व प्रशस्तिपत्रे वाटण्याचे काम झाल्यानंतर चिटणिसांचे अहवाल वाचन होई; नंतर काही विद्वानांची संस्कृत विद्येच्या महती संबंधाने भाषणे होऊन अध्यक्षांचा समारोप व आभार प्रदर्शन होत असे. आर्यविद्येच्या विद्यापीठाचा हा एक मोठा दर्शनीय पदवीदान समारंभ (कॉन्व्होकेशन) साजरा होई असे म्हटले तरी चालेल.

या संस्थेच्या वर्ष २८–२९ (शके १८२४–२५) च्या वार्षिक रिपोर्टामध्ये नानांचे उल्लेख प्रथम आढळतात. शके १८२४ च्या रिपोर्टामध्ये त्यांच्या संबंधीचा उल्लेख असा आहे : ' ह्या सभेस प्रथमच प्रेक्षक या नात्यानें आलेले गृहस्थ प्रोफेसर नारायणरावजी वनहट्टी यांनीं आपण होऊन परीक्षा चालविण्याचें कामास फारच मदत केली. ती अशी कीं दोन्ही वेळ वक्तशीर हजर राहून परीक्षेचें काम व्यवस्थेशीर चाललें आहे कीं नाहीं हे ते पाहत होते. असे गृहस्थ या विषयाची कळकळ बाळगणारे अलीकडील मंडळींत फारच थोडे आहेत. त्यांनीं या कामांत जी उत्सुकता दाखविली ती फार प्रशंसनीय आहे. आम्हाला तरी हळू हळू हें काम तरुण मंडळींवर सोंपविणें आहे व त्या संबंधानें योग्य व उत्सुक गृहस्थ मिळण्याची जी काळजी होती ती बरेच अंशानें दूर झाली यामुळे मला फार आनंद होत आहे. '

शके १८२५ च्या रिपोर्टात पुढील प्रमाणे उल्लेख आहे. ' चालू सालींही सभेचें काम चालविण्या संबंधानें रा. रा. नारायणरावजी वनहट्टी व रा. रा. रघुनाथ सितारामशास्त्री पेंडसे यांनीं मला फार मदत केली. हे उभयता गृहस्थ इतके आस्थेवाईक आहेत कीं, रा. रा. वनहट्टी हे घरगुती कांहीं जरूरीचे कामाकरितां मिरजेस गेले असूनही केवळ सभेचे कामाकरितां ३–४ दिवस फुरसत करून बुध्यां येथें आले. '

शके १८२६ च्या रिपोर्टातील उल्लेख इतका गौरवपर आहे की त्यापेक्षा अधिक गौरवाचे उद्गार काढणे अशक्य, असे कोणासही वाटेल : ' चालू सालींही सभेचें काम चालविण्याचे संबंधानें रा.रा. नारायण दासो वनहट्टी यांची मला फारच मदत जाहली. वनहट्टी हे यंदा सुद्धां सभेच्या कामाकरितां मिरजेस न जातां येथें राहिले. एखादें काम पत्करलें म्हणजे तें करण्याची त्यांची आस्था कांहीं विलक्षण आहे. शिवाय असें काम करण्याची त्यांस स्वभावतःच हौस आहे. त्यांची विद्वत्ता फार चांगली असल्यामुळें सभेच्या कामास त्यांचा फार उपयोग होतो. त्यांची गति वहुतेक सर्वत्र फार चांगली आहे. शिवाय ते पूर्ण रीतीनें जुन्या पद्धतीचे अभिमानी असल्यामुळें मला जसे मदतनीस पाहिजे आहेत तसे ते आहेत. इंग्रजी शिकण्याचा परिणाम त्यांचे बुद्धीवर उलट प्रकारचा जाहला नाहीं. त्यांचेंमुळें माझी सभेच्या संबंधाची पुष्कळ काळजी नाहींशी जाहली आहे. त्यांनीं मदत केल्यावद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.' सालोसालचे हे गौरवपर लेख सभेचे चिटणीस, म्हणजे चालक, सहस्त्रबुद्धे यांच्या हातचे आहेत हे सांगणे नको.

या नंतर म्हणजे शके १८२८ (इ.स. १९०७) या वर्षापासून नारायण दासो वनहट्टी सभेचे चिटणीस झाले, ते अखंडपणे शके १८४० पर्यंत त्या पदावर होते. वारंवार निरनिराळ्या ठिकाणी वदल्या होत राहिल्याकारणाने सभेचे कच्चे काम पहाणे दुर्घट होऊ लागल्यामुळें त्याकरिता जॉईंट सेक्रेटरी म्हणजे दुय्यम चिटणीस म्हणून काही गृहस्थांच्या नेमणुका पुढे करण्यात आल्या तरी सभेचे सूत्रचालकत्व शके १८३९ (१९१८) सालापर्यंत नानांच्याकडेच होते. परीक्षक वर्गामध्ये त्यांचे नाव शके १८२५ सालापासून आढळते. साधारणतः व्युत्पत्ति, अलंकारशास्त्र, संस्कृतविद्येचा इतिहास

ह्या विषयांचे ते परीक्षक असत. त्यांच्या कार्यकाला-मध्ये संस्थेचा निधि १४००० रुपयांपासून २८००० रुपयांपर्यंत वाढला. संस्थेच्या उद्देशांच्या मर्यादेत सर्व-समावेशक धोरण स्वीकारून त्यांनी संस्थेची लोक-प्रियता वाढविली आणि भरीव कार्यामुळे तिची कीर्ति अधिक उज्ज्वल केली. आमच्या आईच्या मृत्यूमुळे आणि स्वत:च्या वृद्धापकाळामुळे शके १८४० (१९१९) साली त्यांनी संस्थेचे चिटणीसपद सोडून दिले. त्याच्या पुढच्या वर्षाच्या वार्षिक वृत्तांतात त्यांच्याविषयी पुढील-प्रमाणे उल्लेख आढळतो. 'रा. बनहट्टी यांचा सभेशी आज १५।१७ वर्षांपूर्वीपासूनचा संबंध असून जवळ-जवळ तितकींच वर्षे त्यांनीं सभेच्या चिटणिसांचें काम केलेलें आहे रा. बनहट्टी यांनीं १५।१७ वर्षे सभेची जी कामगिरी बजाविली आहे त्याबद्दल सभा त्यांची फार आभारी आहे. त्यांनीं केलेल्या अमूल्य कामगिरी-बद्दल त्यांचे आभार मानण्यापलीकडे सभेस दुसरें कांहींएक करितां येत नाहीं, ह्याबद्दल सभेस वाईट वाटतें.' चालकांना दुसरे काही करिता आले नाही तरी यापेक्षा अधिक विस्तारांने आणि गौरवपर खचित लिहिता आले असते. दुसरे काही करावे अशी बनहट्टींची अपेक्षाही नव्हती. तावत्कालपर्यंत दुसऱ्या कोणीही केली नव्हती, इतकी सभेची सेवा बनहट्टींनी केली ती पूर्ण निरपेक्ष भावनेने केली होती; पण पूर्वसूरींनी सिद्ध व सुसज्ज केलेल्या पीठावर आरूढ होणाऱ्या उत्तराधिकाऱ्यांनी आपले मन ओतून कृतज्ञता व्यक्त केली असती तर त्यांना ते भूषणास्पद झाले असते. आर्य संस्कृतीने आणि वैदिक धर्माने कृतज्ञता हा फार मोठा सद्‌गुण मानिला आहे.

वेदशास्त्रोत्तेजक सभेचा परीक्षा व पारितोषिक वितरण समारंभ म्हणजे नानांना विशेष आनंदाचा समय वाटे. त्यांच्या उत्साहाला भरते येत असे. बरेच वेळा ते मला आपल्याबरोबर नेत असत. समा-रंभाचा सर्वसाधारण आविर्भाव अजून मला डोळचां-समोर दिसतो. फडतऱ्यांच्या त्या भव्य सभागृहामध्ये पावले बुडतील इतका मऊ रुजामा अंथरलेला. चहू बाजूंना लोड तक्ये ठेवलेले. सर्वत्र शुभ्र रंगाचे साम्राज्य. अशा त्या सभेमध्ये खळणीचा शुभ्र पोशाख केलेली नानांची भव्य तेजस्वी मूर्ति केंद्रस्थानी शोभत असे. सर्वांचा यथायोग्य मान राखून सर्वांचा संतोष साधेल अशा रीतीने ते सभेचे सूत्रचालकत्व पार पाडीत. सभेचे कारकून विनायक बळवंत घांगरेकर नावाचे असत. कंदी पागोटे व चुणीदार बाह्यांचा अंगरखा घातलेली त्यांची मूर्ति मला चांगली आठवते. त्यांची ताव भरून लांब लांब पत्रे नानांना आलेली स्मरतात. ते नानांना म्हणायचे "नानासाहेब, सभा चालली आहे, तिची भरभराट होत आहे ती तुमच्यामुळे. तुम्ही तिच्यावरचे लक्ष कमी करू नका. काही हुच्च लोक येतील व वखेडा माजेल. अशांना भीक घालण्यात मतलब नाही. इत्यादि."

पुण्यातील शास्त्रीपंडित

संस्कृत विद्येच्या सर्व शाखांचा गाढ व्यासंग आणि वेदशास्त्रोत्तेजक सभेशी जिव्हाळ्याचा संबंध, यामुळे नानांचा पुण्यातील बहुतेक शास्त्रीपंडितांशी परिचय झाला होता. त्यांपैकी काही जण आमच्या घरी येत असत. पांडुरंगशास्त्री पारखी हे आमच्या घरी आलेले मला चांगले आठवतात. हे जुन्या पद्धतीचे पंडित असून मराठीत यांनी 'षड्‌ऋतु वर्णन' नावाचे काव्य रचिले होते. सर्वांत थोर आणि विख्यात वासुदेवशास्त्री अभ्यंकर. हे मुख्यत: वैयाकरण; पण पुढे अनेक शास्त्रांचा व्यासंग करून सर्वशास्त्रपारंगत असा यांनी अखिल भरतखंडभर लौकिक मिळविला. यांचा व नानांचा परिचयच नव्हे, तर स्नेह होता. अनेकवार हे आमच्या घरी आलेले मला आठवतात; एखादे पुस्तक आणण्याकरिता किंवा देण्याकरिता त्यांच्या घरी नाना मला क्वचित पाठवीत असत, हेही आठवते. चेहेरा उभट आणि दाभणकाठी मिशा, उंच देहयष्टि, आणि वेदान्ती पुरुषास साजेशी त्यांची प्रशान्त गम्भीर मुद्रा माझ्या डोळचांसमोर अद्याप दिसते. सभेच्या संचालनामध्ये नाना यांचा सल्ला घेत असत.

आमच्याकडे मधून मधून येणारे आणखी एक शास्त्री होते. यांचे नाव विनायकशास्त्री खानापूरकर. हे उत्तम ज्योतिषी होते. गणितज्योतिष आणि फल-ज्योतिष दोहींवर यांचे प्रभुत्व होते. भास्कराचार्यांच्या 'लीलावती' नामक गणित ग्रंथाच्या सर्व भागांचे भाषांतर यांनी केले होते. ते नानांना दाखवून त्यांच्या सूचनांनुसार हे त्यात सुधारणा करीत. त्याचे सर्व भाग त्यांनी वर्गण्या करून छापून काढले. साधारण हिरवट रंगाचा अंगरखा यांच्या अंगावर असे असे स्मरते. सातारा जिल्ह्यातील खानापूरचे हे राहणारे. वेदशास्त्रोत्तेजक

सभेच्या परीक्षक वर्गात नानांनी यांचा समावेश केला होता त्यामुळे परीक्षा सत्राच्या वेळी यांचे पुण्यास येणे घडत असे. अर्थात आमच्या घरी त्यांच्या हमखास खेपा व्हायच्याच. यांच्या संबंधाने नाना एक गोष्ट नेहमी सांगत असत. हे उत्तम ज्योतिषी आणि स्नेही, म्हणून माझा जन्म झाला तेव्हा माझी पत्रिका यांच्याकडून करून घ्यावी असे नानांनी योजिले. त्यांनी जन्मवेळ विचारली ती नानांनी सांगितली. शास्त्रीबुवांनी गणित करून सांगितले की या वेळेस झालेले अपत्य पुत्र असू शकत नाही, कन्याच असू शकेल. तेव्हा नानांनी बाळंतिणीसमोरून मला उचलून शास्त्रीबुवांच्या पुढे आणून ठेवले ! वेळ खरी की समोर आणून ठेवलेल्या मुलाचे लिंग खरे ? शास्त्रीबुवांनी आणखी चौकशी करून पुत्रजन्मास अनुकूल अशी जी निकटची वेळ होती तिला अनुसरून माझी पत्रिका तयार केली ! विशिष्ट वेळेचे असे काही लक्षण असते काय, की त्यावेळी झालेले अपत्य कन्याच किंवा पुत्रच असले पाहिजे ? कुणास ठाऊक ! ज्योतिषावर नानांचा बराच विश्वास असे. माझा तसा नाही. धर्मकृत्याकरिता संकल्पात स्थलकालाचा उच्चार झाला पाहिजे म्हणून मी पंचांग पाहतो. आणि कौटुम्बिक कार्यप्रसंगी तिथि वार नक्षत्र इत्यादिकांचे शुभाशुभत्व पाहतो. पण त्याकरिता आमच्या इथे काही अडत नाही. इतर दृष्टींनी जे ज्यावेळी करावयास पाहिजे ते करण्यास शुभाशुभत्वाचा विचार कधी आड येऊ देत नाही.

तुका म्हणे हरिच्या दासा । शुभ काळ दाही दिशा
हाच अंतिम श्रेयाचा विचार होय.

खानापूरकर शास्त्रीबुवांनी केलेली पत्रिका आमच्या घरी जपून ठेवली होती. पानशेतच्या पुरात इतर अनेक कागदपत्रांबरोबर ती नष्ट झाली.

शरीर प्रकृति चांगली राखण्याचा एक उपाय खानापूरकरशास्त्री करीत असत. " रोज सकाळी प्रातर्विधि आटोपल्यानंतर कडू लिंबाचा पाला वाटून त्याचा लिंबाएवढा गोळा मी खातो. त्यामुळे मला कधी कसलाही आजार होत नाही. " असे ते सांगत. कडू लिंबाचा पाला आरोग्यकारक आहे हे खरे. पण प्रत्येक गोष्टीचे तारतम्य आहे. रोज एवढा लिंबाचा पाला खात गेल्याने काही अपाय होण्याचाही संभव आहे. त्याने कामेच्छा कमी होते असे नाना म्हणत. अण्णासाहेब पटवर्धनांच्या पुष्कळशा औषधीयोगांमध्ये कडूलिंबाचा समावेश असे. अर्थात हे विशिष्ट आजार झाला असेल तर.

सभेचे कार्य आपल्यामागे सुयंत्रित चालावे याकरिता योग्य कार्यकर्ते मिळविण्याचाही नानांनी प्रयत्न केला. जनार्दन विनायक ओक हे उत्तम संस्कृतज्ञ असून सनातनी विचारसरणीचे कट्टे अभिमानी होते. देशभक्तीस्तव मोठा त्याग करून तळेगावच्या समर्थ विद्यालयाचे ते मुख्याध्यापक झाले होते. सरकारच्या रोषामुळे विद्यालय बंद पडल्यानंतर यांनी पुण्यास वास्तव्य करून ' लोकशिक्षण ' नावाचे मासिक सुरू केले होते. वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षाही यांनी दिल्या होत्या. नानांनी यांचे साह्य मिळविण्याचा प्रयत्न केला. पण तो तितकासा सफल झाला नाही. सभेच्या वार्षिक समारंभात एकदोनदा यांची कृश मूर्ति पाहिल्याचे मला स्मरते.

दुसरे गृहस्थ कृष्णाजी शंकर दीक्षित. ' भारतीय ज्योतिःशास्त्र ' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे हे चिरंजीव. नाना जळगावला नवीन स्थापन होणाऱ्या हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून गेले त्याच्या पूर्वी तेथे चार यत्तांपर्यंत मिडलस्कूल होते; त्याचे ते सरकारच्या वतीने नेमले गेलेले हेडमास्तर होते. त्यांचीच नवीन स्थापन होणाऱ्या गोवर्धनदास सुंदरदास हायस्कूलमध्ये फर्स्ट असिस्टंट म्हणून नेमणूक झाली होती. डेक्कन कॉलेजमध्ये नानांनी त्यांना संस्कृत शिकविले होते तो गुरुशिष्य संबंध ते मानीत असत. आमच्या घरी आले म्हणजे समान आसनावर न बसता नम्रतेने जरा दूर बसत. -शंकर बाळकृष्णांच्या विषयी नानांना पुष्कळ आदर; हे त्यांचे पुत्र म्हणून आणि आपले विद्यार्थी म्हणून यांच्याविषयी विशेष प्रेम. वेदशास्त्रोत्तेजक सभेचे दुय्यम चिटणीस होण्याबद्दल नानांनी त्यांचे मन वळविले. पण भिडेची शिदोरी शिक्यावर चढत नाही. इ. स. १९१५ ते १८ तीन वर्षे त्यांनी काम केले. पुढे सातारा जिल्ह्याचे शैक्षणिक निरीक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली तेव्हा सभेचे काम त्यांनी सोडून दिले. त्यानंतर सभेचा कारभार इतर व्यक्तींच्या हाती गेला. सध्या सभेचे काय कार्य चालते व तिचे चालक कोण आहेत याची मला कल्पना नाही.

संगीतक्षेत्रातील कार्य

नानांचे दुसरे मोठे कार्य संगीताच्या संबंधात

झाले. संगीताकडे त्यांची प्रवृत्ति लहानपणापासून होती. लहानपणी मिरजेस घरच्या देवाची पालखी काढून तिच्यापुढे ते हौसेने गाणी म्हणत असत. मुंबईस कॉलेजात गेल्यावर कॉलेजाच्या वार्षिक स्नेहसंमेलन-प्रसंगी उत्तररामचरित् नाटक करावयाचे ठरले होते. त्यात ह्यांचा पार्ट होता (कोणता ते आता मला आठवत नाही.) या नाटकातील श्लोक एका संगीत शिक्षकांच्या मदतीने रागतालामध्ये बसवून त्यांच्या तालमी घेतल्या होत्या. पुढील श्लोक गाण्याच्या पद्धतीवर त्यांनी म्हणून दाखविलेला मला अद्यापि स्मरतो :

किन्त्वनुष्ठाननित्यत्वं स्वातन्त्र्यमपकर्षति ।
संकटा ह्याहिताग्नीनां प्रत्यवायैगृहस्थता ।।

मुंबईस असताना किर्लोस्करांची नाटक मंडळी तिथे आली असता वासुदेव नारायण डोंगरे यांचीही मंडळी तिथे होती. दोघांचेही शाकुंतल नाटक निरनिराळ्या नाट्यगृहात लागावयाचे आणि परस्परांची चढाओढ चालावयाची. दोघांचे शाकुंतल बघून त्यांनी आपला अभिप्राय बनविला होता. किर्लोस्करांची सोंगे अधिक चांगली, पात्रांचा नखरा अधिक आणि रचना प्रासादिक. पण डोंगऱ्यांच्या प्रयोगातले गाणे अधिक सुरेल व शास्त्रशुद्ध असे ते सांगत असत. हे त्यांचे निरीक्षण १८९० च्या सुमाराचे असावे. इतके संगीताचे ज्ञान त्यांना त्या वेळी होते. आणि अर्थात गोडीही होती.

पुण्यास येऊन स्वस्थता लाभल्यावर संगीताच्या त्यांच्या आवडीचे दृढ व्यासंगात रूपांतर झाले. कोणताही विषय घेतला की त्याचा पायाशुद्ध, सांगोपांग अभ्यास करावयाचा असा त्यांचा जन्मस्वभाव होता. पुण्यास त्या वेळी 'पुणे गायन समाज' नावाची संगीताच्या उन्नतीकरिता आणि प्रसाराकरिता प्रयत्न करणारी संस्था होती. तिची स्थापना इ. स. १८७४ साली झाली असून तिचे धोरण सरकारच्या पंखाखाली राहून काम करण्याचे होते. बादशहा सातवे एडवर्ड, नेक नामदार गव्हर्नर साहेब आणि निरनिराळे बडे बडे संस्थानिक हे तिचे आश्रयदाते; कोल्हापूरचे महाराज आश्रयदाते अध्यक्ष, आणि कौन्सिलात कमिटीमध्ये अनेक सरदार, रावबहाद्दुर मंडळी असत. अर्थात ही गोष्ट कालमानानुसार अपरिहार्य होती. संगीतासारख्या कलेच्या उजागरीचा प्रयत्न राजाश्रयाशिवाय चालू राहणे दुरापास्त होते. राजमंडळाची अनुकूलता असली म्हणजे संस्थानिक, सरदार आणि इतर सरकाराश्रित मंडळी आस्था दाखवितात आणि साह्य करतात. ह्या विषयाला राजकीय किंवा आर्थिक बाजू नसल्यामुळे राजमान्य मंडळी मोकळ्या मनाने यात भाग घेतात आणि साह्य करितात. प्रस्तुत संस्थेशी नानांचा संबंध १९०० सालापासून येण्यास सुरवात झाली असे दिसते. या सालच्या नामावळीत सन्माननीय सदस्यांच्या यादीमध्ये पंडित नारायण दासो बनहट्टी हे नाव आढळते. ह्या वर्षापासून संगीताच्या प्रगतीसाठी आणि जोपासनेसाठी त्यांचे परिश्रम सुरू झालेले दिसतात. पुणे गायन समाजाने बालविद्यार्थ्यांकरिता संगीत शाळा चालविली होती. स्वतंत्र शाळा चालविण्यापेक्षा सामान्य शिक्षण देणाऱ्या एखाद्या मोठ्या शाळेला जोडून संगीताचे वर्ग सुरू केले तर त्याचा प्रसार अधिक होईल अशा कल्पनेने नूतन मराठी विद्यालयाच्या प्राथमिक शाळेला जोडून हे वर्ग चालविण्यात येऊ लागले. त्यांना व्यवस्थित शिक्षण देण्याकरिता संगीत शिक्षक नेमावेत, शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरिता संगीत विषयाचे तात्त्विक ज्ञान देणारी आणि प्रायोगिक अभ्यास श्रेणीबद्ध स्वरूपात मांडणारी अशी पुस्तके हवीत. अशी पुस्तके 'बालसंगीतबोध' पुस्तक पहिले, दुसरे आणि तिसरे या नावाने नारायण दासो बनहट्टी यांनी तयार केली. ही पुस्तके तयार करताना ट्रेनिंग कॉलेज मधील संगीताचे शिक्षक बाळकृष्ण नारायण नाटेकर यांची मदत घेतली होती. अण्णा किर्लोस्करांच्या नाटक मंडळीत शाकुंतलातील कण्वाचे आणि सौभद्रातील बलरामाचे काम करणारे बाळकोबा नाटेकर ते हेच. पुण्यात आमच्या घरी हे अनेकवार आलेले मला चांगले आठवतात. गोबरे, पसरट नाक, तोंडावर देवीचे वण, जाडेले ओठ आणि रुंदट चेहरा असे हे गृहस्थ त्या काळच्या विशिष्ट पद्धतीप्रमाणे जेठा मारून काही बोलत किंवा एखादा अलंकार किंवा आलाप उदाहरणादाखल म्हणून दाखवीत असलेले मला चांगले आठवतात.

'बालसंगीत बोध' या तीन क्रमबद्ध पुस्तकांचा चांगला गौरव झाला. त्यांच्यामुळे संगीत शिकविण्याची चांगली सोय झाली तेव्हा नूतन मराठी विद्यालयाच्या प्राथमिक शाळेच्या सर्व वर्गांना संगीत शिकविण्याची सोय करण्यात आली. रोज दोन तास संगीताचा

वर्ग घेण्यात येत असे. अशा रीतीने प्राथमिक शाळेची सगळी म्हणजे ६१५ मुले संगीत शिक्षणाचा लाभ घेऊ लागली. या शिवाय ट्रेनिंग कॉलेजातल्या प्रॅक्टीसिंग स्कूलमध्ये संगीत शिकविण्यात येत असे ते निराळे.

या कामगिरीचे वर्णन पुणे गायन समाजाच्या १९०७-०८ च्या रिपोर्टात जरा तपशीलवार केलेले आढळते ते असे : " (समाजातर्फे) नवी पद्धति सुरू करण्यात आली अशातला भाग नाही. प्राचीन भारताची संगीत पद्धति उत्तम विकसित झालेली होती. ज्यांना पाहिजे असेल त्यांना ती सुलभ करून द्यावी या हेतूने संगीताचा श्रेणीबद्ध अभ्यासक्रम सामान्य शिक्षणक्रमामध्ये बसविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला. जुन्या पद्धतीच्या संस्कृत पंडिताना संगीतावरच्या प्राचीन ग्रंथांचा उलगडा करण्याचे काम जमण्यासारखे नव्हते. इकडे गायकीचा व्यवसाय करणाऱ्या गवयांना त्यांचा बरोबर अर्थ समजण्याची पात्रता नव्हती, तर संस्कृत घेऊन बाहेर पडलेल्या विद्यापीठाच्या पदवीधरांना तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे नुसता शब्दांचा अर्थ कळून उपयोग नव्हता. अशा स्थितीत संस्कृत विद्येच्या सर्व शाखांचा ज्याने दृढ व्यासंग केला आहे असा एक गाढ अभ्यासी विद्वान समाजाच्या मदतीला आला. हा विद्वान म्हणजे श्री. बनहट्टी हे होत. कुमार वयापासून यांचे वाद्यसंगीताकडे विशेष लक्ष होते. नंतर प्रौढ वयात संस्कृतातील संगीतावरील ग्रंथांचा यांनी खास व्यासंग केला आणि तालावर मराठीत पुस्तिका लिहून त्या प्रकाशनार्थ सिद्ध केल्या होत्या. सप्तस्वरांच्या निरनिराळ्या मांडणीने सुमारे ६८ अलंकार होतात. या अलंकारांच्या कानाला सुखदायक अशा भिन्नभिन्न रचना म्हणजे राग होत. रागांच्या निर्मितीतील निरनिराळ्या टप्प्यांमधील हे दुवे ओळखून त्यांची क्रमवार मांडणी करणे ही संगीतशास्त्राची पायाभूत साधना होय. तिच्याकडे कित्येक शतके दुर्लक्ष झाले होते. त्यांचे संशोधन करून पुनःस्थापन करणे ही 'समाजा'करिता बनहट्टींनी केलेली अत्यंत महत्वाची कामगिरी होय. आपले निर्वाहाच्या व्यवसायाचे कष्टप्रद काम पार पाडून जी फुरसद काढता येईल तिच्यामध्ये त्यांनी संगीतातील अलंकारांच्यावर प्राथमिक धडे तयार केले. त्यांना स्वरलिपि आणि टिप्पणी देऊन सुगमतेच्या दृष्टीने त्यांची मांडणी करून 'संगीतबोध' नावाचे अभ्यासपुस्तक तयार केले. हे त्यांचे कार्य हिंदुस्थानात प्रचलित असलेल्या उत्तरीय आणि दाक्षिणात्य या दोन्ही पद्धतींना सारखेच उपयुक्त ठरेल. कारण ज्या संस्कृत ग्रंथांचे आधार त्यांनी दिले आहेत ते सर्व देशभर सर्व समाजांना मान्य असेच आहेत."

"याखेरीज या ग्रंथकाराने 'बालसंगीतबोध' या नावाची क्रमिक पुस्तक मालिका तीन भागांमध्ये तयार केली असून त्यात गायनाच्या पद्धतीवर कविता बसवून दाखविल्या आहेत. आणि स्वर, ताल आणि राग यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या उपयुक्त प्रस्तावना त्याला जोडल्या आहेत. या ग्रंथांना भावनगरचे महाराज, राजकोट, अहमदाबाद आणि बडोदे येथील एतद्देशीय आणि युरोपियन समाजातील प्रमुख गृहस्थ आणि बडोद्याच्या महाराणीसाहेब यांची फार मोठी प्रशंसा लाभली आहे."

या रिपोर्टात बनहट्टींच्या कार्याचे जरासे तपशीलवार विवरण आहे. इतर अनेक वर्षांच्या रिपोर्टांमध्ये त्याचा संक्षिप्त निर्देश आहे. गायन समाजाच्या कार्याचे हे प्रमुख अंग असल्यामुळे त्याचा निर्देश असल्याखेरीज गत्यंतरच नव्हते.

संगीताच्या संबंधाने नानांचा अनेक व्यक्तींशी कमी जास्त संबंध अगर स्नेह जुळलेला होता. पहिला क्रमांक बळवंत त्र्यंबक सहस्रबुद्धे यांना दिला पाहिजे. हे गायन समाजाचे सेक्रेटरी. हे बरेच स्थूल असून सावळ्या रंगाचे होते, असे मला स्मरते. संगीताचे ज्ञान यांना कितपत होते हा प्रश्नच आहे. हे बाह्य उलाढालींमध्ये निपुण होते. बडे सरकारी अधिकारी आणि त्यांच्या प्रभावळीतील सरदार रावबहाद्दूर इत्यादि मंडळी यांच्याकडे वळण ठेवून त्यांच्या दबदब्याने संस्थेचे कार्य पुढे रेटण्यात हे निपुण होते. यांना आमच्या घरामध्ये 'ढोलेबुवा' असे व्याजनाम होते. हे अर्थातच आमच्या घरी नेहमी येत. एकदा दुपारी आले असता, तक्क्याचे उसे करून आडवे झालेल्या नानांना डुलकी लागली होती व ते घोरत होते. मी जवळच होतो. ढोलेबुवा आले, नानांना निजलेले पाहून त्यांनी चिठी लिहिली. "मी अमुक वाजता आलो होतो. तुम्ही घोरत होता म्हणून परत गेलो." चिठी ठेवून ते निघून गेले. थोड्या वेळाने नाना जागे झाले आणि त्यांनी चिठी पाहिली. "थोडा वेळ डुलकी लागली होती तर या गृहस्थांनी चेष्टेने तुम्ही घोरत

होता असे लिहिले. काही तरी चेष्टा करायची त्यांना सवयच आहे." मी लगेच म्हटले, "नाही नाना, तुम्ही खरंच घोरत होता." घोरणाऱ्या माणसाला आपण घोरतो याची जाणीव नसते आणि तसे कुणी सांगितले तर ते त्याला पटत नाही. बाकी ढोलेबुवा होते खरेच चेष्टेखोर. मात्र त्यांनी केलेल्या नकला आता आठवत नाहीत.

दुसरे नानांचे संगीतप्रेमी स्नेही दत्तात्रय केशव जोशी. हे नूतन मराठी विद्यालयामध्ये शिक्षक होते. हे वर्णाने गोरे, चांगले उंच व सडसडीत, उभट चेहऱ्याचे तरतरीत नाकाचे, असे रूपसंपन्न होते. नानांची बदली झाल्यावर यांनी संगीतविषयक व्याख्याने दिली आणि इतरही कार्य केले. हे सुप्रसिद्ध टोकेकर जोश्यांच्या घराण्यातले होते की काय याची कल्पना नाही. त्यांच्या वाड्यात हे रहात असत हे मात्र खरे. यांच्याकडे मला बरोबर घेऊन नाना पुष्कळदा जात असत. तिसरे बाबासाहेब पटवर्धन म्हणून होते. हे पटवर्धन सरदारांच्या एका शाखेपैकी असल्यामुळे यांना नक्त नेमणूक होती. ही दरमहा २०० रु. च्या सुमारात असावी असे स्मरते. ही नेमणूक आणि सरदारकीचे हक्क वाढवून घेण्याच्या खटपटीत हे असत.

पण यापेक्षा मला गंमत वाटत असे ती आमच्याकडे हजेरी लावणाऱ्या गायकवादक मंडळींची. सारंगी, बीन, सतार, ताऊस, रुद्रवीणा अशी किती तरी वाद्ये ! सर्व तंतु वाद्यांचे तत्त्व एकच असले तरी प्रत्येकाचा प्रकार निराळा आणि त्यातून निघणाऱ्या नादाची गोडी काही निराळी ! नाटेकर बीनकार होते. बीन हे मोठे वाद्य. सतारीप्रमाणे उभे घेऊन वाजवण्याजोगे नव्हे. ते जमिनीवर आडवे ठेवूनच वाजवायचे. त्याचा आवाज फार मधुर. गायनाप्रमाणे वादनकला ही अधिक प्रमाणात मुसलमानांनी हस्तगत केली होती. सारंगीवाले मुसलमान असावयाचे हे बहुतेक ठरलेले. बँजो नावाचे एक वाद्य आहे. ते वाजविणारे प्रो. कौकब नावाचे होते. त्यांचा नानांशी स्नेह जुळला होता. ते कलकत्त्याकडचे राहणारे होते. मुंबईपुण्याकडे त्यांची फेरी झाली की आमच्या घरी हटकून यावयाचे. माझ्याकरिता खाऊ आणावयाचे आणि बँजोवर एखादी तरी गत वाजवून दाखवावयाचे. खाऊमुळे नव्हे, तर बँजोमुळे आणि त्यांच्या रुबाबदार आकृतीमुळे मला त्यांची अद्याप आठवण आहे.

आमच्या घरी नानांनी एकदा वाद्यांचे प्रदर्शन भरविले होते. मला वाटते निरनिराळी ३५/४० तरी वाद्ये असावीत. हे कोणाकरिता होते याची मला त्या लहान वयात काही कल्पना येणे शक्य नव्हते. एकेक वाद्य वाजविणारा आपले वाद्य घेऊन त्याच्यावर एखादी गत वाजवी, मग दुसरा येऊन आपले वाद्य वाजवी, असे क्रमाने चालले होते असे मला स्मरते. हा कार्यक्रम गायन समाजाचे शिक्षक आणि प्रौढ विद्यार्थी यांच्याकरिता बहुधा योजलेला असावा. वाद्यांच्या या प्रात्यक्षिकाने ज्ञानात पुष्कळच भर पडली असेल यात शंका नाही.

साहजिकच कुठे गाण्याची किंवा नाचाची मैफल असली म्हणजे नानांना बोलावणे असे व तेही कित्येक वेळा मला बरोबर घेऊन जात. नाचाच्या कार्यक्रमाला एकदा आम्ही गेलो होतो. मी एवढासा, अगदी कंटाळून गेलो; पण त्यात समयांचा नाच होता असे स्मरते. आठवण अंधुक आहे. पण सर्व बाजूंनी वाती लावून पेटविलेल्या समया डोक्यावर घेऊन दोन बाया नाचत होत्या असे साधारण आठवते. उत्तरेकडची प्रसिद्ध गायिका गौहरजान एकदा पुण्यात आली होती. तिच्या गायनाला नानांनी मला बरोबर नेले होते, हेही आठवते. एका मोठ्या दिवाणखान्यात हंड्या झुंबरे लावलेली, त्यांचा शांत प्रकाश सगळीकडे सारखा पसरलेला, एका कडेला गाणारणीची बैठक, मागे तंबोरेवाले, बाजूला सारंगीवाले, मध्ये ती गायिका, समोर उत्कृष्ट पोषाख करून आलेली प्रतिष्ठित मंडळी असा मोठा भव्य थाट होता. तिचे गाणे मला काय समजणार ? बैठकीचा थाट मात्र लक्षात राहिला आहे.

पुण्यात अशी मौज फार होती. निरनिराळ्या संबंधाची निरनिराळ्या विद्या कलांची मंडळी घरी येत, विद्या कलांच्या आनंदाची लयलूट होत असे. मी अगदी लहान होतो तरी माझ्या एवढे लक्षात राहिले आहे. पुढेही जर आम्ही पुण्यासच राहिलो असतो तर घरच्या घरी नुसते पाहून व ऐकून माझ्या ज्ञानात किती तरी भर पडली असती. विद्याकलांच्या आस्वादाचे मार्ग अधिक सुलभ झाले असते. पण ते व्हावयाचे नव्हते.

न मिळे अशि मौज कधी पाहण्या नरा ।

अशी आमची अवस्था व्हावयाची नव्हती. सन १९०७ मध्ये नानांची अकस्मात धुळ्याला बदली झाली. ह्या

बदलीला सरकारी नियमांची किंवा नियुक्त कर्तव्यासंबंधी वरिष्ठांच्या अभिप्रायाची जी काही कारणे झाली असतील ती असोत. त्या खेरीज जनतेमध्ये असलेले त्यांचे संबंध आणि त्यांनी मांडिलेला हा लोककार्याचा पसारा हेही अंतर्गत कारण असले पाहिजे यात शंका नाही. सरकारी नोकरीच्या नियमामध्ये 'सरकारी नोकर' हा दिवसाचे २४ तास सरकारी नोकर असतो, असा नियम आहे. हा पूर्वी इंग्रजी आमदानीत होता, आता आहे की नाही माहीत नाही. या नियमाचा अक्षरशः अंमल करणे अशक्य; तसा कधी केला जात नसे, हे जरी खरे असले तरी लोकांशी फार संबंध ठेवून लोककार्य करू पाहणारा नोकर परकी राज्यकर्त्यांना आवडत नाही. त्याची बदली करून त्याच्या कार्याचे अधिष्ठान ते उखडू पाहतात असा अनुभव येतो. निस्पृहपणे आपले काम करणाऱ्याला तर तो हटकून येतो. तोच अनुभव नानांना आला आणि १९०७ साली पुण्याहून अत्यंत लांब धुळ्याला त्यांची बदली करण्यात आली. या पेक्षा अधिक दूर बदली करणे त्या वेळी शक्य नव्हते. धुळ्याला देखील हायस्कुलामध्ये फर्स्ट असिस्टंट म्हणून त्यांची नेमणूक पहिल्यांदा नसावी. पण काही महिन्यानंतर फर्स्ट असिस्टंट आणि होस्टेल सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांची बदली झाली. धुळ्याला आम्ही प्रथम शहरामध्ये दुगलांच्या वाड्यात रहात होतो. नंतर होस्टेलच्या आवारात सुपरिंटेंडेंट करिता बंगला होता तिथे राह्यला गेलो. होस्टेलचे आवार खूप मोठे होते. पण बंगल्याच्या मागे बेताचे अंगण असून अंगणाच्या भोवताली भिंत होती. त्यामुळे तेथे बागबगीचा करण्यास चांगली सवड होती.

मनाविरुद्ध बदली!

बारा वर्षे पुण्याला डेक्कन कॉलेजात काम केल्यावर तिथून तडकाफडकी धुळ्याला हायस्कुलात फर्स्ट असिस्टंट म्हणून बदली का झाली याचा काही इतिहास आहे. तो मला नीटसा माहीत नाही. एवढे खरे की ही बदली त्यांच्या मनाविरुद्ध झाली होती. ती सरकारच्या इतराजीची निदर्शक होती, आणि मला वाटते, ती कमी पगारावर करण्यात आली होती. नानांनी आपल्या हाताने आपले त्रोटक जीवनचरित्र लिहून ठेवले आहे, त्यात धुळ्याला 'अकस्मात' बदली झाली एवढाच उल्लेख केला आहे. त्यावेळस फ्रान्सिस गाय सेल्बी हे विद्याखात्याचे डायरेक्टर होते. त्याच्यापूर्वी ते डेक्कन कॉलेजचे अनेक वर्षे प्रिन्सिपल होते. त्या काळात त्यांची नानांच्या वर इतराजी झाली असणे शक्य आहे. काही मंडळी नानांना भेटायला येत त्यांच्या बदलीसंबंधी गोष्टी चालत, तेव्हा त्यांच्या बोलण्यात सेल्बीसाहेबाचे नाव येत असे हे मला चांगले स्मरते. काही मंडळी तर असे सुचवीत की 'तुम्ही सेल्बीला एकवार जाऊन भेटा, तो जर आपला वरिष्ठ आहे तर त्याला भेटण्यात काय बिघडते?' नाना म्हणत, 'मी आपण होऊन त्यांना भेटणार नाही; त्यांच्याशी माझे काही काम नाही; मला काही विचारायचे असेल तर ते मला भेटायला बोलावू शकतात. कालांतराने सरकारला आपली चूक कळून येईल, आणि माझ्यावर झालेला अन्याय दूर होईल.' त्यांनी आपले म्हणणे खरे केले आणि त्यांचे भाकीतही खरे ठरले. सेल्बी १९०८ साली गेला आणि एक दोन वर्षांतच नानांना त्यांच्या हक्कानुसार पगाराच्या ज्या बढत्या मिळावयाच्या त्या मिळाल्या. मात्र कॉलेजातून त्यांचे उच्चाटन झाले ते कायमचे.

त्या वेळी, म्हणजे १९०७ साली काशिनाथ बापू पाठक हे डेक्कन कॉलेजात संस्कृताचे प्रोफेसर होते आणि नानांचा हुद्दा 'असिस्टंट टु दि प्रोफेसर ऑफ संस्कृत आणि मॅनस्क्रिप्ट्स लायब्रेरियन' (संस्कृताच्या प्राध्यापकाचा सहायक आणि हस्तलिखित संग्रहाचा ग्रंथपाल) असा होता. पाठकांची विद्वत्ता पुरातत्त्व स्वरूपाची होती; नानांची विद्वत्ता विशेषेकरून जुन्या पद्धतीनुसार पांडित्य स्वरूपाची होती. पाठक कदाचित नानांना बरे पाहत नसावेत. पण मुख्य वक्री गेलेला ग्रह सेल्बी हाच होता. त्याच्या वक्र दृष्टीमुळे पुणे सोडावे लागले.

निरपेक्ष ज्ञानोपासनेची मूर्ती

नाना नेहमी काही ना काही व्यासंगात गढलेले असत. निरपेक्ष ज्ञानोपासनेची ते केवळ मूर्ति होते. निरपेक्ष ज्ञानोपासना ही आपल्या देशात अत्यंत दुर्मिळ वस्तू आहे. तिची जाणीवही आपल्याकडे सामान्य जनांना तर राहो पण विद्वानांना, साहित्यिकांनाही नसते. जर्मन पंडित मॅक्सम्युलरने संस्कृत विद्येचे पारंगतत्व संपादिले, ऋग्वेदाची सायण भाष्यासह आवृत्ति काढली. एवढ्या उद्योगाची वास्तविक त्याला काय जरूरी होती? कोलब्रुक हा तर ईस्ट इंडिया

कंपनीच्या राजकीय खात्यात नोकर होता. नोकरीचे काम सांभाळून त्याने संस्कृतादि प्राच्य भाषांचा व्यासंग केला आणि प्राच्य विद्यासंशोधनाची मुहूर्तमेढ रोविली. इंग्रजांची गोष्ट त्यातल्या त्यात थोडी निराळी मानिता येईल. हिंदुस्थान हा त्यांचा अंकित देश होता येथील लोकांची विद्या संस्कृति आणि पूर्वपीठिका यांचे ज्ञान करून घेण्याचा त्यांच्यावर अधिक चांगले राज्य कसे करता येईल, या प्रश्नाशी दूरान्वयाने तरी संबंध पोचण्याचा संभव होता. पण जर्मनी, फ्रान्स, अमेरिका यांच्यामध्ये जे संस्कृताभ्यासी पंडित झाले त्यांचे काय? ही निरपेक्ष ज्ञानोपासना होती. आपल्याकडे पूर्वीच्या पिढ्यांमध्ये निरपेक्ष ज्ञानोपासक विरळा असले तरी अगदी झाले नाहीत असे नाही. पुण्यश्लोक रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि लोकमान्य टिळक ही नावे या संबंधात सांगता येतील. टिळकांचा वेदव्यासंग ही शंभर टक्के निरपेक्ष ज्ञानोपासना होती. तिची फळे दोन अपूर्व ग्रंथांच्या रूपात प्रकट झाली. तसेच गीतारहस्य हे त्यांच्या प्रचंड व्यासंगाचे आणि प्रतिभेचे अमृत मधुर फल होय. नानांच्या अंगी अशी उत्तुंग प्रतिभा नव्हती. तथापि ते तितक्याच प्रबळ व निरपेक्ष प्रेरणेचे ज्ञानोपासक होते. वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे गायन समाज इत्यादि संस्थांतील कार्याच्या रूपाने त्यांच्या ज्ञानोपासनेची काही फळे प्रकट झाली. पण एखाद्या सरोवरातील पाण्याचा पाट काढून त्याच्यावर भाजीपाल्याचा मळा काढावा तसे हे होते. पाटातून पाणी गेले तरी जलाशय अथांग तसाच असतो. त्यांची ज्ञानोपासना ज्ञानाकरिता, म्हणजे आत्मानंदाकरिता होती.

हे उदाहरण निरंतर डोळ्यासमोर असल्यामुळे माझ्या अंगी या गोष्टीचे बीजारोपण झाले. पण आपल्या सध्याच्या समाजात तिची जाणीव नसल्यामुळे बहुतकरून मला पराभव स्वीकारावा लागला आहे. चाळीस वर्षांपूर्वी ज्ञानप्रसाराच्या उद्देशाने नवभारत ग्रंथमाला या नावाने पुस्तके काढण्याची योजना सुरू केली. योजनेचे मुख्य स्वरूप असे होते की आपल्यातल्या विद्वानांनी निरनिराळ्या महत्त्वाच्या विषयांवर सुमारे २०० पानांचे स्वतंत्र ग्रंथ लिहावे आणि ते मालेतर्फे प्रसिद्ध करावे. या योजनेच्या मागील वृत्ति आणि तिच्यामुळे ठरणारे तिचे स्वरूप आपल्यातील विद्वानांच्या मनामध्ये मी उतरवू शकलो नाही. काही विद्यापीठीय विद्वानांनी इतर लाभाकरिता ग्रंथ लिहून ते मालेला दिले, काहींनी परीक्षांच्या अभ्यासक्रमास अनुसरून लिहिलेल्या आपल्या इंग्रजी पुस्तकांचे भाषांतर आमच्या पदरात बांधले. याला थोडे आनंददायक अपवाद निघाले. महामहोपाध्याय नानासाहेब मिराशी यांचा '**कालिदास**' हा ग्रंथ त्यांपैकी एक होय. त्यांचे ऋण विसरणे शक्य नाही. या ग्रंथाची चांगली कीर्ति झाली आणि इतर भाषांतून त्याचे भाषांतर झाले. पण न मळलेली वाट चोखाळण्याचा यत्न केला तिथे आम्ही फसलो आणि उपेक्षेचे धनी झालो. भूराजनीति (Geopolitics) हे शास्त्र अलीकडच्या काळात म्हणजे गेल्या ४०–५० वर्षांत बरेच महत्त्वाला चढले होते. गेल्या महायुद्धाच्या काळात तर त्याची उपयुक्तता फारच होती; हे जाणून गो. प्र. भावे नावाच्या गृहस्थांनी या विषयावर उद्बोधक ग्रंथ लिहिला आणि बॅरिस्टर जयकरांची त्याला प्रस्तावना मिळविली. तो आम्ही नवभारत ग्रंथमाले तर्फे प्रसिद्ध केला. फळ काय? उपेक्षा. श्री. भावे सच्चे ज्ञानोपासक, मोठ्या योग्यतेचे गृहस्थ आहेत. ते योगी आहेत. स्वामी रामतीर्थांच्यावर त्यांनी सुंदर ग्रंथ लिहिला आहे. भूगोल शास्त्राचे त्यांच्यासारखे तज्ञ आपल्यात थोडेच असतील. मानचित्रलेखन अर्थात कार्टोग्राफी, म्हणजे नकाशे तयार करण्याची विद्या, हिचा विशेष अभ्यास करून त्यांनी नकाशे तयार केले. ते इतर प्रचलित नकाशांच्या पेक्षा अधिक शास्त्रशुद्ध, माहितीपूर्ण आणि दर्शनीय होते. अशा या अतिशय गुणी माणसाचे, आदर्श ज्ञानोपासकाचे नाव विद्वानांच्या किंवा सुशिक्षितांच्या समाजात किती जणांस माहीत आहे?

अलीकडे एम. ए. झाल्यानंतर पीएच्. डी. होण्याची प्रथा पडली आहे. एम. ए. खूप झाले तेव्हा त्यांची समाजातील मान्यतेची पातळी सहाजिकच खाली आली. तेव्हा ती पातळी गाठण्याकरिता आणि त्या पातळीला अनुसरून प्राध्यापक वगैरेंची नोकरी मिळविण्याकरिता किंवा टिकविण्याकरिता पीएच्. डी. होणे भाग पडते. खूप मंडळी पीएच्. डी. होतात. तरी आपल्याकडे गर्दी कमी असेल, उत्तर हिंदुस्थानात हे पीक किती तरी अधिक येते. पीएच्. डी. च्या अभ्यासासाठी एक मार्गदर्शक लागतो; तिकडच्या एका विद्यापीठाच्या एका प्राध्यापकाच्या मार्गदर्शकत्वाखाली १२५ पीएच्. डी. चे अभ्यासक काम करीत होते, असे

मला कळले ! हे मला कळलेले एक उदाहरण. अशी आणखी कित्येक असतील. आधार सामग्री काय आहे, अनुमान काय निघेल, ते मांडावे कसे याचे ज्ञान राहो; शब्द किंवा वाक्य शुद्ध लिहिणे जमत नाही अशा उमेदवारांचे प्रबंध तपासण्याकरिता येतात. त्या संबंधात इकडून तिकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष येणारी भीड. तेव्हा आपण या व्यवहाराला अपात्र असे म्हणून पराभव पत्करावा लागतो.

व्यक्तीचा पराभव असल्याची विशेष खंत नाही. हा ज्ञानोपासनेचा पराभव आहे. फार पूर्वी नोकरीसाठी मॅट्रिक नंतर बी.ए. नंतर एम.ए. आणि आता पीएच्. डी. अशी परीक्षांची नावे बदलली तरी वृत्ति तीच आहे. पीएच्. डी. करून नोकरीला लागला की, प्राध्यापकाचीच नोकरी असेल तर तो नेमलेल्या अभ्यासक्रमासंबंधी काही वाचीत राहतो. पीएच्. डी. चा विषय त्यात कोठे पडत नसेल तर तो बाजूला पडतो आणि विस्मृतीची धूळ त्याच्यावर साचू लागते. ही स्थिती प्राध्यापकांची. जे इतरत्र नोकरीला लागले असतील त्यांचे काय होत असेल हे त्यांनाच माहीत. प्राध्यापकांचाही व्यासंग आणि आवाका कितपत असतो, या विषयीही अधून मधून टीका पाहण्यात येतेच.

(येथे लेखकांनी लिहून ठेवलेला मजकूर संपला.)

अनुक्रमणिका

'झुला': एक प्राचीन भक्तिगीतप्रकार

वि. बा. प्रभुदेसाई

प्राचीन मराठीतील हस्तलिखित वाङमयाचा शोध घेत असताना 'झुला' हा एक गीतप्रकार मला आढळला. केवळ नामनिर्देशापुरता का होईना, पण काहीसा अपरिचित वाटल्यावरून या 'झुल्या'कडे माझे लक्ष वेधले गेले. वास्तविक देवादिकांच्या पूजोपचाराच्या संदर्भात जी अनेक भक्तिगीते व विविध प्रकारच्या पद्यरचना प्राचीन काळापासून मराठीत प्रचलित आहेत त्यांमध्येच 'झुला' या गीतरचनेचा समावेश करावा लागेल.

'महाराष्ट्र शब्दकोशा'त 'झुला' आणि तत्सदृश काही शब्दांचे अर्थ पुढील प्रमाणे दिलेले आढळतात:–

झुला – पाळणा, हिंदोळा, झोपाळा; चौपाळा; झुलता बिछाना [सं. दोला; प्रा. झुल्ल; हिं. झूला].

झुल(ळ)णा – पु. झोपाळा; चोपाळा; पाळणा [हिं. झूलना].

झुलार – पु. झोपाळा; पाळणा; **झुला** पाहा. 'परी पुत्रमोहाची संपत्ती। चित्त झुलारीं हेलावे।' –नव. १६.१७३.

प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या 'मराठी व्युत्पत्तिकोशा'त (प्रथमावृत्ती १९४६) प्रस्तुत संदर्भात आलेली माहिती अशी आहे :–

झुलणें – क्रि. डोलणे, मिरविणे, अंग हलणे, झोका येणे. To nod, to go lazily. [सं. **झोलयति, दोलयति, स्वल् १** गतौ, ह्वल १ गतौ; प्रा. **झुलइ, झुल्ल**; ओ. **झुलिबा**; हिं. **झूलना**; पं. **झुल्लणा**; बं. **झुला**; सि. **झुलणु**; गु. **झुलवूं**; पहाडी. **झुलणुं**; अकाम. **झुला** = झोला, पाळणा, झोपाळा.]

झोला – पुं. डोला, झोका, झोपाळा, टाळटाळ. A Swing, an evasion. [सं. **दोल**; प्रा. **झुल्ल**; शिकाम. **झोला**.] झोलें तोलें प्रतापें धरित विसभुजीं आणिलें जानुदेशी ।। — विठ्ठल, **सीतास्वयंवर** ४ – ४८.

'महाराष्ट्र शब्दकोशा'तील पुढील शब्दार्थही लक्षवेधक असून त्यात या गीतप्रकाराचे नेमके वर्णन आढळते :—

झुलवा – पु. (गो.) देवालयात किंवा देवाच्या पालखीपुढे कलावंतिणींनी गावयाची स्तुतिपर पदे. [झुलविणे].

आपल्या आराध्यदैवताला पालखीत घालून झुलवताना म्हणावयाची त्याच्या स्तवनाची गीते म्हणजे '**झुला**' किंवा '**झुलवा**' असे याचे एकंदर स्वरूप दिसते. देवाच्या स्तुतिपर असा 'पाळणा' हा जो गीतप्रकार प्राचीन मराठी वाङमयात रूढ आहे त्याचे प्रस्तुत संदर्भातील साम्याच्या दृष्टीने उत्कटतेने स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. देवादिकांच्या आरत्या हा तर एका स्वतंत्र शोधप्रबंधाचा विषय झालेला आहे. '**मराठी आरती**' या आपल्या प्रबंधात 'आरती' ची व्याख्या करताना डॉ. म. वि. गोखले यांनी लिहिले आहे :—

"पाचसहा कडव्यांपर्यंत साधारणतः लांबी असलेले, ध्रुवपदात 'आरती' किंवा 'ओवाळणे' हे शब्द व जयजयकार येणारे, पूजोपचाराच्या वेळीच म्हटले जाणारे, असे जे गेय पद्य त्यास सामान्यपणे आरती ही संज्ञा द्यावयास हरकत नाही."

आरती, स्तोत्रे, पदे, अभंग इत्यादी पद्य प्रकार हे आराध्यदैवत, तीर्थ किंवा व्यक्ती यांनाच अनुलक्षून रचलेले आढळतात ही गोष्ट खरीच आहे. तरी पण विविध पैलू विचारात घेऊन तपशिलात शिरणाऱ्या अभ्यासकाला या सर्व प्रकारांतील भिन्नताही जाणवल्याशिवाय राहात नाही. डॉ. गोखले यांच्या मार्मिक विवेचनाचा आधार घेऊन हा वेगळेपणा वर्णन करावयाचा झाल्यास –

अनुक्रमणिका

"आरती ही स्फुट रचना आहे. त्यामुळे बऱ्याच वेळा पदांशी या रचनेची गफलत केली जाते. कारण एक तर दोन्ही रचनांना ध्रुवपद असते व शिवाय दोन्ही रचना गेय असतात. परंतु आरतीच्या व पदांच्या ध्रुवपदांत एक निश्चित असा फरक पाहणारास दिसेल तो हा की, आरतीच्या ध्रुवपदांत बहुशः आरतीविषयाचा 'जयजयकार' झालेला असतो आणि शिवाय 'ओवाळू' 'ओवाळीन' अशा अर्थाचे शब्दही असतात. पदांच्या ध्रुवपदांत वरील वैशिष्टये आढळत नाहीत असे नाही, परंतु त्यांच्या बाबतीत हा नियम म्हणून सांगता येणार नाही. आरत्यांच्या व पदांच्या अंतरंगाविषयी असे दिसते की, या दोहोंत फारसा फरक नसतो. तरीही आरती ही सगुणोपासनेत येणाऱ्या उपचारात समाविष्ट असल्याने मूर्तिवर्णन, चरित्रगायन आणि शेवटी उद्धाराची याचना यांना तेथे आवर्जून स्थान दिले जाते."

"आरती सारखीच भासणारी, विशेषतः जिचा हेतू आरतीप्रमाणेच असतो अशी दुसरी एक रचना विचारात घ्यावी लागेल ती म्हणजे निरनिराळ्या दैवतांची स्तोत्रे. येथे अंतरंगदृष्ट्या, विषयदृष्ट्या सारखेपणा आढळत असला तरी अभिव्यक्तीच्या दृष्टीने दोहोंत निश्चित फरक आहे. स्तोत्रांत दैवताची स्तुति करताना मूर्ती, चरित्र यांना आरतीप्रमाणेच स्थान मिळाले असले तरी मनातले आर्त भक्ताच्या भावनेने आपल्या दैवतापर्यंत पोहोचविण्याचे कार्य आरतीमध्ये प्रधान मानलेले असते, तसे स्तोत्रात नसते. बाह्यांगाच्या दृष्टीने विचार केला तर आरती ही निखालसपणे वेगळीच असते. स्तोत्रांच्या लांबीवर मर्यादा नसते, तर आरतीच्या बाबतीत विस्तार अपवादात्मक मानता येतो."

हे सर्व बारकावे ध्यानात घेता 'झुला' किंवा 'झुलवा' हा पद्यप्रकार 'आरती'लाच अधिक जवळचा वाटतो. मराठीतील प्रारंभीच्या वाङमयात ज्यांनी मोलाची भर घातली त्या महानुभाव पंथीयांनीही 'पाळणा' या गीतप्रकाराची रचना केलेली असून तोही 'आरती'चाच विषय बनलेला आहे, हे विसरता कामा नये. या वाङमयप्रकाराची कल्पना येण्यासाठी मला श्री. केशव अनंत जोशी यांच्याकडून उपलब्ध झालेला एक 'झुला' (किंवा 'झुलवा') येथे देत आहे. हा **श्री मल्लिकार्जुन** देवाचा झूला असून (श्रीस्थळ, काणकोण, गोवा) दर सोमवारी पालखीच्या वेळी श्रींची मिरवणूक निघते त्यावेळी तो म्हणण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. यातील मूळ शब्दप्रयोगांचे आधुनिकीकरण झाले असण्याची दाट शक्यता वाटते, तसेच काही शब्द अर्थाच्या दृष्टीने नीट लागत नाहीत. तरीपण अभ्यासकांच्या माहितीसाठी मूळ रचना जशीच्या तशी सादर करीत आहे:–

श्री

शृंगारपाट्टण तुज पूर्वा ठाया तेथूनि धरिला काणकोण ग्रामा ।। तुजविण भक्तांसी नाही निर्वाणा ।। दुःख दारिद्र्य नाशेल जाणा ।। **स्मरा स्मरा देव महेश** ।।१।।

सोमवार दिवसीं पर्वण तुझी थोरी ।। भक्त येतील तुझे मंदिरीं ।। पूजा बांधिती नाना कुशेरी ।। पुराणकीर्तन होता हे भारी ।। **स्मरा०** ।।२।।

काणकोण ग्रामी याचा वास ।। देव स्वयंभु लिंग म्हामहेश ।। सन्मुखि राहे तो काशीपुरुष ।। पाठी राहिला मुडदेव शेष ।। स्मरा० ।।३।।

ऐसी वरणा [वर्णा] का महती स्तुती ।। सै सै सै [?] मही [ली ?] आपली स्तुती ।। दोनि कर जोडोनी करितो विनंती ।। भक्त राहिले चरणांपासी ।। **स्मरा०** ।।४।।

आंगीं भूषण विभुती उधळोन ।। दोनी कर त्रीशूळान नके[व्हे ?] परिवार।। ऐसा तुमी करोनी हृदयी चिंतन ।। दुःख दारिद्र्य नाशेल जाणा ।। **स्मरा०** ।।५।।

ऐसा भक्तांचा देव कैलासा ।। पांडव रक्षिले देवें निवासा ।। त्रीपुर मारोनी वरू दिला कैसा ।। भक्त पालक देवा महेशा ।। **स्मरा०** ।।६।।

अंगर चंदन कर मुकुंदा ये ।। कुंकुम कस्तूरीचे सैव राये ।। सेवक सेवक राशे विचारी [ये ?] ।। चंपेकारी या नारदगुना या [?] ।। **स्मरा०** ।।७।।

सभा वाजे जनमंजला वाजे ।। पिट पिट जनभंजलाला ह साजे ।। ओशिक [?] शेला हे निलजा निला ये ।। ओशिक शेला जे चंपेल साजे ।। **स्मरा०** ।।८।।

शिवा शक्ती दोघां बैसलीं ।। सारी पाटणी खेळूं लागली ।। यावरि नारद कळि लावेळू[ल ?]

ऊठुनि धरिला चरणा तो महेश ।। शिवाशक्ती दोघां ।। स्मरा० ।।९।।

अर्ध गंगाजल ज्याचे मुकूटीं ।। अर्धचंद्र शोभला ललाटीं ।। गळां शोभती रुंडमाळा ।। चरणी कंवळ शोभे पटोळा शिवा शक्ती ।। स्मरा० ।।१०।।

मेरुशिखरी ज्याचे [अ ?]वतारी ।। तेथें नांदे तो उमाशंकर ।। भक्तां वरदान देतो ईश्वर ।। वाचे उच्चारण माहे निवारी ।। स्मरा० ।।११।।

प्रस्तुत ' झुल्या 'तील आराध्यदैवत जे श्रीमल्लिकार्जुन त्याच्या संदर्भात **' शृंगारपाट्टण '** व **' काणकोण '** अशा दोन स्थळांचा निर्देश प्रारंभीच आलेला आहे. प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. स. शं. देसाई यांच्या मतानुसार प्राचीन ' शृंगारपट्टण ' म्हणजे सध्याचे रत्नागिरी जिल्ह्यातील ' संगमेश्वर ' हे गाव असले पाहिजे. " इतिहासकाळी हे गाव शृंगारपट्टण अथवा शृंगारपूर या नावाने ओळखले जात होते. एका छोटया राज्याची ती राजधानी होती. चालुक्यवंशी राजांचे जे ताम्रपट सापडले आहेत ह्यांत शृंगारपूरचा उल्लेख आढळतो. . . अशी माहिती उपलब्ध आहे की, शृंगारपूरचे राज्य जरी लहान असले तरी ते बलाढ्य असून तीनशे युद्धनौकांचे आरमार या राज्यापाशी होते. अरबस्तानापर्यंतच्या समुद्रावर या आरमाराने वचक निर्माण केला होता." ' काणकोण ' या नावावर भाष्य करताना श्री. स. शं. देसाई लिहितात :–

" काणकोण हे नाव ' कण्वपुरम ' या संस्कृत नावावरून प्रसृत झाले. काणकोण महालाच्या परंपरेत अशी एक आख्यायिका सांगितली जाते की, ज्या ठिकाणी सांप्रत श्री मल्लिकार्जुन देवस्थान आहे, त्या ठिकाणी प्राचीनकाली एक घनदाट अरण्य होते. आज देखील हा परिसर त्या प्राचीन अरण्याची साक्ष पटवितो. एके बाजूस गुळद्याचा उंच पर्वत आणि इतर बाजूंनी व्यापून राहिलेली नयनमनोहर झाडी यांमुळे या छोटयाशा खोऱ्याला रमणीय शोभा प्राप्त झाली आहे. असे हे अकृत्रिम सृष्टिसौंदर्याने विनटलेले विलोभनीय स्थल देव आणि ऋषिमुनी यांचे निवासस्थान बनले असल्यास नवल नाही. . . .

कण्वऋषीच्या वास्तव्याने हा परिसर पुनीत झाला म्हणून तो ' कण्वपुरम ' या नामाभिधानाने ख्यातनाम पावला. कण्वपुरम्चे प्राकृत रूपांतर ' काणकोण ' मध्ये झाले. " [' काणकोण महालाचे इतिहासातील स्थान ' या लेखाधारे. **विद्याप्रसारक मंडळ, काणकोण, सुवर्णमहोत्सव स्मरणिका, १९७३.]**

एक प्राचीन गीतप्रकार म्हणून तर **अशा** प्रकारचे ' झुले ' अभ्यसनीय आहेतच; पण त्यात आलेल्या पौराणिक व ऐतिहासिक स्थल, **काल,** व्यक्ती आदींच्या कुतूहलजनक निर्देशामुळेही ते महत्त्वाचे वाटतात. अशा असंख्य पद्यरचना अजनही उपेक्षित राहिलेल्या असतील !

साध्याही विषयात आशय कधी.........

" शब्द एकत्र येतात, सारस्वते बनतात. फुले एकत्र येतात, हार गुंफिले जातात. सूर एकत्र येतात, दिव्य संगीत निर्माण होते. शेकडो हाडे एकत्र येतात, हा देह बनतो. या देहात केवढे सहकार्य, किती प्रेम ! पायाला काटा बोचला तर वरच्या डोळ्याला पाणी येते ! या लहानशा देहात सारा वेदान्त भरलेला आहे. सारी शास्त्रे ओतलेली आहेत, परंतु पहातो कोण ? आंधळे, सारे आंधळे ! "

——साने गुरुजी

संदेश आणि स्वाक्षरी

वि. बा. प्रभुदेसाई

डॉ. पडोळे यांनी संपादित केलेल्या प्रस्तुत ग्रंथात महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिक आणि थोर विचारवंत यांचे संदेश आणि स्वाक्षऱ्या यांचा साक्षेपाने केलेला अत्यंत दुर्मिळ असा संग्रह आढळतो. सुप्रसिद्ध मराठी कवी आणि मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे, 'अनिल' यांची मार्मिक प्रस्तावना या ग्रंथाला लाभली आहे. नुकतेच दिवंगत झालेले ख्यातनाम मराठी साहित्यिक श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांनी आपल्या शुभेच्छा-संदेशात म्हटल्या-प्रमाणे "या ग्रंथातील ४३ मराठी विविध साहित्यिकांच्या साहित्याचे मी अवलोकन केलेले आहे. हा ग्रंथ मराठी प्रमाणेच इतर भारतीय भाषांत अपूर्व ठरावा, जगातील साहित्यात अद्वितीय ठरावा, सन १९२५ ते ५० च्या कालखण्डातील श्रेष्ठ मराठी साहित्यिकांच्या साहित्याचा दस्तऐवज ठरावा."

या ग्रंथातील भाऊसाहेब माडखोलकरांचा होतकरू तरुणांना अनुलक्षून दिलेला पुढील संदेशही प्रत्येकाने मनन करण्यासारखा आहे.

साहित्याचे एकच व्यासपीठ जगात असे आहे की ज्या व्यासपीठावर चढण्याची आकांक्षा धरणाऱ्या माणसाला जात, धर्म, वंश यांपैकी काहीही नडत नाही. फक्त आवश्यक ते साहित्यगुण त्याच्या ठिकाणी उपजात असले किंवा त्याने ते परिश्रमपूर्वक संपादन केले तर तो त्या व्यासपीठावर चढू शकतो.

या ग्रंथाची सजावट मुंबईचे सुप्रसिद्ध व्यंग-चित्रकार श्री. बाळ ठाकरे आणि विदर्भातील कलाकार श्री. दि. के. मनोहर यांची आहे एवढे सांगितल्यावर हा ग्रंथ अंतर्बाह्य किती देखणा झाला असेल याची कल्पना येईल. आपल्यावरच्या नैतिक ऋणाची अंशतः फेड करण्याच्या हेतूने डॉ. पडोळे यांनी त्यांच्या '**पूजा प्रकाशना**'च्या रौप्यमहोत्सवप्रसंगी सर्वांगसुंदर व अत्यंत मौलिक (किमतीच्याही दृष्टीने!) असा हा ग्रंथ प्रकाशित केल्यावद्दल मराठी रसिक धन्यवाद देतील.

[**संदेश आणि स्वाक्षरी भाग पहिला** – संपादक डॉ. ल. वा. पडोळे, पूजा प्रकाशन, धनतोली, नागपूर १२; १९७५; मूल्य रु. ७५.]

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१ डिसेंबर १९७६ ते २० डिसेंबर १९७६)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन :

१.१. कार्यकारी मंडळाची १९ वी सभा (१९७६–७७ ची पाचवी सभा) दि. १९–१२–७६ ला सकाळी ९ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरली. त्यात चिखली येथील संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी तीन नावे सुचविण्यात आली. प्रारंभी महाराष्ट्राचे राज्यपाल आणि नागपूर विद्यापीठाचे कुलपति श्री. अलियावर जंग, विद्वान पंडित डॉ. ल. रा. कुळकर्णी व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. द. चि. सोमण (वाशिम) यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

२. सांस्कृतिक कार्यक्रम :

श्री. भिडे, विनायक गोपाळ, नागपूर.

२.१. दि. १–१२–७६ ला सुप्रसिद्ध साहित्यिक. प्रा. म. ना. अदवंत, जळगाव यांचे 'आजची नाट्यसृष्टी – काही विचार' या विषयावर भाषण झाले.

२.२. सुप्रसिद्ध कवी श्री. राजा बढे यांचे दि. ८–१२–७६ ला सायंकाळी ७ वाजता काव्य-गायन झाले.

२.३. प. वा. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या तेराव्या दिनानिमित्त दि. ९-१२-७६ ला स्मृतिदिन आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी श्री. त्रि. गो. देशमुख, डॉ. श्री. भा. वर्णेकर, डॉ. मधुकर आष्टीकर, श्री. वैद्य यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' होते. भाऊसाहेबांचे एखादे चिरस्थायी स्वरूपाचे स्मारक संघाच्या परिसरात उभारावे, अशी इच्छा कवि अनिल यांनी व्यक्त केली. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी प्रास्ताविक भाषण केले.

२.४. विदर्भ साहित्य संघ व विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान या संस्थांतर्फे ज्ञानेश्वर जन्म सप्त शताब्दी सांगता समारंभ दि. १७ व १८–१२–७६ या दोन दिवशी आयोजित करण्यात आला. दि. १७–१२–७६ ला डॉ. अ. ना. देशपांडे व दि. १८–१२–७६ ला विधान परिषदेचे सभा-पति माननीय श्री. वि. स. पागे यांची व्याख्याने झाली.

३. स्मृतिदिन :

दि. ६–१२–७६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाण दिननिमित्त त्यांच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

अनुक्रमणिका

४. संगीत समिती – (स्वर मंडळ)

सुप्रसिद्ध गायक श्री. कुमार गंधर्व यांचे चिरंजीव कुमार मुकुल शिवपुत्र यांचे दि.१५-१२-७६ ला रात्रौ ९ वा. टिळक सभागृहात सुश्राव्य गायन झाले. याप्रसंगी श्री. बवनराव आठल्ये यांनी पेटीवर व श्री. गोपाळराव वाडेगावकर यांनी तबल्यावर साथ केली.

५. नाटचसमिती :

दि. ७–१२–७६ ला सायंकाळी ७ वाजता नाटचसमितीने आयोजित केलेल्या 'महिला एकांकिका स्पर्धेतील' यशस्वी स्पर्धक संस्था व वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके व परीक्षा समितीने आयोजित केलेल्या मराठीतील विविध परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके यांचा वितरण समारंभ समाजकल्याण, क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे राज्यमंत्री माननीय श्री. सुशील कुमार शिंदे यांच्या हस्ते झाला.

६. शाखा सभा वृत्त :

६.१. मूर्तिजापूर शाखा सभा

दि. २–१२–७६ ला गाडगे महाराज महाविद्यालयात प. वा. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या निधनानिमित्त शोकसभा आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी शाखासभेचे अध्यक्ष श्री. मधुकर खोकले, सरचिटणीस श्री. श्रीकांत तिडके, श्री. विनय देशमुख, श्री. भगवानदासजी बूब व प्रा. श्री. गायकवाड यांनी आपल्या भाषणात भाऊसाहेबांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करून श्रद्धांजली अर्पण केली. सभेचे संचालन श्री. सुभाष इंगोले यांनी केले.

६.२. यवतमाळ शाखा सभा :

दि. ४–१०––७६ ला प्रा. सु. ग. शेवडे यांचे 'धर्म व विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. दि. १०–१०–७६ ला सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. बाबासाहेब ठकार यांचे 'श्री गजानन महाराज तात्या टोपे होते' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २८–११–७६ ला आयोजित शोकसभेत प. वा. भाऊसाहेब माडखोलकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी श्री. विजय राणे, प्रा. संजीवनी देशमुख, प्रा. शरच्चंद्र टोंगो, अॅड्. द. बा. महाजन, श्री. उमेश पत्की यांनी आपल्या भाषणात श्रद्धांजली अर्पण केली. श्री. रमेश तारगावकर यांनी शोकप्रस्ताव वाचून दाखविला.

६.३. अकोला, अकोट, उमरखेड, खामगाव, चंद्रपूर, चिखली, तुमसर, दारव्हा, बुलढाणा, गोंदिया व वणी ह्या शाखासभांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

साभार पोच

[१–१२–७६ ते २०–१२–७६ पर्यंत 'युगवाणी' ला भेटीदाखल आलेली पुस्तके]

लोकानुवर्ती राज्यकर्ता शंकररावजी चव्हाण : पंढरीनाथ पाटील, प्रकाशिका सौ. आशादेवी पंढरीनाथ पाटील, सरकारी वसाहत, वांद्रा (पूर्व) मुंबई ५१. १ + २७६ रु. १२.

अप्सरा : संपादक के. एन. नांदुरकर, मंगल प्रकाशन, नशिराबाद, जि. बेळगाव; १ + ३८, रु. ५.

नाकेबंदी ज. वि. पवार, मुक्तछंद प्रकाशन, परशुराम पुप्पाला मार्ग, मुंबई. ८, १ + ६४, रु. ५.

माझी कैफियत कै. शंकरराव मोरे, संपादक प्राचार्य ए. बी. शिंदे, प्रकाशक – अध्यक्ष श्रीशाहू छत्रपती शिक्षण संस्था, फुले सदन, कोल्हापूर. ९ + ९६, रु. १०.

घटनेतील मुद्रणदोष दुरुस्ती

घटना, कलम १२ (औ)–१ मध्ये "या कलमाचे उपकलम (उ) प्रमाणे, होणारी तक्रार ऐकण्याकरिता किंवा" या ओळीत मुद्रणदोपामुळे '(उ)' चुकून पडला आहे. त्याऐवजी '(ङ)' असे वाचावे (घटना–पृष्ठ क्रमांक ९).

गो. स. देहाडराय,
सरचिटणीस, वि. सा. संघ

घटना कलम १२ (ऊ) प्रमाणे संशोधित दुरुस्त्या

१. सभासद यादीत खालील नावे समाविष्ट नव्हती. ती आता समाविष्ट करण्यात आली आहेत :

दारव्हा :

१) वल्लाळ, श्री. मधुकर शामराव, दारव्हा, (यवतमाळ), ४४.

चंद्रपूर :

१) प्रा. धनकर, पु. ह. गंजवार्ड, चंद्रपूर, ३६.

२. नावे व पत्ते ह्यात खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत :

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	यादीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती.
नागपूर :				
१	१६	३०	कुकरेजा, श्री. रघु मुरडकर बिल्डींग, पटवर्धन हायस्कूल समोर, सीतावर्डी नागपूर, १२. ३३.	कुकरेजा, श्री. रघु, वर्मा बिल्डिंग, महासागर प्रेसच्या मागे, टेकडी रोड, सीतावर्डी नागपूर १२. ३३.
२	४	४७	सौ. रजनी विद्याधर, द्वारा, ऑल इंडिया रिपोर्टर लि., कॉंग्रेस नगर, नागपूर १२ च. १३	चितळे, सौ. रजनी विद्याधर द्वारा – ऑल इंडिया रिपोर्टर लि., कॉंग्रेस नगर, नागपूर १२. च. १३.
३	२०	१२६	देशमुख, श्री. विजय यशवंत, हिंदुधर्म संस्कृती मंदिर, धनतोली, नागपूर १२. ४०६	देशमुख, श्री. विजय यशवंत साने यांचे घर, लक्ष्मीनगर, नागपूर १०. ४०६.
४	२६	२९६	सखटे, श्री. विनायक शंकर, ६९, वसंत नगर, नागपूर १०. २९६	सरवटे श्री. विनायक शंकर, ६९, वसंत नगर, नागपूर १०. २९६.
यवतमाळ :				
१	२८	६	कोठारी, सौ. निर्मलाताई, पाण्याच्या टाकीज जवळ गांधी नगर, महावीर छाया, धामणगाव मार्ग, यवतमाळ. ६.	कोठारी, सौ. निर्मलाताई, महावीर छाया, धामणगाव मार्ग, यवतमाळ. ६.

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	यादीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती,
२	२८	८	टोंगो, प्रा. शरश्चंद्र बाजरिया नगर, यवतमाळ, २५	टोंगो, प्रा. शरच्चंद्र बाजोरिया नगर, यवतमाळ. २५
३		१४	देशमुख प्रा. संजीवनी विवेक नगर, यवतमाळ. ३२	देशमुख, प्रा. संजीवनी विवेकानंद नगर, यवतमाळ. ३२
४		१६	पिदडी, बी. शरद पुरुषोत्तम टिळकवाडी, यवतमाळ, ३७.	पिदडी, श्री. शरद पुरुषोत्तम. टिळकवाडी, यवतमाळ. ३७.
५		२२	सगणे, श्री. अ. मा. यवतमाळ, ६४	सगणे, श्री. अ. मा. श्री. हूड यांचे घर. जेलच्या मागे, अवधुतवाडी, यवतमाळ, ६४.

वणी :

१	२८	६	कावडकर, श्री. वा. ब. शिक्षक, शि. प्र. मंडळ, विद्यालय, वणी, जि. यवतमाळ, ११	कावडकर, श्री. ना. ब. शिक्षक, शि. प्र. मंडळ विद्यालय, वणी, जि. यवतमाळ. ११
२		७	कंचमवार, श्री गोपाळराव विठोबाजी, प्रकाश जनरल स्टोअर्स, वणी, जि. यवतमाळ १२.	कुंचमवार, श्री. गोपाळराव विठोबाजी, प्रकाश जनरल स्टोअर्स, वणी, जि. यवतमाळ. १२.
३	२९	१२	ढुमे, श्री. रा. भि. गोपाळ कृष्ण मंदिरा समोर, वणी, जि. यवतमाळ. २८	ढुमे, श्री. रा. गि. गोपाळ कृष्ण मंदिरा समोर वणी, जि. यवतमाळ. २८
४		१९	पोपट्टीवार, श्री भैय्यासाहेब देशमुख वाडी, वणी, जि. यवतमाळ, ४६.	पांपट्टीवार, श्री. भय्यासाहेब देशमुख वाडी, वणी, जि. यवतमाळ. ४६
५		२८	रेंभे, श्री पु. भा. सराफा ओळ, गांधी चौक, वणी, जि. यवतमाळ, ६७.	रेभे, श्री. पु. मा. सराफा ओळ, गांधी चौक, वणी, जि. यवतमाळ, ६७.
६		३०	शेवाळकर, प्रा. राम बाळकृष्णा, प्राचार्य लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ, ७१.	शेवाळकर, प्रा. राम बाळकृष्ण प्राचार्य, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ. ७१.

निधन झाल्यामुळे सभासद यादीतून खालील नाव वगळण्यात आले आहे :--

१	७	१२०	माडखोलकर, श्री. ग. त्र्यं. प्रसाद, अभ्यंकर मार्ग, धंतोली, नागपूर १२. म. १०

नागपूर,
दि. ३१-१२-७६

अध्यक्षांचे निर्णयाप्रमाणे
गो. स. देहाडराय, सरचिटणीस,
वि. सा. संघ.

विदर्भ साहित्य संघ

घटना कलम १२ (ऊ) प्रमाणे संशोधित दुरुस्त्या

१. सभासद यादीत खालील नावे समाविष्ट नव्हती ती आता समाविष्ट करण्यात आली आहेत.

चंद्रपूर :

२. कंचर्लीवार, डॉ. ना. वा., भानापेठ, चंद्रपूर क.
३. सपाटे, डॉ. आबासाहेब, बालाजी वार्ड, स. ५.

२. नावे व पत्ते ह्यात खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

नागपूर :

क्रमांक	पृष्ठ	यादीतील अनुक्रम	यादीत छापलेले नाव व पत्ता	त्याऐवजी दुरुस्ती
५	६	१०९	बुटी, श्रीमंत पूर्णचंद्रराव, गौती बंगला, लिबर्टी टॉकीजमागे, सदर, नागपूर १.	बुटी, श्रीमंत विश्वनाथ पूर्णचंद्रराव, गौती बंगला, लिबर्टी टॉकीजमागे, सदर, नागपूर १.

निधन झाल्यामुळे सभासद यादीतून खालील नाव वगळण्यात आले आहे.

२	८	१५२	हजरनवीस, श्री. रामचंद्र मार्तंड ४१, धरमपेठ, नागपूर १०. ह. १.

अध्यक्षांच्या आदेशावरून

नागपूर
३।१।१९७७

गो. स. देहाडराय
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ – बेहेरे व्याख्यानमाला १९७७

ही व्याख्यानमाला श्री. **स. शि. भावे**, पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजचे उपप्राचार्य, मराठीचे प्राध्यापक आणि सुप्रसिद्ध समीक्षक गुंफतील.

व्याख्यान पहिले **काव्य – तत्व आणि निर्मिती** – गुरुवार दि. २७-१-७७

व्याख्यान दुसरे **काव्य – आस्वाद आणि समीक्षा** – शुक्रवार दि. २८-१-७७

व्याख्यान तिसरे : **काव्य आणि सामाजिक अभिरुची** – शनिवार दि. २९-१-७७

पहिली दोन व्याख्याने नागपूर येथे वि. सा. संघ मंदिरात होतील आणि तिसरे व्याख्यान वि. सा. संघाच्या अकोला शाखा सभेतर्फे अकोला येथे होईल. वेळ सायंकाळी ६–३० वाजता. प्रवेश निःशुल्क.

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

अनुक्रमणिका



वि. सा. संघाच्या १९७६ च्या पहिल्या महिला एकांकिका स्पर्धेचे पारितोषक वितरण मंगळवार दि. ७-१२-७६ ला माननीय राज्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिन्दे ह्यांच्या हस्ते झाले. ‘कै. व्यं. ब. जागीरदार फिरती ढाल’ हरणे महिला समाज ह्या संस्थेने मिळविली. छायाचित्रात डावीकडून सौ. प्रतिभा जोशी, मा. श्री. सुशीलकुमार शिन्दे, सौ. प्रभा वझलवार आणि संघाध्यक्ष अनिल.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२
मुद्रक : श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२